रणरणत्या उन्हातून चालताना सावली देते ती मैत्री,
काट्याच्या रस्त्यावरुन जाताना फूल बनून पावलांना जपणारी ती मैत्री,
शिशिराच्या पानगळतीला वसंताची नवी पालवी फुलवणारी ती मैत्री
स्वत:च्या अपयशातही मैत्रीच्या यशाचे कौतुक असणारी ती मैत्री,
येणाऱ्या प्रत्येक वादळाला तोंड देताना मूळ टिकवून ठेवणारी ती मैत्री,
सागराच्या लाटांतही हात गच्च पकडून पाण्यात भिजणारी ती मैत्री,
दु:खाच्या अश्रूना सुखामृत पाजवणारी ती मैत्री,
ही मैत्री असतेच अशी जगावेगळी, जिथे भेटतात अनेक यात्री,
पण फारच कमीजणांची मनाला पटते खात्री.

कु. अनुपमा अशोक भुसारी
बी.एस्सी.भाग ३



स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी....

''देह झिजवले कित्येक नेत्यांनी
आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी.....
घर-दार सोडले,
तुरूंगवासही भोगला
सावरकर आणि चंद्रशेखर
आझादांनी.
स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी.....
संयम पाळून संविधान लिहले
आणि महाडचे पाणी चाखवले,
बहुजनांना त्या आंबेडकरांनी
स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी.....
वस्त्र त्याग केला,
महान राष्ट्रपिता
महात्मा गांधीजींनी
स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी.....



त्या लहानग्या
जिजाऊच्या मावळ्यांनी,
दिले धडे गनीमीकाव्याचे
मावळ्यांना शिवरायांनी
स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी.....
सार्वजनिक गणेशोत्सवही साजरे केले,
आणि एकता व बंधुता साधली
लोकमान्य टिळकांनी
आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी.....''

कु. प्रणाली दगडू खाडे
बी.एस्सी.भाग २

अपयश

लागली होती यशाची चाहुल....
आता साद कोण घालेल का?
परकं केलं आपल्यांनी
त्यांच्या परतीची वाट कोण दाखवेल का?
नाही सहन होत दुरचा प्रवास.....
मैत्रीचा अर्थ कोणी सोंगेल का?
यश आलं तेव्हा खूप पाठीशी होते....
आता अपयश आलं....
सांत्वन कोणी करेल का?

पुन्हा आलेलं अपयश पाहून खूप रडू आलं.....
जीव झाला नकोसा अंग ओलचिंब झालं.....
सावरलं आईनं मला आता उठून उभा राहिलो आहे.....
पण भिती वाटते.....
कारण मनातून पुरता खचलो आहे
आता मला जिंकायच आहे एवढच लक्ष्य आहे....
मरण्याअगोदर थोडं हसत हसत जगायच आहे.....

उमेश शिवपुजे
बी.एस्सी.भाग ३



आयुष्याच्या शेवटी

आयुष्याच्या शेवटी खुप जगावंस वाटतं आहे.....
आपलं बालपण तरुणपण डोळ्यांसमोर येत आहे.....
मुलांची बोलणी आता रोजचीच झाली.....
नातवांची किलबिल कानी ऐकू आली.....
जगापुढे आता कोणतंच लक्ष्य नाही राहिलं.....
उरलं-सुरलं आयुष्य मातीत मिळालं की बास झालं.....
मुलगा I.A.S. आहे सांगायला छाती गर्वानं फुगते....
पण पोटचं पोरगं आपल्याला बोलते तेव्हा मान खाली झुकते....
नाही वागलो आम्ही आमच्या वाडवडिलांशी असं.....
मग आमच्या पदरी इतकं हाल कसं.....
मेल्यानंतर का होईना आम्हाला सुख मिळेल का?
ज्याचं प्रेम हवं होतं ते मरणानंतर तरी मिळेल का?

उमेश शिवपुजे
बी.एस्सी.भाग ३

आयुष्य हे असचं असतं...



आयुष्य हे असंच असतं
आनंद खूप कमी असतो, पण दु:ख मात्र खूपच असतं
अशा काही आपल्या आयुष्यात घटना घडतात की,
आपल्याला सांगायला कोणी नसते.
आयुष्य मात्र खूप कमी काळ माणसाच्या आनंदाला
प्रतिसाद देते
प्रत्येक वळणावर आपल्याला कोणीतरी भेटत असतं
संकटातून अलगद बाहेर काढणारं,
मग आपल्याला वाटत आयुष्य हे असचं असतं,
फुलणाऱ्या कळीसारखं, नंतर फुलासारखं
आयुष्य हे असच असतं....

धन आणि जीवन

धनाने विद्या मिळेल, पण विवेक मिळणार नाही
धनाने सुंदर पत्नी मिळेल, पण खरे प्रेम मिळणार नाही
धनाने चष्मा खरेदी करता येईल, पण दृष्टी नाही
धनाने सुंदर बंगला घेता येईल, पण मानसिक समाधान मिळणार नाही
धनाने स्वादिष्ट अन्न मिळेल, पण भूक मिळणार नाही.

कु. वर्षा संभाजी पाटील
बी.ए.भाग २

चारोळी...

ज्यांच्यासाठी डोळ्यात पाणी यावे,
अशी माणसे आयुष्यात खूप कमी भेटतात,
आणि ती जेव्हा भेटतात तेव्हा,
डोळ्यात पाणी येऊ नये
याचीच जास्त काळजी घेतात.

कु. शुभांगी कुंडलीक कापसे
बी.ए.भाग २



अडगळ...

घरांघरांच्या कोपऱ्यांमध्ये कुठेतरी दडलेली...
पुर्वजांच्या इतिहासाची...
आजीच्या प्रेमाची...
आणि, खचाखच भरलेल्या सामानाची...
असते जिथे मरगळ,
अडीनडीच्या गरजा वेळेवर पुर्ण करणारी,
जखमांवरच्या रक्तांवर चिंधी बांधणारी,
कडाक्याच्या थंडीमध्ये ऊबेची गोधडी पांघरणारी,
मनामधल्या भूतकाळातील आठवणींवर,
हळूवार फुंकर घालणारी,
जुन्या आठवणींनी डोळ्यांच्या कडा पाणावणारी,
असतेच घरात कुठेतरी अडगळ.
'स्टोअर रूम' या बदलत्या नावाने
झाली थोडीशी विरळ
ती विरळ होता होता
अडगळ झाली माणसेच प्रेमळ!
जुन्या वस्तुंची अडगळ होती जागा
नव्या संस्कृतीने सैल झाला नात्यांमधला धागा
आणि वडीलधाऱ्यांचा अडगळ म्हणून केला सुरु त्रागा!
वृध्दाश्रमाची वाट न घ्यावी ही अडगळ
तर असते वात्सल्यरुपी संस्काराची ओंजळ
क्षणभरही न व्हावी माणसं कधी अडगळ
अडगळ झाली जरी ती,
वेळप्रसंगी मन घेते जिथे शोध
ती असते एक अडगळ,
सामानाची वा माणूसकीची
अमुल्य ठेव असते अडगळ!

कु. सुवर्णा (स्वर्णा) महादेव कदम
बी.एस्सी.भाग २

आई



पहाटेचं उठून
देवाच्या फोटोकडं बघून
अंथरुण गुंडाळून
चूल पेटवून, आंघोळ उरकायची
चुलीवर चहा ठेवून
भाकर बडवायची!...
चहाचं दोन घोट घेऊन
भाकर गुंडाळून
कामाची वाट धरायची!...
दिसंबर राबराब राबून
खालेल्लं दोन घास
कदी खाल्लं, कळायचं नाय
सांच्याला परत येवून
सकाळचंच चहाचं पाणी ऊन करुन
पिऊन टाकयचं...
भात चुलीवर ठेवून
राकुंडी लावीत
गतकाळच्या गोष्टी आठवीत
डोळं पाणावून, गप्प बसायचं...
खरपूस भाताच्या वासावर
भानावर येऊन, डोळे पुसीत
ताट पुढ्यात घेऊन
दोन घास खाऊन टाकायचं...
अंगाचा शीण घालवायचा
म्हणून तिथचं आडवं पडायचं
परत, पहाटचं रडगाणं, तसचं सुरु रहायचं
आयुष्य आहे तोवर
असचं जगत रहायचं
असचं जगत रहायचं....!



शादी डॉट कॉम लग्नापूर्वी

तो– हुश्श! किती वाट पाहत हातो या क्षणाची
ती– मी जाऊ का निघून
तो– छे गं! तसा विचारसुध्दा मनात आणू नकोस.
ती– तुझे प्रेमं आहे का माझ्यावर?
तो– अर्थातच
ती– तु माझी कधी फसवणूक तर करणार नाहीस ना?
तो– नो नेव्हर! असा विचार तरी तुझ्या मनात कसा येतो?
ती– तु मला सुखात ठेवशील ना...
तो– हो, तर!
ती– तु मला मारहाण करशील?
तो– अजिबात नाही. मी त्या प्रकारचा पुरुष नाही.
ती– मी तुझ्यावर विश्वास ठेवू शकते का?
तो– हो
ती– आ हो
आता लग्नानंतर काय होते हे जाणून घेण्यासाठी हा संवाद खालून वर वाचत जा.....


कु. शुभांगी कुंडलीक कापसे
बी.ए.भाग २

उपकार



सांग ना सख्या कसे फेडू तुझे उपकार
गरीबांचा कोण मित्र किंवा वाली नसतो
त्यात तू माझा सखा झालास, आणि
आयुष्यातील एकाकीपणा तू दूर केलास
सांग ना सख्या...
पहिलीच्या वर्गात तुझी आणि माझी
एका भांडणाने भेट झाली
त्यात तूच मोडत घेतलस
अन् मैत्रिचा हात पुढे केलास
सांग ना सख्या
दिवाळीच्या वेळेला
सर्वजण फटाके वाजवायचे
आणि मी घाबरुन एका कोपऱ्यात बसायचे
तू साहस दाखवलेस आणि
माझ्यातला भित्रेपणा तू दूर केलास
सांग ना सख्या...
वर्गात परिक्षेची फी नसायची
तर तू तुझी फी माझ्या नावे भरायचास
का एवढे तू माझ्यासाठी करायचास
सांग ना सख्या...
आयुष्यात जेथे-जेथे कमी पडले
तेथे-तेथे खऱ्या मित्रासारखा
तूच उभा राहिलास
का सारे तू माझ्यासाठी करायचास
सांग ना सख्या...
शाळेच्या सहलीला सर मला
नाही म्हणायचे
तूच पुढे घालून मला न्यायचास
सारे ठिकाण फिरून तू मला दाखवायचास
आणि वरुन म्हणायचास
काही कमी पडून देत नाही तूला
सांग ना सख्या...
चांगल्या नोकरीवरही मी लागले
ही बातमी सांगायला मी तुझ्यापाशी आले
आणि सुखाचा पारा तू नाहीसा केलास
तू मला पोरके करून गेलास
सांग ना सख्या....
लहानपणापासून तूला ब्लड कॅन्सर होता
हे तू माझ्यापासून लपवलेस
अपंग मुलीचे दुःख तू वाटून घेतलेस
स्वतःचे दुःख तू पोटात ठेवलेस
एवढे शहारपण आले कुठून तुझ्यात
सांग ना सख्या....

कु. सोनाली विष्णू कदम
बी.ए.भाग १



नशीब

त्यानं काम केलं दिवसभर
आणि श्रमला रात्रभर.
त्यानं मौजमजा सोडली
आणि सोडलं काही गोष्टींचं सुख.
त्यानं अवघड पुस्तकं वाचली,
नव्या गोष्टी आत्मसात केल्या,
आणि पुढे मुसंडी मारली,
यशस्वी होण्यासाठी.
त्यानं उदंड कष्ट घेतले,
आत्मविश्वासानं आणि धैर्यान
तो पुढे झेपावत राहिला
आणि जेव्हा तो यशस्वी ठरला,
तेव्हा लोक म्हणाले–
नशीबवान आहे तो !

कु. शुभांगी पोपट नांगरे
बी.एस्सी.भाग ३

जीवन प्रवास

जीवन जगताना खूप काही सहन कराव लागतं
एखादी गोष्ट मिळाली नाही म्हणून
दु:ख व्यक्त करायच नसतं
तर ती मिळविण्याचा प्रयत्न करायचा असतो
आणि एखादी गोष्ट मिळाली की,
त्याचा अतिरेक कधी करायचा नसतो
ती गोष्ट मिळाली म्हणून गप्प
कधी बसायच नसतं
सतत प्रयत्नशील रहायचं असतं
देवाकडे मागतानाही नेहमी दुसऱ्यांसाठी
काहीतरी मागायचं असतं
कारण दुसऱ्यांच्या आनंदामध्येच
आपला आनंद असतो
हे कधी विसरायच नसतं
आपल्याकडे विचार केला तर सर्वकाही असतं
आणि आपल्याला जेव्हा वाटत की
आपल्याकडे काहीच नाही
तेव्हा आपण एखाद्या अपंग व्यक्तिकडे
पहायच असतं
तेव्हा आपल्याला जाणवेल की
आपल्याकडे तर सर्वकाही आहे
मग त्यातून जी प्रेरणा मिळेल ती
तुम्हाला नक्कीच ध्येयाच्या दिशेकडे नेईल
जीवन हे असच असतं
कधी सुख असते तर कधी दु:ख
सुखाचा आनंद घ्यायचा असतो
दु:खावर मात करायची असते
जीवनाचा खेळ हा आयुष्य संपेपर्यंत
असाच चालू असतो

कु. प्रिया सुखदेव माळी
बी.ए.भाग २



उठ तरुणा

उठ तरूणा जागा हो
या नव्या पिढीला सांग जरा तू
सुर्योद्य कसा करायचा आणि चंद्रोद्य कसा करायचा.

सत्याच्या मार्गावरुण जाताना
साथ असावी धर्म–कर्माची
सहज सोपे होते आता
अंधार या जगातील दूर करण्यास.

तू नाही बनू शकत शिवबा, तू नाही
बनू शकत विवेकानंद, तू नाही बनू शकत लोकमान्य,
तू नाही बनू शकत असे अनेक थोर पुरुष,
तू होशील नवा चेहरा त्या सर्वांचा
ज्यांनी इतिहासात महान कार्य केले.

यासाठी तुला त्यांचे आचरण
आपल्या ठायी ठायी
आत्मसाथ करावे लागेल.

या नव क्रांतीच्या मार्गावरती
अंधाराचे जाळे सामावलेले असेल
अनेक प्रकारचे काटे या मार्गावरती
येतील पण तू न डगमगता
पुढेच जात राहा.

तुला मार्गदर्शन करण्यासाठी
थोर विचार आणि
क्रांतीच्या मशाली कामी येतील

वाट खडतर आहे परंतु,
भविष्य उज्वल होणार यातुन
ही धरीत्री पाप मुक्त होईल आणि
नविन सृष्टीचा जन्म होईल.
सौख्य, सुख, शांती, समाधान सर्व
आनंद सामावलेला असेल त्यात.

कु. शालिनी सतिशराव खराडे
बी.कॉम.भाग १



संस्कार

उत्सव वाङमयाचा येती
घेऊन ज्ञानाची भर
चटक मटक लेखनासोबत
हाती येते संस्कार ।।

लेख, कविता वाचण्याचा
असतो मनोमनी छंद
हास्य. विनोद, वात्रटिकांनी
मिळे मनाला आनंद ।।

साहित्यीकांची मांदियाळी
नव्याने भेटते अंकात
दर्जेदार साहित्याने
भर पडते ज्ञानात ।।

लेखांची वैविध्यता
असे वैशिष्ट्य अंकाचं
सर्वानाच व्यक्त होण्याचं
व्यासपीठ आपल्या हक्काचं ।।

बापुजींच्या नगरीत
उधळे ज्ञान साहित्यांचे
संस्कार जपून ठेवा
स्वामी विवेकानंदांचे ।।

वर्षानुवर्षे झळकत राहील
परंपरा या अंकाची
भर पडत राहू दे
अशाच साहित्यीकांची ।।

वसा जपावा साहित्याचा
हीच एक अपेक्षा
पुढील संस्कार अंकास
माझ्या लाख-लाख शुभेच्छा ।।

कु. समृध्दी जगन्नाथ गुरव
बी.एस्सी.भाग २

चारोळी...

कुणी विचारलं आयुष्यात
काय गेलं आणि काय मिळालं,
सरळ सांगा की, जे गेलं
ते कधीच माझं नव्हतं
आणि जे मिळालं ते देवानं
माझ्यासाठीच ठेवलं होतं.

कु. शुभांगी कुंडलीक कापसे
बी.ए.भाग २

एकच.....



एकच चहा तो पण कटिंग....
एकच पिक्चर, तो पण टॅक्स फ्री....
एकच साद, ती पण मनापासून.....
अजून काय हवे असते मित्र–मैत्रिणींकडून.....?

एकच कटाक्ष, तो पण हळूहळू.....
एकच होकार, तो पण लाजून
एकच स्पर्श, तो पण थरथरुन
अजून काय हवे असते प्रियेकडून.....?

एकच भूताची गोष्ट, ती पण रंगवून....
एकच श्रीखंडाची वाटी, ती पण आर्धी तोडून....
एकच जोरदार धपाटा, तो पण शिवी हासडून
अजून काय हवे असते आजीकडून.....?

एकच मायेची थाप, ती पण कुरवाळून.....
एकच गरम पोळी, ती पण तूप लावून
एकच आर्शिवाद तो पण, डोळ्यात आसवे आनून
अजून काय हवे असते आईकडून.....?

एकच कठोर नकार स्वैराचाराला, तो पण हृदयावर दगड ठेवून....
एकच सडेतोड उपदेश, तो पण घोगऱ्या आवाजातून....
एकच नजर अभिमानाची, ती पण आपली प्रगती पाहून...
अजून काय हवे वडीलांकडून.....?

सगळ्यांनी खूप दिले, ते पण न मागून.....
स्वर्ग जणू मला मिळाला, तो पण न मरुन....
फाटकी ही झोळी माझी, ती पण वाहिली भरुन.....
अजून काय हवे आहे मला आयुष्याकडून.....?

कु. आक्षता सुरेश माईनकर
बी.ए.भाग १



आम्ही B.Sc वाले

ना Engineering, ना Medical ला असणारे
Graduation आम्ही करणारे, आम्ही B.Sc. वाले ।।
ना आमचं कोणतं Aim
तरीही ठेवतोय Chem.
Lectures, Practicals ला वैतागलेले,
आम्ही B.Sc. वाले ।।
Lectures आम्ही करतो बंक
Journals साठी Teachers ना करतो तंग
नेहमी Enjoyment करुन
Exam ला रात्रभर जागरण करणारे,
आम्ही B.Sc. वाले ।।
Chemistry च्या Reactions घोकंपट्टी करून करून
पेपरमध्ये वेगळाच Catalyst वापरुन
नवीनच Product तयार करणारे,
आम्ही B.Sc. वाले ।।
गुलाब कोणाला द्यायचं किंवा कितीला विकायचं
या विचाराचे ना Art वाले, ना Commerce वाले
गुलाबाची Family आणि Chromosomes पडताळणारे,
आम्ही B.Sc. वाले ।।
Zoology व Botany ठेवून
निर्जीव दगडावरचे सूक्ष्म सजीव शोधणारे
आणि Slides करुन करुन कंटाळलेले,
आम्ही B.Sc. वाले ।।
Chemistry च्या Practicals च्या
Observations वरुन Result मिळवल्यावर
Scientist झाल्याचा भास होणारे,
आम्ही B.Sc. वाले ।।
ना दिवाळीची सुट्टी, ना उन्हाळ्याची सुट्टी
लांब लांब लांबलेल्या Exams ची वाट पाहणारे,
आम्ही S.Y.B.Sc. वाले ।।

कु. सुवर्णा(स्वर्णा) महादेव कदम
बी.एस्सी.भाग २

कॉलेजचा निरोप घेताना....



कॉलेजचा निरोप घेताना प्रश्न पडतो मनाला,
हरवलेली पाखरे पुन्हा येतील का भेटायला,
खूप खेळलो, हसलो, बागडलो, अभ्यासही केला,
गेलेले ते दिवस पुन्हा येतील का सजवायला ।।

अनोळखी माणसं सुद्धा किती जवळची होतात असे,
खूप जीवाला जीव लावणारे चांगले मित्र भेटले,
प्रत्येकाला हवं असतं एक आकाश, उंच भरारी घेण्यासाठी
सर्वांचे रस्ते वेगवेगळे होणार, रोजची भेट बंद होणार,
कॉलेजचा निरोप घेताना प्रश्न पडतो मनाला,
हरवलेली पाखरे पुन्हा येतील का भेटायला ।।

आमचे ते शिक्षक, आमचा तो वर्ग, आमची ती लॅब,
आमची ती लाइब्ररी, आमचा तो रोजचा ठरलेला बैंच,
सारं काही आठवणीतचं राहणार, रोजची भेट बंद होणार,
कॉलेजचा निरोप घेताना, प्रश्न पडतो मनाला,
हरवलेली पाखरे पुन्हा येतील का भेटायला ।।

शिक्षकांनी दिलेली शिकवण, वारसा चालवू पुढे आम्ही,
नेहमीच उंचावत ठेवू सन्मान, आमच्या कॉलेजचा आम्ही,
आयुष्यात कितीही पुढे गेलो तरी सगळ्याची आठवण येतच राहील.
आमच कॉलेज P.D.V.P.College, Tasgaon
नाव नेहमी हृदयात राहील
कॉलेजचा निरोप घेताना, प्रश्न पडतो मनाला,
आठवणींतले ते दिवस पुन्हा येतील का अनुभवायला ।।

कु. सरस्वती मनोहर पाटील
बी.एस्सी.भाग ३



सर्व सामान्यांचा आधारवड- वसंतरावदादा पाटील

(महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील यांच्या जन्मशताब्दि निमित्त विशेष लेख)

कु. सुमैय्या धोंडीबा नदाफ
बी.ए.भाग३

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्रातील प्रतिसरकारचे कार्य इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावे लागेल. इतकी महानता इथल्या क्रांन्तीकारकांनी आपल्या लढावू नेतृत्वाने केली. ८ ऑगस्ट १९४२ ला मुंबईच्या गवॉलीया टॅकवर म. गांधीजीनी , ब्रिटीशांना अखेरचा आदेश दिला 'चले जाव' आणि भारतीय जनतेला निर्वाणीचा संदेश दिला. 'करेंगे या मरेंगे' म. गांधीजीच्या अभूतपूर्व घोषणेने पारतंत्र्याचा अस्त आणि स्वातंत्र्याचा अरुणोद्य, पहाणारी युवापिढी ९ ऑगस्ट १९४२ ला ब्रिटीशांनी देशातील मान्यवरांना अटक केल्यानंतर भूमिगत झाली. आणि ब्रिटीशांविरोधी त्यांनी क्रांतीचे रणसिंग फुंकले. महाराष्ट्रात नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारची चळवळ इतकी लोकांना क्रांतीसाठी प्रफुल्लित करणारी ठरेल की, सातारा जिल्हा म्हटले की, ब्रिटीश अधिकाऱ्यांचे धाबे दणानू लागले. आजच्या सांगली जिल्ह्यात म्हणजे तत्कालिन दक्षिण सातारा जिल्ह्यात, पाच ग्रुप भूमिगत चळवळीचे नेतृत्व करीत होते. त्यापैकी सांगली गटाचे नेतृत्व मा. वसंतरादादा पाटील यांचेकडे होते. दादांनी आपल्या असिम त्यागाने, संघटन कौशल्याने ब्रिटीशाविरोधी प्रचंड लढा उभारला. दादांच्या जन्म सांगली जिल्ह्यातील पद्माळे गांवी १३ नोव्हें १९१७ ला झाला. वसंतदादा अवघे एक वर्षाचे असताना प्लेगाच्या साथीत अवघ्या दोन तासांच्या अंतराने वडील बंडूजी आणि आई रुक्मिणी यांचा मृत्यु होतो आणि दादांना, आजीच्या आणि कागलल मामांच्या सानिध्यात प्रेम सावलीत आल्या प्रसंगाला गोड मानून जगावे लागले. त्यांच्या आज्जीचा वसंतरावावर एवढा विश्वास होता की त्या म्हणत, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी दोन दिवाळीत जन्मलेला वसंता काहीतरी करील आणि घरा-घरात आनंद निर्माण होईल. आजीचे हे बोल दादांनी स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासनव्यवस्था आल्यानंतर महाराष्ट्राचा तीन वेळा मुख्यमंत्री म्हणून कारभार लोकाभिमुख करताना विश्वास सार्थ करुन दाखविला.

१९३० ला म. गांधीजींनी सविनय कादेभंगाची चळवळ उभारली त्यावेळी अवघ्या तेरा वर्षाच्या दादांनी गावातील तरुण पोरांना संघटीत केले. म. गांधीजीच्या कार्यात सहभाग घेतला. त्यानंतर ते १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सांगली संस्थानात स्वत:ची लढावू संघटना उभारली. या काळात त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. पण सांगलीचा जेल फोडून कृष्णामाईच्या डोहात उडी मारुन मी माझी मातृभूमी ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातून मुक्त केल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही, हे दाखवून दिले. वसंतदादा म्हटले की, ब्रिटीश सरकारचे धावे दणावून जात. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची भाषावार प्रांत रचनेत निर्मिती झाली. दादांनी विचार

केला जनतेला केवळ स्वातंत्र्य मिळून उपभोगाचे नाही. या स्वातंत्र्याचे सुराज्यात रुपांतर व्हायचे असेल तर समाजाशी नाळ असणारे समाज सुख-दु:खात सामील असणारे दृष्टे लोक राज्यकर्ते म्हणून पुढे यावेत, त्यांनी शासन संस्थेचे नेतृत्व करावे. म्हणून दादा, राजकारणात सक्रीय झाले.

१९७७ ते १९८५ या कालावधीत तीन वेळा दादा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, दादांनी सहकार, कृषीउद्योग, शिक्षण क्षेत्रात काम करताना सामान्यमाणसाशी जिव्हाळ्याचे नाते जोडीत अखंडीत सदतीस वर्षे राजकारणातून समाजकारण केले. ते प्रदीर्घकाळ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय पदाच्या कारकीर्दीत, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी ''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण-प्रसार'' या ध्येयवादाने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. बापूजींच्या या कार्याला दादानी वरदहस्त दिला. संस्था विकसित होत असताना सत्तेचे पाठबळ बहुजनांच्या उध्दारासाठी वापरले.

वसंतदादांच्या सामाजिक जाणीवांचा केंद्रबिंदू बळीराजा होता. त्याची कृषी व्यवस्था सुधारली तरच त्यांचे जीवनमान सुधारेल आणि भारताच्या अर्थकारणाला गती मिळेल या दृष्टीने दादानी आपल्या सत्तेचा वापर शेती प्रगती आणि शेतीपुरक उद्योग व्यवस्था विकसित करण्यासाठी केला.

मानवी सुखाचा शोध सहकार चळवळ –

दादांच्या डोक्यात सहकार विषय हा अगदी लहानपणापासूनच होता. त्यांनी लोकवर्गणी काढुन ग्रामस्थांच्या सहकार्याने तासगावहून पद्माळे या आपल्या गावी जाणार रस्ता केला. नदीवर घाट बांधण्याचे कार्य सुरु केले. सहकार हाच मानवी विकासाचा केंद्रबिंदू मानून सहकारी संस्था स्थापन केल्या. पाणी प्रश्नाविषयी दादांचा अनुभव आणि प्रचंड अभ्यास होता. महाराष्ट्राच्या दुष्काळी भागापासून पंजाबमधील लिफ्ट कॅनॉलपर्यंत त्यांचा अभ्यास होता. ते प्रयोगातील, कृतीशिल नेते होते. पद्माळे गावी त्यांनी पहिली डिझेल इजिनवर उपसा जलसिंचन योजना सुरु केली. त्यानंतर अंकलखोपला दादांची स्मरण शक्ती, नेतृत्वगुण संघटन कौशल्य, समाजमनस्कता आकलन शक्ती निर्णय घेण्याची क्षमता प्रचंड असल्याने सहकार त्यांनी वाढविला. १९५२ ते १९७२ या काळात त्यांनी सहकारात प्रचंड काम केले.

शेतकरी सहकारी साखरकारखान्याची स्थापना:-

भारतातील सर्वात मोठा सहकारी साखरकारखाना त्यांनी माधवनगरला उभारला. या कमी यशवंतराव चव्हाण साहेबांनी त्यांना मोलाची मदत केली. दादांचे वैशिष्ट्ये म्हणजे शेतीच्या वावरातील बांधावर उभे राहून ऊसाच्या लागवडीपासून कापणीपर्यंत शेतकऱ्यांना सातत्याने मार्गदर्शन केले. केवळ साखर कारखाने उभारुन थांबू नका. तर जोडीला पूरक उद्योगधंदे उभारण्यास त्यांनी लोकांना प्रोत्साहन दिले. शेतीला पाणी पुरवठा व्हावा यासाठी''पाणी आडवा, पाणी जिरवा''योजना सुरु केली. ते म्हणत, मी पुस्तक वाचले नाही., पण मी माणसं वाचली, आजही मी माणसचं वाचतो.

शैक्षणिक क्षेत्रात वैद्यक व तंत्र निकेतनची

स्थापना:-

उच्चशिक्षणाबाबत महाराष्ट्रातील मुलांना परराज्यात विशेषत: कर्नाटक प्रांतात जावे लागे आणि दूर जाऊन शेतकऱ्यांच्या मुलांना शिकणे शक्य नाही. आर्थिक दृष्ट्या शेतकऱ्याला ते परवडणारे नाही. तेव्हा शेतकऱ्याची मुले शिकली तरच शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल. तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीत आधुनिकता येईल. आणि स्वातंत्र्योत्तर काळातल्या नव्या पिढीला सुराज्याचा लाभ झाल्याचा आनंद मिळेल. या हेतून विनाअनुदान शैक्षणिक संस्था स्थापन केली. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे त्यांनी सांगलीजवळ बुधगाव येथे इंजिनिअरींग कॉलेज काढले. आज महाराष्ट्र वैद्यक आणि तंत्रज्ञानक्षेत्रात शैक्षणिक सुविधाबाबत आघाडीवर आहे याचे श्रेय दादांना आहे. अशा महाराष्ट्र भाग्य विधात्याच्या नावाने माझे महाविद्यालय आज शिवाजी विद्यापीठात गुणवत्तेचा कलश घेऊन स्व:ताचे वेगळेपण सिद्ध करत आहे. आमचा लौकिक वेगाने वाढला आहे. ते वसंतदादारुपी अलौकिकत्व प्राप्त झालेल्या नेत्याच्या नावामुळेच अशी माझी धारणा आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात दादांचे शताब्दिवर्ष विविध उपक्रमांनी संपन्न होत आहे, अशा जाणत्या नेतृत्वास त्यांच्या जन्म शताब्दीवर्षानिमित्त शब्दसुमने वाहून मी त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करते.

■■■

माई

सर्वच तू माझे माई
नित्य वंदन करते तुजला
सर्व गोष्टींच्या कृती मध्ये
विचार करते तुझा.

एक क्षणभर दूर तुजपासून राहण्याचा
विचार मी नाही करु शकत
दूर तुजपासून असते जेव्हा जेव्हा
तेव्हा तेव्हा विचार करते तुझा.

असतेस समोर तेव्हा तेव्हा
डोळे भरुन बघत असते मी तुझ्याकडे
तुझ्या प्रत्येक बोलण्यातील शब्दाकडे
लक्ष देऊन ऐकत असते.

कधी होतेस तू नाराज माझ्यावर
कधी रागवतेस तू माझ्यावर
कधी अबोल राहतेस तू माझ्यावर
कधी त्रास करून घेतेस तू माझ्यासाठी स्वत:ला.

हे सर्व तू करताना माझे
मन व्याकूळ होते
तुला होणारे क्लेश पाहुण
हृदयाचे पाणी पाणी होते.

माई माझे माउली
झाले माझे जीवन
सार्थक जेव्हा तू
माझी आई झालीस तेव्हा

कु. शालिनी सतिशराव खराडे
बी.कॉम.भाग १



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञ

(वैचारिक लेख)

कु. सायली शंकर पाटील
बी.एस्सी.भाग३

''कुण्या माऊलीच्या लेकरानं
दिशा दाही दिपावल्या
पाणी पिणाऱ्याही गाई
क्षणभर थांबल्या, विसावल्या !''

या कवितेच्या ओळी अगदी सार्थ ठरतात त्या फक्त 'शिक्षणमहर्षी प.पू.डॉ. बापूजी साळुंखे यांनाच.' आजचे एकविसावे शतक हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगत शतक म्हणून ओळखले जाते. धावत्या युगात व्यक्तीपूजा त्याज्य मानली जाते. पण जिथं अलौकिक डोळे दिपवणारे सौंदर्य दिसते. तिथं मस्तक नम्र होणं म्हणजेच अप्रत्यक्षपणे व्यक्तीपूजाच ठरते. कोणत्याही सत्कार्याला, संकल्पनेला व चांगल्या कामाला नेतृत्वाची गरज असते. आपल्या देशाची कूस ही अशीच आहे. जिथे हजारो मोती जन्माला येतात. येथे एकापेक्षा एक अलौकिक विभूतींची आरास मांडलेली आहे. ही भूमीच अशी आहे की बघणाऱ्याला हेवा वाटेल, असूया वाटेल. ही अशी कर्मभूमी आहे जिथे मृगाच्या पावसाने अणुरेणूही केशरी सुगंधाने दरवळून जातील. याच महाराष्ट्र भूमिवरील एक महापुरूष ज्यांनी शैक्षणिक क्षेत्रात अजोड कार्य केले ते म्हणजे 'परमपूज्य डॉ. बापूजी साळुंखे.'

महाराष्ट्रातील पाटण तालुक्यातील रामापूर या गावी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा जन्म ९ जून १९१९ रोजी एका सुसंस्कृत आणि सुशिक्षित घराण्यात झाला. त्यांचे संपूर्ण नाव गोविंद ज्ञानोजीराव साळुंखे त्यांचे आईवडील अगदी लहाणपणीच देवाघरी निघून गेले. कोवळ्या, फुलपाखरासारख्या बागडणाऱ्या वयातच त्यांचे 'मातृ-पितृ' छत्र हरवल्यामुळे ते त्यांच्या सुखापासून वंचित झाले. परंतु, असीम बुद्धीमत्ता, जिज्ञासूवृत्ती, सहनशीलता, चिकाटी या गुणांमुळे त्यांचे जीवन भविष्यकाळात सर्वस्पर्शी आणि हृद्यस्पर्शी बनले. बापूजींचे बालपण अगदी हालाखीत गेले. पण परिस्थितीच माणसाला घडविते, म्हणतात ना ते खरेच आहे. कारण याच परिस्थितीने त्यांना मोठे बनवले. गोविंदराव जसे अभ्यासू होते तसेच व्यासंगी वक्ते देखील होते. पांढऱ्या शुभ्र पोषाखात गोविंदराव वेगळे आणि उठून दिसतं, त्याचप्रमाणे वादविवादात ते नेहमीच सरस ठरत. ही त्यांची कृती-उक्ती पाहून श्री. आर. डी. पाटील यांनी सर्वप्रथम गोविंदरावांचे 'बापूजी' असे नामकरण केले आणि सर्वजण त्यांना 'बापूजी' म्हणू लागले.

कर्मवीरांनी स्थापन केलेली 'रयत शिक्षण संस्था' ही केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात , जगात परिचित आहे. या संस्थेचा सर्वधर्मपंतियांची संस्था म्हणून नावलौकिक आहे. बापूजींनी या संस्थेसाठी गोळा केलेला गौरवनिधीचा

उच्चांक बघून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांना सातारा येथील महाराजा सयाजीराव महाविद्यालयात शिक्षक म्हणून नेमले. बापूजी हाडाचे शिक्षक होते. शिक्षक खऱ्या अर्थाने देशाचा आधारस्तंभ असतो. जनसामान्यांचा मार्गदर्शक असतो, याची जाणीव बापूजींना होती.

तो काळ असा होता की लोक अशिक्षित होते. अंधश्रद्धा, हालअपेष्टा अशा अनेक समस्यांनी ग्रासलेले होते. सर्व सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचत नव्हत्या. त्यांना जर शिक्षित बनवायचे असेल तर शिक्षिण हा एकच मार्ग लक्षात घेऊन समाज अंधश्रद्धेपासून दूर करण्यासाठी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

'असे गर्जुनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा,
परंपरेच्या बेड्या तोडूनी शिकण्यासाठी उठा.'

असे म्हणून त्यांनी संपूर्ण समाजाला शिकण्यासाठी प्रेरित केले. श्री स्वामी विवेकानंद संस्था, कोल्हापूर ही महाराष्ट्रातील अग्रनामांकित शिक्षण संस्था 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयवादाने प्ररित होऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी इ.स १९५४ साली कराड येथे कृष्णा कोयनेच्या प्रीतीसंगमावर मुरलीधरांच्या देवळात या शिक्षणसंस्थेची स्थापना केली.

खरं तरं, बापूजींचा शैक्षणिक विचार या संस्थेच्या बोधचिन्हामध्येच आहे. संस्थेच्या बोधचिनहामध्ये पाणी, कमळ, पणती, ज्योत, प्रकाश व ॐ आहे. पाणी म्हणचे जीवन, त्याचे तरंग म्हणजे हृद्यशीलता आहे. कमळ भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे. कमळ हे निर्मल जीवन या अर्थी वापरले आहे. कमळातील पाकळ्यांवर शिक्षण हा शब्द आहे. पणती, ज्योत व प्रकाश ही ज्ञानाची प्रतिके आहेत. ज्योतीने ज्योत पेटवावी व विद्येचा प्रसार करावा ही अपेक्षा व्यक्त केली आहे. पाकळ्यांवर दोन पणत्या आहेत. पण त्यांच्या ज्योतीवर ज्ञान, विज्ञान व सुसंस्कार हे शब्द आहेत. ज्ञान, विज्ञान म्हणजे शिक्षण. * ज्योतीच्या प्रभेतून ईश्वर वाचक अक्षरांची निर्मिती आहे. सुसंस्काराची प्रभा आहे तेथे ईश्वर दर्शन होणारच!

शिक्षणाने मनुष्य ज्ञानी व्हावा, त्याचबरोबर तो सुसंस्कारी व्हावा, यासाठी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, त्याग, सेवा व प्रेम या मानवी गुणांचे ज्ञान शिक्षणाद्वारे व्हावे व एक सुसंस्कारक्षम नागरिक निर्माण व्हावा आणि त्यातून नीतिमान आदर्श आणि चारित्र्य संपन्न समाज निर्मिती व्हावी अशी बापूजींची अपेक्षा होती. गीता व उपनिषदे यांच्या विचारांचा, आचारांचा व उपदेशाचा मानवी मनावर संस्कार होऊन आदर्श, त्यागी, राष्ट्रप्रेमी, नीतिमान नागरिक घडावा. त्यातून सद्वर्तने, सुसंस्कारी, शीलसंपन्न समाज निर्माण व्हावा. समाजामध्ये विधायक परिवर्तन घडावे असा बापूजींच्या जीवनाचा ध्यास होता. म्हणून त्यांनी ही शिक्षण संस्था स्थापन करून शैक्षणिक विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केला.

बापूजींचे चरित्र पाहून व त्याग, सहनशीलता आणि खडतर असा जीवनप्रवास पाहून मला सांगावस वाटतं की–

''लहरों से डरकर नौका कभी पार नही होती,
कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती!''

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासाच्या वाटचालीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने मोलाची कामगिरी बजावली आहे. ग्रामीण डोंगराळ मागासलेल्या भागात शिक्षणाची गंगा पोहचविण्याचे कार्य डॉ. बापूजी साळुंखे आणि स्वामी विवेकानंद संस्थेने केले आहे. आज या शिक्षण संस्थेची ३७४ शैक्षणिक संकुले आहेत. याचे श्रेय जाते ते फक्त शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनाच.

खरंच टाकीचे घाव सोसाल्याशिवाय देवपण येत नाही म्हणतात ना ते खरेचं आहे. पण डॉ. बापूजी साळुंखे यांच्या वाट्याला यापेक्षाही यातना सहन कराव्या लागल्या. अत्यंत हालाखीचे जीवन जगावे लागले. पण ते कधीच डगमगले नाहीत. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये म्हणून सर्व झटले, झगडले. पण आजचा तरूण योग्य मार्गावर आहे का? हे देखील आज गरजेचे आहे. नोकरी मिळावी म्हणून सर्व विद्यार्थी भारंभार पदव्या मिळवतात. पण तो सुजाण नागरिक आहे का? या गोष्टीवर विचार करणे आज गरजेचे वाटत आहे. समाज सुशिक्षित बनत आहे पण माणसातलं माणूसपण हरवत चाललयं अशा वेळी मला आठवतात ती 'संस्कारमुल्ये.'

बापूजींना परिस्थितीची जाणीव आणि मूल्ये दोन्ही होते. सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक वृत्तीस आळा, त्याग, सेवा व प्रेम या मानवी गुणांचा अवलंब करा. या जगात पैसा, संपत्ती सर्वकाही पुन्हा मिळेल पण चारित्र्य एकदा गमावलं तर परत कधीच मिळणार नाही. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार या गोष्टीचा अवलंब करुन ध्येयाकडे वाटचाल करा. जगाशी प्रामाणिक असो वा नसो पण स्व:ताशी प्रामाणिक रहा. असा अनमोल संदेश डॉ. बापूजी साळुंखे यांनी आपल्या जीवनामध्ये दिला.

आज असे हे थोर महापुरुष आपल्यामध्ये नाही. परंतु, त्यांच्या कार्याचा, स्फूर्तींचा गंध-सुगंध एखाद्या फुलाप्रमाणे आज महाराष्ट्रात दरवळत आहे. अशा या अनमोल व्यक्तीने आपले जीवन दुसऱ्यांसाठी वेचले म्हणून शेवटी एवढचं म्हणावसं वाटतं-

''जगायचे असेल तर अस जीवन
जगल्यासारखं वाटल पाहिजे
दुसऱ्यांसाठी जगताना
थोड रक्त आटलच पाहिजे.''





योद्धा संन्यासी- स्वामी विवेकानंद

(वैचारिक लेख)

– कु. फरहिन खलिकुज्जमा अन्सारी
बी.एस्सी.भाग २

''तुला मानवा या ठायी ,
जन्म पुन्हा पुन्हा नाही।
बहुमोलाचे लाभले जीवन,
माणसा तू माणूस बन.''

असे वारंवार आपल्या काव्यपंक्तीतून, आपल्या हृदयातून सांगणारे महान विश्वमानव; थोर संन्यासी, आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान, ज्ञानाची ज्योत प्रत्येक मानवाच्या मनात बिंबविणारे; माझ्या जीवनाचे ध्येय अगदी थोड्या शब्दात सांगता येईल, असे अवघ्या मानव मात्राला जाणीव करुन देणारे महामानव म्हणजे स्वामी विवेकानंद त्यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी बंगाल प्रांतात झाला. विश्वनाथबाबू ज्यांचा पिता, भुवनेश्वरी देवी ज्यांची माता आणि सचिदानन्द स्वरुप तत्वाची साक्षात मुर्ती असलेले भगवान श्रीरामकृष्ण ज्यांचे सद्गुरु तो साऱ्या विश्वात विख्यात होऊन गेलेला नरेंद्रनाथ, म्हणजेच श्रेष्ठ राजयोगाचे भाष्यकार स्वामी विवेकानंद होत.

मुलाचा जन्म ही भारतीय कुटुंबात नेहमीच फार महत्त्वाची घटना मानली गेली आहे. भुवनेश्वरीदेवींच्या दृष्टीने मुलगा होणे ही विशेष आनंदाची गोष्ट होती, कारण चार मुलींच्या पाठीवर नरेंद्राचा जन्म झाला होता. बाल्याची सीमा ओलांडली गेली, ती नरेंद्राचे नाव शाळेत घातले त्या दिवशी बालक नरेंद्राला तो मोठा महत्त्वाचा दिवस वाटला. त्या दिवशी सकाळच्या प्रहरी दत्त कुटुंबांचे पुरोहित आले, विद्येची देवता माता सरस्वती हिची रीतसर पूजा झाली. सर्व कुटुबीय मंडळी उपस्थित होती. नरेंद्र मोठ्या उत्साहात होते; नरेंद्र शाळेत जाऊ लागले. पण त्यांची ही शाळा फार दिवस टिकू शकली नाही. कारण, असे होते की, आजुबाजूचा परिसर, आसपासचा मुलांच्या बोलण्यात येणारे शब्द ग्राम्य किंवा अशिष्ट शब्द होते. या सर्व कारणांमुळे त्यांच्या वडिलांनी त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था घरीच केली. त्यांचे असे विचार होते की.....

''उडत्या पाखराला,
परतेची तमा नसावी.
नजरेत सदा नवी,
दिशा असावी.
घरट्याचे काय,
बांधता येईल केव्हाही.
परंतु, क्षितिजापलिकडे,
झेप घेण्याची मनात.
जिद्द असावी.''

नरेंद्रच्या बुध्दीचे तेज हे इतर मुलांच्या बुध्दीच्या तुलनेत वरच्या दर्जाचे होते. संगीत हा ईश्वराकडे घेऊन जाणारा सर्वांत जवळचा मार्ग असतो. म्हणून त्यांनी शास्त्रीय संगीताचे ज्ञान आपल्या आई-वडीलांकडून घेतले. अशाप्रकारे नरेंद्रांचे बालपण हे अगदी सुशिक्षित व सुसंस्कारमय

रीतीने पार पडले.

कन्याकुमारीच्या समुद्रातील शिलाखंडावर बसलेले असताना त्यांनी स्वत:च्या मनाशी काही संकल्पना केल्या, की भारताला जर महासत्ताक बनवायचे असेल तर त्यांच्यातील अशिक्षितपणा नष्ट करणे गरजेचे आहे. १० मार्च, १८९४ या दिवशी शिकागोहून स्वामी रामकृष्णांना लिहिलेल्या पत्रात स्वामीजींनी म्हटले आहे, की –''भारतापुढील जटिल प्रश्नांचा विचार करताना आणि विशेषकरुन आपल्या जनतेचे अज्ञान आणि दारिद्र्य समोर आल्यामुळे मला झोप लागत नाही. पण कन्याकुमारीच्या मंदिराच्या आणि नंतर आपल्या भारताचा अगदी कडेच्या टोकाशी असलेल्या त्या खडकावर स्वामीजी बसले असताना त्यांच्या मनात एका योजनेचे आकार घेतला. इकडे–तिकडे भटकत असलेले इतके संन्यासी आपण आहोत आणि आपण सर्वांनी लोकांना अध्यात्माचा उपदेश करायला हवा. यासाठी त्यांनी खेड्या–पाड्यात जाऊन आपल्या ज्ञानाचा प्रसार केला. लोकांना 'युवा' शक्तीचे विचार पटवून दिले. कारण, स्वामीजींचे म्हणणे होते की भारताला सुधारण्यासाठी सर्वांत महान ताकद ती म्हणजे 'युवा' पिढी होय. स्वामीजी नेहमी म्हणत की,'Unity is the strength of our nation' भारताला दारिद्र्य मुक्त बनायचे असेल तर सर्वांनी एकत्रित झाले, संघटित झाले पाहिजे. यांसाठी गावातील लोकांना त्यांनी खालील उपदेश केला, तो असा की,

''सुगंध फुलांचा घेताना
पाकळ्या त्यांच्या मोजूनका.
भाषा हृदयाची बोलताना,
शब्द त्यातील तोलू नका.''

स्वच्छता, शांतता आणि सौंदर्य यांची जोड मठ–मंदिरांना कशी असावी, याचा हा आदर्श विवेकानंदांनी घालून दिला आहे. ''योद्धा संन्यासी'' असे वर्णन विवेकानंदांचे केले जाते. पण या वीरवृत्तीच्या ऊर्जस्वल वाणीतून विवेकानंदांमध्ये तितकीच उत्कट करुणाशीलता होती. या दोन गोष्टी एकत्रित आढळत नाहीत. कुरुक्षेत्राच्या रणांगणावर उभा राहिलेल्या अर्जुनाच्या हृदयात आपल्या आप्तस्वकीयांविषयी करुणा जागी झाली, आणि त्याच क्षणी त्यांची वीरवृत्ती एकत्र नांदू शकत नाहीत, असा त्यातील अभिप्राय आहे. स्वामी विवेकानंदांनी अतिशय महत्त्वपूर्ण विचार लोकांपुढे मांडले ते असे होते की–

१) ''दिवसात तुम्हाला एकही समस्या आली नसेल, तर तुम्ही चुकीच्या रस्त्यावरुन जात आहात असे समजावे.''

२) ''जी व्यक्ती तुमच्या चेहऱ्यावर हास्य फुलवू शकते, तीच तुमच्या आयुष्याला अर्थ देऊ शकते.''

३) ''देखणेपणावर जाऊ नका, सौंदर्याला कोमेजण्याचा शाप असतो.''

या गोष्टी पार पाडत आपण आपल्या मातृभुमीचे, राष्ट्राचे संरक्षण परकीय शत्रुंपासून केले पाहिजे व त्यांना पुढील विचाराने संबोधले पाहिजे,–

''हिमालय की चोटी से,
फिर आज हमने ललकारा है।
दूर हटों ए दुनियावालों,
हिंदुस्तान हमारा है।''

विवेकानंदांची सारी दृष्टी मानवाच्या आंतरिक शक्तींना जाग आणण्यावर, त्याची आत्मबुध्दी बलवान करण्यावर, त्याला मन: शांतीचा मार्ग दाखवण्यावर आणि त्याच्या जाणिवेच्या कक्षा अधिक अधिक विशाल कशा होत जातील, यांवर

होती. यासाठी त्यांनी 'रामकृष्ण' मिशन या संस्थेची स्थापना केली.

श्रीरामकृष्ण आणि विवेकानंद यांच्या आध्यात्मिक जीवनाच्याद्वारे व्यक्त होणारा तत्वविचार, जेथे वंश, देश आणि धर्म सारे भेद मावळतात, अशा विश्वाकडे घेऊन जातो. जगातील साऱ्या मानवांत बंधुभाव जागा करण्याचा रस्ता येथे गवसतो. अशा व्यापक आणि उदार धारणेकडे घेऊन जाणारा हा मार्ग विवेकानंदांनी आपणा सर्वांसाठी खुला करून ठेवला आहे. विवेकानंदांचे श्रेष्ठत्व वर्णन करुन ठेवला आहे. विवेकानंदांचे श्रेष्ठत्व वर्णन करताना सिस्टर ख्रिस्तीननी म्हटले आहे की, " Blessed is the country where he was born, blessed are the people who were on the earth at the same time, and blessed, thrice blessed are those few She at at his Feet " याचा अर्थ असा आहे: तो देश धन्य होय जेथे विवेकानंद जन्माला आले, ते लोक धन्य होत जे त्याच वेळी या अवनीतलावर वावरत होते, आणि त्यांतीलही अगदी थोडे असे ते धन्य होत, ते त्रिवार धन्य होत की जे ज्यांच्या चरणांशी बसू शकले. याहून कोणत्या अधिक समर्पक शब्दांत या विश्वमानवाचा उज्ज्वल महिमा वर्णन करता येईल?

स्वामी विवेकानंद , एक महायात्रिक आणि विश्वमानव. भारताच्या भूमीत जन्माला आलेला नरेंद्रनाथ दत्त या नावाचा एक युवक स्वामी विवेकानंद या नावाने साऱ्या जगात विख्यात झाला. त्यांनी केलेले महान कार्य आणि अवघ्या मानवजातीसाठी दिलेले समृध्द विचारधन यांतून त्यांची जी प्रतिमा उभी राहिली, ती एक विश्वमानव आणि विश्वधर्मांचा उद्‌गाता अशी रामकृष्ण संघाच्या सर्व शाखांमधून दररोज म्हटल्या जाणाऱ्या स्वामी रामकृष्णानंदांनी रचलेल्या वंदनपर श्लोकात क्षमायाचनापूर्वक अल्पसा बदल करुन, अतीव नम्रतेने स्वामी विवेकानंदांच्या प्रणिपात करताना अखेर एवढेच म्हणावयाचे आहे :

नमः श्रीयतिराजाय विवेकान्दसूरये।
श्रीरामकृष्णशिष्याय विश्वधर्मप्रवर्तिने।।
** तत् सत्।*

विचारधन

१) खुप माणसे भेटली, आपलं म्हणणारी...
पण खुपच कमी माणसे होती
'आपलंपण' टिकवणारी
समुद्र होवून क्या फायदा...
बनायचं असेल तर तळे बना,
जिथे वाघ पाणी पितो, तो पण मान झुलवून!

२) मुक्या भावनांना तेव्हा शब्दांची गरज नव्हती,
मनातल्या समुद्राला थांगपत्त्याची गरज नव्हती
चांदण्यांच्या ओहोटीतही शब्दचंद्र अपूर्ण होता,
निदाण तेव्हा निमित्ताला कारणांची गरज नव्हती.

३) चांगली माणसे व चांगले पुस्तक या दोनच गोष्टी आपलं आयुष्य बदलु शकतात.

४) आकाशाला माझे हात टेकतील असे नाहित,
चंद्र-सूर्य साठवून ठेवीन असे डोळे नाहित,
पण तुमची मैत्री साठवून ठेवीन एवढे
मोठे हृदय नक्कीच आहे माझे

कु. स्नेहल सहदेव कुंभार
बी.ए.भाग २



महिलांवरील अत्याचार जबाबदार कोण?

(वैचारिक लेख)

– कु. सुवर्णा महादेव कदम
बी.एस्सी.भाग २

प्रत्येकाची दिवसाची सुरुवात रोज सकाळी वृत्तपत्र वाचनाने होते. सर्वांना उत्सुकता असते आजच्या बातम्या काय, नवीन घडामोडी कोणत्या, मॅच कोणी जिंकली, आज मॅच कोणाची वगैर – वगैर. सगळ्या बातम्या रोज नव्या पण एक बातमी मात्र रोजच मन सुन्न करणारी, अस्वस्थ व्हायला लावणारी. चार–पाच वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या बातम्या तर ठरलेल्याच कुठे बलात्कार, कुठे विनयभंग, कुठे त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या, कुठे दारु पिऊन पतीची मारहाण, कुठे छेडछाड रोजच ह्या अत्याचाराच्या बातम्या, रोजच होत असलेले हे प्रकार; आणि दोषी कोणाला ठरवलं जातंय तर स्त्रीलाच! 'चोर सोडून संन्याशाला फाशी' याप्रमाणेच आहे हे सगळं.

रोज वाटतं उद्याची पहाट नव्या चैतन्याची असेल काही तरी बदल घडला असेल, पण नाही आत्मविश्वासालाच अविश्वास दाखवण्याची वेळ येते, मग वाटतं,

'उजाडले म्हणू कसे
काजळले किरण पुन्हा
रात्र तीच सामोरी
हाकेवर मरण पुन्हा'.

रोज महिलांवर होणारे अत्याचार थांबणार तर कधी? पुरातन काळ बघितला तर तो सर्वोच्च काळ ठरेल त्या काळातील सीता, द्रौपदी यांना स्वयंवराचा अधिकार होता त्या मोठमोठ्या अध्यात्म चर्चेत सहभाग घेत असत त्यांना स्वातंत्र्य होतं त्यामुळे तो काळ महत्त्वाचा ठरतो पण अत्याचार तेव्हा सुद्धा होतेच आणि आजसुध्दा आजची स्त्री उपभोग्य वस्तू बनली आहे. परकियांच्या झालेल्या आक्रमणानंतर स्त्री कोणाच्या तरी आधारात आणि अधिकारात राहू लागली आपल्या संस्कृतीने तिच्या नाजुक पायात, रुढी, परंपरांच्या बेड्या ठोकल्या आणि स्त्री मुळापासून हादरली. तिची होणारी अवहेलना पाहून लोकांना मुलगीच नकोशी झाली. नंतर स्त्री साक्षर झाली, सुशिक्षित झाली आणि घराबाहेर पडू लागली. घराबाहेर पडली खरी पण समाजातील वाईट नजरांची ती भक्ष्य बनली. बसमध्ये छेडछाड, रस्त्यावर रोडरोमिओंचा त्रास, हुंडाबळी, स्त्रियांना मुलगीच झाली म्हणून मारहाण, चारित्र्याच्या संशयावरून खून कितीतरी अत्याचार सहन करावे लागतात.

२१ व्या शतकातील महिला आम्ही चारही दिशांमध्ये आज आघाडीचं नेतृत्व करतोय, अंतराळात पोहचलो, लढाऊ विमान चालवू लागलो, ऑलंम्पिकमध्येसुध्दा नाव कमावलं एकही क्षेत्र स्त्रीशिवाय राहिलं नाही; तरीही स्त्री सर्व प्रकारच्या अत्याचारांना बळी पडते आहे. याला जबाबदार आहे, आपला समाज आणि समाजमनाची प्रवृत्ती! एका मुलीला शिकवलं जातं 'मान खाली घालून जावं, असं करु नये, तसं करावं.' पण मुलांना का शिकवल जात नाही; स्त्रीचा आदर करावा, आपल्या

बहिणीला सुरक्षित ठेवण्यासाठी अगोदर आपण दुसऱ्या मुलीला संरक्षण द्यावं, बहिणीला काही त्रास झाला तर लगेच काठचा, दगड घेवून मारहाण होते; पण स्वत: मात्र कॉलेजच्या बाहेर शिट्ट्या फुंकत, कमेंट्स करत असताना त्यावेळी इतर कोणाच्या बहिणीला त्रास होत असेल याचा का विचार नाहीत करत हे भाऊ? घरातून मुलांना हे का शिकवलं जात नाही, असं करु नये म्हणून किती दिवस त्यांना वंशाचा दिवा म्हणून पाठीशी घालणार आहेत. हे जर घरातूनच मुलांना शिकवलं गेल तर छेडछाडीचा त्रास तरी कमी होवू शकेल ना! पण नाही, आपला समाज मुलींनाच दोषी ठरवत बसतो 'ती अशीच, अशीच करते म्हणून तिला असा त्रास होतो, पण रोज बसमधून जाताना सुद्धा मुलांनी जाणतेपणाने केलेला स्पर्शसुद्धा अजाणतेपणानं गप्प सहन करावा लागतो; कारण ते कोणला दिसलेलंच नसतं, दंगा करावा तर बस आहे, गर्दी आहे धक्का तर लागणारच हाच आमच्या लोकांचा विचार असतो. पर मला वाटते. बसमध्ये मुलींचा धक्का मुलींना लागत नाही. गर्दीमुळे मुलींचा स्पर्श मुलींनाच का होत नाही. नको त्या ठिकाणी असे स्पर्श आणि धक्के गर्दीचा फायदा घेवून काही लंपट प्रवृत्ती देत असतात आणि मुली ते निमुटपणे सहनही करीत असतात. कुठवर चालणार ही मुस्कटदाबी?

स्त्रियांना स्वातंत्र्य मिळून सुद्धा तिचं परावलंबी जीवन तिनं शिक्षण कोणतं हे घ्यायचं घरच्यांवर अवलंबून, तिनं नोकरी करायची की नाही, पगार काय करायचा, हेसुध्दा घरच्यांवरच अवलंबून; म्हणून कितीतरी महिला उच्चशिक्षित असूनसुद्धा नोकरी न करता गृहिणी म्हणून जबाबदारी सांभाळतात. नोकरी करणाऱ्या महिला घरातल्या जबाबदाऱ्या पार पाडून नोकरीला जातात. तिथेही त्या अग्रेसर असतात दिवस भराच्या थकव्यानंतर त्यांची चिडचिड होते. तर ती अशीच का करते? म्हणून चारित्र्याचा संशय आणि त्यातून तिची एकतर आत्महत्या नाहीतर खून आणि खूनाच नाव आत्महत्या. विचार आमचे तेच, त्याजभोवती फिरणारे आणि निषेध म्हणून जाळपोळ, मारामारी, कडकडीत बंद पण त्यांच्या कुठे लक्षात येतंय ते रेशीम किड्यासारखं स्वत:च विणलेल्या विजारांच्या कोषात अडवून मरताहेत ते. आपण अविश्वासाने अत्याचार करायचे आणि आपणच निषेध करायचा पण विचार बदलायचा नाही. याबाबतीत सगळे एका माळेचे मणी. इथे समाजमन दोषी नाही का?

अलिकडे रोज एक बलात्काराची घटना ऐकायला मिळते. नाराधम श्वापदांनी अगदी पाच-सहा वर्षांच्या बालिकांनासुध्दा सोडलं नाही असली त्यांची वासनांध प्रवृत्ती, पुरुषप्रधान संस्कृतीत त्यांच कोणी काही बिघडवू शकत नाही, हा त्यांचा पुरुषी अहंकार पण त्यांना कोण सांगणार की, पुरुषांचा पराक्रम अबलांच्या रक्षणासाठी असतो. वाढती व्यसनाधीनता मोठ्याप्रमाणात अत्याचारांना कारणीभूत ठरते आहे. कोपर्डीतील निर्भया बळी गेली ती दारूच्या नशेतच! बाजारात सहज उपलब्ध होणारी दारु आणि माणसातील श्वापद जागे करणारी कामोत्तेजक औषधे जाहिराती करुन करुन विकली जातात, यांच्यावर का बंदी येत नाही? यामुळे कितीतरी स्त्रिया अत्याचारांना बळी पडत आहेत. बऱ्याचशा घटनांमध्ये सूड घेण्याची भावना असते 'तू तक्रार का केलीस?' आणि पुन्हा काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडते आणि स्त्रीच आयुष्य उद्ध्वस्त, बरबाद होते. आणि सुपरस्टार सलमान खान सुद्धा वजन उचलल्याने येणाऱ्या शारीरिक थकण्याची तुलना बलात्काराशी करतो. कोपर्डीतील घटना पाहून तरी त्याच्या लक्षात आलं असेलच ना. बलात्कार त्यापेक्षा कैकपटीने भीषण असतो.

सगळ्या घटनांमध्ये इतकी हिंमत या नराधमांमध्ये कोठून येते? याचे कारण पैशाचा, संपत्तीचा माज, यंत्रणा वाकवण्याची ताकद असल्याचा अहंकार आणि आपले कोणीही, काहीही वाकडे करु शकत नाही हा अहंगंड.

आपल्याकडे न्याय देण्यात होणाऱ्या दिरंगाईमुळेही असे आरोपी निर्ढावतात. कोपर्डीतील आरोपींना फाशीची शिक्षा झाली असली तर कदाचित माळवाडीतील दुर्घटना घडलीच नसती. अशाप्रकारे न्याय देण्यात दिरंगाई म्हणजेच न्याय नाकारणे होय. खरं तर अशा नराधमांना, राक्षसांना वकील मिळणे म्हणजेच आमच्या स्त्रीत्वाचा अपमान वाटतो. या राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना कठोर शिक्षा होत नाही, पिडितेला न्याय मिळत नाही., कोर्टात खटले फास्ट ट्रॅक चालत नाही म्हणून नराधमांना वाव मिळतो आणि परत परत त्याच घटना घडतात.

सर्व आत्याचारांना महिलाच बळी पडतात आणि दोषीसुध्दा स्त्रियांनाच समजलं जातं. याला जबाबदार असणारी कारणंच बघितली जात नाहीत, मुलाला वेगळे संस्कार देणाऱ्या पालकांना आणि समाजाला दोषी मानलं जात नाही. समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहीजे तर तरुणपिढी घडेल. मुलीच्या जन्माला स्त्री नाही पुरुष अवलंबून आहे, हे जेव्हा सर्वांना कळेल तेव्हा सुनेचे आणि पत्नींवर होणारे अत्याचार, शारीरिक, मानसिक त्रास कमी होतील. दारुबंदी, कामोत्तेजक औषधांवर बंदी यायला पाहीजे. अपराध्यांना कठोर मृत्यूदंडाची शिक्षा व्हायला पाहिजे तर याबाबतीत वचक निर्माण होवून असे कृत्य करायला कोण धजावणार नाही. वेळीच सावध होवून आमच्या पिढीला, लहानांना योग्य ती शिकवण मिळाली पाहीजे, समाजाचा दृष्टीकोन बदलला पाहीजे तो बदलण्यासाठी आपण प्रयत्न केला पाहीजे. अन्यायाला न्याय मिळाला पाहीजे. यासाठी समाजालामध्ये प्रबोधन करणे सर्वांत महत्त्वाचे आहे. यासाठी आपण सर्वजन प्रयत्न करूया.

मातृरुपाने तुम्हांला जन्म देणाऱ्या, पत्नीरुपाने तुमची जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारुपाने तुमच्या उदरी जन्म घेणाऱ्या आयुष्यातल्या तिन्ही अवस्थांत तुम्हाला केवळ्या प्रेमाची साक्ष पटवून पुत्र, पती आणि पिता या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्रीजातीची किंमत कमी समजू नका, न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करा, नारीशक्तीला सुरक्षित करा.





मुकी

(कथा)

– कु. स्नेहल तानाजी चव्हाण
बी.एस्सी.भाग ३

रुपा, माहेरी आली ती कायमचीच. दोन महिन्यांची सासुरवाशीण. बाप मारुन दमला. आईनं देखील कमी केलं नाही. काका, आजोबा सगळे सांगून दमले, पण उपयोग झाला नाही. कारण तिलाच सासरी नांदायचं नव्हतं. रुपा, नावाप्रमाणचं रुपवान होती, चुणचुणीत, हुशार होती. बघताच कोणालाही मोहात पाडेल अशी सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला आपलसं करणारी. पण तिच्यात एकच कमी होती. कमी कसली तिचं सुंदर आयुष्यचं भंगवणारी गोष्ट होती ती. दोन वर्षाची झाल्यानंतर रुपा बोलताना अडखळायला लागली. अन् चार–पाच वर्षात बोलायची बंदच झाली. आता फक्त तात्या (वडिलांना) व बाबा (आजोबांना) एवढच काय तो उच्चार करतेय तोही कितीतरी कष्टानं तेव्हापासून तिला नाव पडलं 'मुकी' ते कायमचचं. रुपा तिचं नाव आहे, हे ही समाज विसरला असावा कदाचित. पण तिची आई 'कामाबाई' मात्र तिला रुपाच म्हणत आली आहे. एखाद्या आईनं स्वत:च्या रक्ताला त्याच्यातील न्यूनतेच्या नावानं बोलावणं शक्यही नव्हतं.

सर्वांनी दवाखान्याचा, मांत्रिक, वैदुचा फुकट सल्ला देखील दिला. लकसू (रुपाचा बाप) अन् कामानं ऐपतीप्रमाणे प्रयत्न देखील केले. सुरूवातीला, दवाखान्यापेक्षा मांत्रिक–वैदूकडचं त्याचा कल होता. कारण दवाखान्याचा खर्च परवडणारा नव्हताचं. खर्च करणार तरी कुठून? घरात अजून तीन लेकरं होती, त्यांनाच खायला घालण्याचा प्रश्न होता. तिथं रोज दवाखान्याला कुठून आणणारं. 'कामा' नं दुसऱ्याच्या शेतावर मजूरीला जावं तेव्हा आठवड्याला बाजार घरात येई तो ही अर्ध्या–अधिक पैशाचा, कारण तिच्या मजूरीच्या अर्ध्या पैशांवर लकसूचाचं अधिकार असायचा, बाजारला गेल्यावर दारु पिल्याशिवाय परतायचाचं नाही. मग उरलेल्या पैशांतून कसाबसा बाजार व्हायचा. कामाला कळत होतं. पण विचारणार कोण? कारण काठ्यासहित, लाथा–बुक्यांचा वर्षाव कधी होईल, सांगताही येत नव्हतं. त्यामुळं मुग गिळून गप्प बसणचं तिच्या नशिबी होतं.

रुपाला दवाखान्याला घेऊन जा, म्हणून कोणीतरी सल्ला दिला, सावकाराकडून पैसे मिळवून देण्याचं आश्वासन पण दिलं आणि लकसून रुपाच्या दवाखान्याला म्हणून पंधरा हजाराचं कर्ज घेतलं. कुणीतरी लांब मुंबईला जाऊन दवाखाना करायला सांगितलं होतं. हातात पैसे येताच लकसूची चैन वाढली. आता तर रोजचं दारूनं लकसू झिंगायला लागला. चार–चार दिवस घरी येईना आणि आला तर कामानं दवाखान्याचं नांव काढताचं,''तू अन् तुझ्या पोरीनं मला कर्जबाजारी केलं, तिला घेऊन तुझ्या म्हायारला निघून जा'' म्हणून दोघींना पण मारत होता. दुसरी मुलं मध्ये पडली, तर त्यांचीही सुटका नव्हती यातनं. माहेरी जाणं 'कामा'ला शक्यच नव्हतं. कारण तिथं जाऊन तरी काय करणार, तिचे आईवडील अन् भाऊ देखील ऊसतोडीला जात होते. त्यांना मदत काय मागणार?

त्यामुळे गप्प बसण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

रुपाच्या दवाखान्याचे पैसे संपले, सावकारानं सहा महिन्यातचं दुप्पट रक्कम परतफेड मागितली. त्यामुळे लकसूनं देखील ऊस तोडीचा मार्ग धरला. मुकदमाकडून उचल घेऊन थोडं-थोडं करुन चार वर्षात ऊसतोडी करुन पैसे फेडले, लकसूचं व्यसन काही कमी झालं नव्हतं. पण रुपाचा दवाखाना मात्र कायमचा बंद झाला, सुरु होण्याअगोदरचं. पण बापाचं ''तुझ्यामुळे मी कर्जबाजारी झालो, राक्षसिण पोटाला आली'' हे टुमणं मात्र सुरु झालं, जे आजअखेर बंद झालं नाही.

रुपाबरोबर सगळी मुलं शाळेला जात होती. पण ती मात्र आईच्या मागं दुसऱ्याच्या शेतात बांधावर खेळत असायची नाहीतर जनावरं घेऊन गायरानात असायची. तिनं एकदा-दोनदा सगळ्यांबरोबर शाळेला जाण्याचा प्रयत्न केला ही, पण शाळेतनं बापानं झोडत घरापर्यंत आणली. ''तुला बोलायला येत नाही अन् शाळा काय शिकतेस, गपं जनावरं राखायची, तुही एक जनावरचं होईस, तुझ्यात अन् त्यांच्यात फरकच काय हाय'', हे त्याचं बोलणं रुपाला कळतं नव्हतं; पण बापाच्या मारानं आपण काहीतरी मोठा गुन्हा केलाय शाळेला जाऊन, हे समजलं होतं. अन् हळूहळू जनावरांना तिनं आपलसं केलंही, कारण बापासारख्या क्रूर श्वापदापेक्षा ही माणसाळलेली, जीवास जीव लावणारी जनावरं तिला अधिक प्रेमळ भासत असावीत.

दोन-तीन वर्षांनी कुणीतरी तिच्या आजोबाला आणि बापाला सांगितलं मुकबधिरांची पण शाळा असते अन् आपल्या तालुक्याला (जतला) ती आहे. या शाळेत शिकून खूप जण नोकरीला लागलेत. सरकार असल्या लोकांना नोकरी देत, त्याचबरोबर पैशाची मदत पण देतं. त्यामुळे पहिल्यांदा नाही म्हणणारा तिचा बाप आजोबाच्या आग्रहापुढं झुकून राजी झाला. अन् रुपा शाळेत गेली.

आपल्याला शाळेत घातलं जातयं या एकाचं जाणिवेनं तिचं मन बागडायला लागलं, फुलपाखरासारखं. पण त्याहीपेक्षा ती अधिक खूष झाली, जेव्हा तिला शाळेचे दोन ड्रेस मिळाले. शाळेचे का असेनात पण ते तिचे होते. तिला कळतयं असं तिचा म्हणून मिळालेला, तिच्या हक्काचा हा पहिलाच ड्रेस होता. आजपर्यंत मोठ्या बहिणींचे जुने कपडेच तिला मिळत होते. त्यामुळे ड्रेस मिळाल्यावर ती अधिक खूष झाली. अन् आपल्या माणसांपासून, घरापासून आपण आता दूर राहणार, हे तिचं दु:ख पुसट होत गेलं.

शाळेच्या अभ्यासात ती रमत गेली पण वातावरणात रमलीच नाही. कारण इथं कोणी बोलतचं नव्हतं सगळं काही खाणाखुणा, इशारे करुणचं, तिला हे नकोसं वाटे. तिला बोलणाऱ्या विश्वात जायचं होतं, कारण ओठांच्या अन् चेहऱ्याच्या हालचालींवरुन समोरची व्यक्ती काय म्हणतेयं, हे जाणण्याचं अवघड कसब तिला लागलं होतं. त्यामुळे तिला ही खाणाखुणांची भाषा आवडत नसे. पण तिचीही भाषा ईशाऱ्यांचीच होती, अन् सगळा समाज तिला आपल्यातला मानतही नव्हता, हे सतत तिला कोण समजावणार?

दीड-दोन वर्षात लकसू दोन-तीन वेळा गेला होता भेटायला. तिचा घरी जाण्याचा पत्ताच नव्हता, आईलाही या काळात तिनं बघितलं नव्हतं पण सांगणार कोणाला, तिला घरी जावसं वाटल होतं पण लकसूपुढं बोलणं शक्यचं नव्हतं, बोलणार तर कशी बोलताच येत नव्हतं. दिवाळी झाल्यावर लकसू अन् कामा तिला भेटायला गेले. आईला बघताच तिला खूप आनंद झाला. इतके दिवस घरी न नेल्याचं

कारण शिक्षकांना सांगून लकसू अन् कामा तिला घरी घेऊन आले. तो तिच्या शाळेचा अखेरचा दिवस होता, लकसू अन् कामा तिला ऊसतोडीला घेऊन जाणार होते. त्यासाठीचं तर तिला घरी आणलं होतं. कारण तिथं रोज 'पन्नास' रुपयाचं वाडं गोळा केलं तरी भरपूर झालं, असा लकसूचा सरळ व्यवहार होता. अशारीतीनं रुपाची पुन्हा एकदा शाळा सुटली ती कायमचीच.

दोन-तीन वर्ष ऊसतोडी करून लकसूची ऊसतोडीची हौस भागली असावी. आता परत एकदा लकसूनं अन् कामानं दुसऱ्याच्या शेतावर मजूरीनं जाणं चालू केलं होतं. लकसूची मजूरी म्हणजे वळवाराच्या पावसासारखीच लहर आली तरच नाहीतर दारात बसून बिड्या फुंकण्याचा उद्योग होता. घर कसलं? चारी बाजूंनी कमरेपेक्षा थोडी उंच ओबडधोबड दगडांची भिंत उभारुन व मध्ये मेढीचा आधार देऊन, ओढ्यातलं पानसारं आणून घर शेकरूनं लकसू अन् कामानचं आपला वेगळा संसार सुरू केला होता, दहा-बारा वर्षांपूर्वी आता घरातून सुर्यदर्शन घेणं कोणालाही शक्य नव्हतं. कारण घरात बसायला दिवसभर वेळच नव्हता कुणाकडे. पानसारं आणून घर शेकरणं लकसूला जमत नव्हतं दारुतनं अन् बिड्या फुंकण्यातनं त्यामुळे घरची सगळी जबाबदारी 'कामा'वरचं होती.

रुपा आता बारा-तेरा वर्षाची झाली होती, आई बरोबर मजूरीला जाऊ लागली होती. काम तर सर्व मजूर बायांपेक्षा जलद करत होती पण तिला लहान म्हणून निम्मिचं मजूरी मिळे. कधी कधी असं का म्हणून रुपानं विचारातचं कामाकडं त्याचं उत्तर नसे. पण आहे हे काम बंद होईल, या भितीनं ती रुपालाचं रागानं अजून ती लहान असल्याचं सांगत असे. तिला हे पटत नव्हतं, पण आई म्हणतेय म्हणून मजूरीला जाणं भागचं होतं.

अन् एक दिवस, कामाचा मामा एक स्थळ घेऊन आला. नवरा मुलगा , छे! मुलगा कसं म्हणायचं त्याला, तो तर तिच्या वडिलांपेक्षाही वयानं मोठा होता. त्याची पहिली बायको पण होती, पण मुलबाळं नव्हतं म्हणून तो दुसरं लग्न करणार होता. त्याला मुलगी पसंत पडलीही. रुपाला विचारण्याचा प्रश्नचं नव्हता. लकसूनं केव्हाच होकार कळवला होता. जावाई ऊसतोडीला जात नव्हता. गावीच मजूरी करुन खात होता, हेचं लकसूला खूप चांगल वाटलं होतं. पाचव्या दिवशीचा लग्नाचा मुहूर्त पण काढला होता. रुपा शेवटच्या दिवसापर्यंत, नांदायला जाण्याअगोदरपर्यंत नकार देतच होती. बापाला तर खाणाखुणा करुन शिव्या-शाप देत होती. हे बघताच लकसूचा पारा चढला अन् तिला मारतचं, ''आयुष्यभर माझ्याचं नशिबाला बसणार आहेस काय?'' म्हणत वऱ्हाडाच्या गाडीत डमडममध्ये घातली. कदाचित आमच्या गावातील ही पहिलीच नवरी असावी, जिला मारतचं लग्नदारी नेली होती. 'कामा'चं मन हळहळत होतं, पण जाऊन लकसूला थांबावण्याचं धाडस मात्र तिच्यात नव्हतं तर लग्नाला आलेली सारी मंडळी तमाशा बघत ''ह्या मुकीला एवढा नखरा कशाला पाहिजे '' म्हणून आपापसात कुजबुजत होती. तर कालपर्यंत लहान असणारे आपण अचानक लग्न करण्याइतपत मोठे कसे झालो, हेच रुपाला उमगत नव्हतं.

शेवटी रुपाचं लग्न झालचं. पण नवऱ्याची दारु सवतीचा त्रास अन् सासूचा मार यांमुळे दोन महिन्यांनी नाग पंचमीला आलेली रुपा, माघारी गेलीच नाही.

बाप मारून दमला, जीवं मारून नदीत टाकण्याचा दम पण भरला, पण ऐकेल ती रूपा कसली? तिनंही निर्धारानचं लकसूला, 'मारलंस तरी चालेल पण नांदायला जाणार नाही.' म्हणून

सांगितलं. त्यामुळे घरात भांडण रोजचचं झालं आणि लकसूचं व्यसनही. समाज एक मनोरंजनाचं साधन म्हणून तटस्थपणे बघत होता.

पण रुपा मजूरीला जाऊन पैसे आणू लागली, तसा हळूहळू लक्षूचा राग मावळत गेला. तर आपल्या फाटक्या संसाराला हातभार लागतोय म्हणून कामा समाधानी होती. तर आपल्याला आता पूर्ण मजूरी मिळतेय याचा रुपाला अप्रुपभरित आनंद होता. खरतर ती सौभाग्यवती झाल्यामुळे समाजाच्या दृष्टीनं ती प्रौढ झाली होती, अन् त्यामुळे तिला बाईची पूर्ण मजूरी मिळत होती. पण तिच्यात अजूनही अवखळ बालपण होतं. सासरी जाताना कोमेजलेली रूपा आता फुलू लागली होती. तसं तिचं बालपणही परत तिच्याकडं आलं होतं. काम करताना खाणाखुणा करुन विनोद करुन ती सर्वांना हसवत होती. उड्या मारतच काम करत होती.

सारा गावं लकसूला तिचं दुसरं लग्न करण्याविषयी बोलत होता. पण रुपाला विचारताच ती हसून खूनेनं एकच सांगे, '' ज्या घरात वर फॅन आहे, खाली फरशी आहे, अन् टी.व्ही. आहे '' अशा घरात तिला जायचं आहे. '' मग नवऱ्याला पहिली दोन लेकरं असतील तरी चालतील, मी त्यांना सांभाळीन अगदी स्वत:च्या लेकरासारखं, पण सवत तेवढी नको.''लग्नाच्या कलंकापेक्षाही मोठा कलंक असणारे 'मूकपण' भाळी घेऊन फिरणाऱ्या रुपाच्या या माफक अपेक्षा होत्या.

■■■



काय पाहिलंस....

काय पाहिलेस तू माझ्यात की माझ्या
तुटलेल्या मनाला सावरले....
काय पाहिलेस तू माझ्यात की माझ्यात
जगण्याची उम्मीद जागवलीस....
काय पाहिलेस तू माझ्यात की माझा
भूतकाळ माहीत असून मला आपलेसे केले....
काय पाहिलेस तू माझ्यात की माझी
एवढी काळजी घेतोस....
काय पाहिलेस तू माझ्यात की माझी
प्रत्येक क्षणाला तुला आठवण येते....
काय पाहिलेस तू माझ्यात की मला
जेव्हा भिती वाटते तेव्हा मला जवळ घेतोस....
काय पाहिलेस तू माझ्यात की
माझ्याशिवाय तू जगू शकत नाही....
काय पाहिलेस तू माझ्यात की मला
इतकी आस लावुन दिली भेटीची.....
काय पाहिलेस तू माझ्यात की तुझ्या
शिवाय आता मी ही जगू नाही शकत.....
काय पाहिलेस तू असं माझ्यात

कु. मयुरी भूपाल पाटील
बी.एस्सी.भाग ३



संघर्ष

(कथा)

– कु. उज्वला मारुती टकले
बी.एस्सी.भाग ३

उन्हाळ्याचे दिवस होते. सायंकाळची वेळ होती. सर्वजण आपापल्या कामात गुतलेले होते. कुणी चारा घेवुन येत होतं तर कुणी गायींच्या धारा काढण्यात मग्न होतं. सायंकाळची वेळ असल्यामुळे वातावरणात थोडी शांतताच होती, आणि अचानक शेजारच्या वस्तीवरुन मोठमोठ्यानं आवाज येऊ लागला. तसं पहिलं तर यामध्ये नवीन असं काहीच नव्हतं, रोजचं हा आवाज आमच्या कानावर पडायचा, परंतु आम्ही त्याकडे दुर्लक्ष करायचो. पण त्या दिवशी जरा जोरातच आणि वेगळा आवाज आम्हांला ऐकायला येत होता. खरं तर जयश्रीची चुक नव्हती मात्र आईच्या सांगण्यावरुन तो बायकोला मारत होता.

जयश्री ही शहरी भागातली. मॅट्रिक पास झालेली पहिली महिला गावात कोण असेल तर ती फक्त जयश्रीचं होती . तरीपण घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे घरच्यांनी अडाणी माणसाच्या जोडीला जयश्रीला जुंपले होते. ती जेंव्हा सासरी आली तेव्हा तिने पहिल्यांदाचं एवढे मोठे डोंगर, व माळरानं पाहिलं होते. साधं खुरपंदेखील जयश्रीला पकडायला येत नव्हतं. परंतु जयश्री ही प्रामाणिक, कष्टाळू, जिद्दी स्त्री होती. कधी–कधी तिला हे सगळे सोडून पळून जावं असं वाटायचं. पण जाणार तरी कुठे? माहेरी जावं तर वडील लहानपणीच सोडून गेले होते. तीन भाऊ होते. त्यापैकी दोघेजण एवढी दारु प्यायचे की कालांतराने त्यांचाही मृत्यु झाला आणि सर्वांत लहान भाऊ तोही अगदी तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होता. आणि त्यातच तिच्या आईला अर्धांगवायू झाला होता. तिच्या आईची सेवा हा तिचा भाऊच करत होता. हे सर्व चित्र पाहून तिला वाटलं की जायचं तरी कुठं जायचं, अन् 'आगीतून उठून फफुट्यात पडण्यापेक्षा आपण दिल्याघरीच राहिलेलं बरं. यानंतर जयश्रीला दोन मुलगे व एक मुलगी झाली. मुलही अगदी चुणचुणीत व हुशार होती. परंतु बापाच्या निष्काळजीपणामुळे आणि आईच्या कामामुळे मोठा मुलगा दिनू याला फार लवकर धुम्रपानाची सवय लागली होती. तसेच तो छोट्यामोठ्या चोऱ्याही करत होता. पण याची सर्व शिक्षा आईलाचं मिळायची. दिनू जसा मोठा होईल तसा त्याच्यामध्ये बदल घडू लागला. त्याला परिस्थितीची जाणीव होऊ लागली.

एक दिवस बाप दारु पिऊन घरात सर्वांना मारु लागला. सर्व भाऊ वेगवेगळे असल्यामुळे कोणीही सोडविण्यास तयार नव्हते. परंतु दिनुचा मात्र त्या दिवशी संयम तुटला कारण दिनू आता मोठा झाला होता. त्याने सरळ बापाला घर सोडून जाण्यास सांगितले तसाही तो कधीतरीच घरी यायचा. बाप असूनही बापाची माया कधीच मुलांना मिळाली नाही. परंतु बाप लाकडाचा व्यापार करायचा त्यामुळे त्याच्याकडे भरपूर पैसे असायचे, भरपूर मित्र होते पण तो घरच्यांसाठी एक रुपायाही खर्च करत नव्हता. उलट जयश्रीने काम केलेल्या पैशातून खरेदी केलाला माल असो वा दागिने तो दारू पिण्यासाठी बाजारात नेऊन विकायचा, या सगळ्या त्रासाला

तीपण खूपच कंटाळली होती. निमूटपणे अन्याय सहन करणारी जयश्री, तिच्यातील रौद्र रुप आता जागं झालं होतं आणि त्यादिवशी तीपण तिच्या नवऱ्याला बोलत होती. बाप-लेकाचं भांडणं झालं आणि कधीतरी घरी येणारा बाप त्या दिवसापासून कायमचाच यायचा बंद झाला होता.

एवढं सगळं झालं तरी जयश्री मात्र खचली नव्हती. ती प्रामाणिकपणे कष्ट करून तिच्या मुलांना शिकवतच होती. दिनुही मोठा झाला होता. त्याने बापासारखाच लाकडाचा व्यापार करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे घरच्याना थोडा आधार मिळू लागला. परंतू, हे काही काळचं मर्यादित राहिलं. म्हणतात ना नव्याचे नऊ दिवस तसं झालं होतं. कारण दिनूलाही दारुच व्यसन लागलं होतं, आणि व्यापार करण्यासाठी त्याने बऱ्याच लोकांकडून पैसे घेतले होते, ती माणसं रोज त्याच्या दारात पैशासाठी येत होती. दिनू कोणाचाही विचार न करता बायको व मुलीला घेवून घर सोडून निघून गेला. बापामुळे आधीच उघडं पडलेल्या घरात आता फक्त तीनच माणसं राहिली होती. जयश्री आणि तिची दोन मुलं सागर आणि मंगल.


सागर बारावीला होता. गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे तो बाहेरगावी शिकण्यासाडी राहत होता. तसेच मंगलपण गावातचं दहावीच्या वर्गात शिकत होती. त्यातच त्यांच्यावर आभाळ कोसळलं होतं. जयश्रीला माहित होतं की दु:ख आपल्या पाचवीला पुजलेलं आहे. तरीपण तिला आपल्या मुलांना मोठं करायचं होतं. त्यासाठी खुरपंही न पकडता येणारी जयश्री आता पडेल ते काम करत होती. आपल्या दोन्ही मुलांना शिकवत होती दिनुने केलेले कर्जही हळूहळू फेडतही होती. सागर आणि मंगल दोघेही चांगल्या गुणांनी बोर्डाची परीक्षा पास झाले होते. सागरला सीईटीला पण चांगले गुण पडल्यामुळे त्याला अभियांत्रिकीसाठी कराडच्या शासकीय विद्यालयात प्रसेश मिळाला होता. परंतु त्यासाठी दहा हजार रुपये भरावे लागणार होते. तेव्हा जयश्रीने कशाचाही विचार न करता तिच्या गळ्यात असणारे मंगळसुत्र विकून तिने कॉलेजची फी भरली होती. तसचं मंगललाही अकरावीच्या वर्गात शिकायला घातलं. मंगललापण चांगले गुण मिळाल्यामुळे तिला शासकीय वसतिगृहात प्रसेश मिळाला होता. आता घरी जयश्री एकटीच होती. आता तिला पैशाची जास्तच गरज होती. गावातील कर्नाटकच्या लोकांनी शिंदी गाळप करण्याचा व्यवसाय सुरु केला होता. तिथे जयश्री अगदी तुटपूंज्या म्हणजे पन्नास रुपये पगारावर काम करु लागली. काम अगदी सोप होतं. फक्त बाटल्या पाण्यात धुवायच्या होत्या. दुपारी आल्यानंतरही ती दुसऱ्याच्या शेतात कामं करायची. कारण दुसरा कोणताच मार्ग तिच्यापुढे नव्हता. मराठी शाळेत शिक्षिका म्हणून आलेल्या नोकरीसाठी नवऱ्याने तेव्हाच नकार दिला होता. म्हणून तिचं एकचं स्वप्न होतं की आपल्या या दोन्ही मुलांना तरी नोकरीला लावायचं कारण तसाही मोठा मुलगा घर सोडून कधीच गेला होता.

मंगल बारावीत असतानाचं तिचं लग्न ठरलं. ती दिसायला खूप सुंदर होती. तसेच तिच्या सासरचे सगळे उच्चशिक्षित असल्याने जयश्रीनेही लग्नाला होकार दिला होता, बारावी झाल्यानंतर थोड्या दिवसात मंगलचे लग्न झाले. तिला लहानपणापासूनच शिक्षणाची खूप आवड होती तसेच ती खेळातपण खूप हुशार होती. तिची पोलिस होण्याची खूप इच्छा होती, त्यासाठी ती पहाटे पाच वाजता पळायला जात होती. तिला कधी कोणत्या ॲकॅडमीची गरजपण लागली नव्हती. तीचं रोजचं

पळणे, स्वयंपाक, शेतीतली सर्व कामे, तसेच तीचं कॉलेजपण रोज चालूच होतं. तिने कधीही कंटाळा केला नाही उलट ती प्रामाणिकपणे कष्ट करत होती. या तिच्या कष्टाचं फळ तिला मिळणारं हे तिला माहितचं होतं, आणि एक दिवस ती पोलिस झाली. हा दिवस तिच्या आईसाठी खूप मौल्यवान होता. कारण तिनं संकटावर मात न करता मंगलला शिकायला घातलं नसतं तर, ती आजपर्यंत इथे पोहचली नसती. शिवाय सागरही इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षामध्ये शिकत होता. परंतु त्याला खरंतर त्या क्षेत्रात काम करायचेचं नव्हतं, आणि आईचे होणारे हालही त्याला पाहवत नव्हते. त्यासाठी सुटतील त्या शासकीय जागांसाठी अर्ज करायचा, आणि बारावीलाही चांगले गुण मिळाले होते. त्याने नेव्हीची परीक्षा दिली आणि पहिल्याच प्रयत्नात तो यशस्वी झाला. त्या संपूर्ण गावामध्ये नेव्हीत नोकरी करणारं कोण असेल तो फक्त सागरचं होता. जयश्रीला आता थोडाफार आधार मिळाला होता.

जयश्री घरी एकटीच असायची. सततच्या कामामुळे बिचारी खूप थकून जायची. शिवाय इतर कोणीही तिला मदत करत नव्हते वा तिच्याकडे चांगल्या नजरेने पाहत नवहते. किंवा तिच्या घरीपण केव्हा जात नव्हते. पण आता सगळेजण तिच्या घरी जावू लागले. कारण तिनं जगापेक्षा काहीतरी वेगळं केलं होतं, म्हणतात ना,''सुख के सब साथी दुख में न कोई'' तसंच काहीतरी तिच्या बाबतीत झालं होतं. तिच्या मोठा मुलगा दिनुही परत आला होता. एवढं सगळं होऊनही तिनं तिच्या नवऱ्यालाही घरी आणलं होतं परंतु, तो दारुच्या इतक्या आहारी गेला होता की तो एक दिवसपण घरी राहला नाही. तरीपण जयश्री सुखी होती, जीवनात काहीतरी मिळवलय याचा आनंद तिला झाला होता.

■■■



रातराणी व तारा

रोज रोज गाते मी मनातल्या मनात गाणी
गाणी गाता–गाता फुलते मनातल्या मनात
रातराणी
रातराणीचा सुगंध छान मनातल्या मनात करतो
बेभान
आकाशातून आला एक चमचमता तारा
तो देतो रोज रातराणीवर पहारा
रातराणीला जणू पाहताच
तारा म्हणाला मनातल्या मनात
का देतो मी तुझ्यावर पहारा
कारण तु पृथ्वीवरचा तारा
तुला पाहताच पडलो तुझ्या प्रेमात
चल येतेस का माझ्याबरोबर नभात
ताऱ्याला पाहून रातराणी म्हणाली मनातल्या मनात
चल दोघे मिळून भिजू चांदण्यात
चांदण्याचा प्रकाश जसा जसा खुले
तसा आपल्या प्रेमाचा रंग आणखीनच फुले.

कु. दिपाली नितीन ढेरे
बी.कॉम.भाग १



स्वयंसिद्धा

(प्रवासवर्णन)

– कु. अनघा पोपट पाटील
बी.ए.भाग ३

'स्वयंसिध्द'–स्व:चा शोध घेण्यास सिध्द, तयार असा शब्दश: अर्थ असलेल्या हा स्वयंसिध्दा आणि यांच स्वयंसिध्दास हजर असलेल्या उगवत्या महाराष्ट्राची दशा आणि दिशा बदलण्यास सज्ज अश्या हजारो महाराष्ट्रकन्या स्वत:चा शोध घेण्यास शारदानगर– बारामतीच्या प्रारंगणात चार दिवस अगदी गुणागोविंदान नांदल्या, रुजल्या आणि फुलल्या आणि कळी बनून आलेल्या या महाराष्ट्राच्या कन्या निश्चितच बहरल्या आणि 'स्व:' ची जाणीव निर्माण होवून अंध:कार रुपी राक्षसावर त्यांनी मात केली. आपल्या अंर्तमनाच्या शोधातून त्या प्रकाशमान झाल्या हे मात्र निश्चित.

दि. १८/१२/२०१६ ते दि. २१/१२/२०१६ हे चार दिवसांचे 'स्वयसिध्दा' युवती संमेलन शारदानगर बारामती येथे संपन्न झाले. खरचं, एखाद्या वारकऱ्याला जसा आनंद होतो, जेव्हा तो ऊन, वारा, पाऊस अश्या आपत्तीनवरती मात करुन विठूच्या चरणी नतमस्तक होतो. विठ्ठलाच्या काळ्यामूर्तीला डोळे भरुन पाहतो, तेव्हा तो सगळा त्रास क्षणात विसरुन जातो. अगदी याच प्रमाणे आम्ही सगळ्याजणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, कोणी सात तास– आठ तास असा फार मोठा प्रवास करुन आल्या होत्या. पण, शारदानगरच्या मेनगेटमधून आत प्रवेश केला अन् काय आशचर्य! आम्ही आमचा तो प्रवास आणि त्यामुळे आलेला कंटाळा क्षणार्धात विसरुन गेलो. खरचं खूप सुंदर असा परिसर. आजपर्यंत आम्ही बारामतीच्या विकासाबद्दल फक्त ऐकत होतो पण, ज्यावेळी तो प्रत्यक्षात अनुभवत होतो, तो अनुभव खरंच खूप वेगळा होता. इथला संपूर्ण परिसर संगीतमय असा आहे. ज्यावेळी आपण या कॉलेजच्या कॅम्पसमधून फिरतो, त्यावेळी इथे असलेली झाडं आपल्याला नेत्र आणि कर्ण अश्या दोन्ही प्रकारचे सुख देतात. कारण कॅम्पसमधील प्रत्येक झाडामध्ये थोड्या–थोड्या अंतरावरती शांतमय संगीत बसवण्यात आलेले आहे. आणि याचमुळे की काय तिथल्या वातावरणात एक वेगळ्या प्रकारची प्रसन्नता भरुन राहिली आहे. आणि ती ही अगदी चोवीस तास.

आमची नावनोंदणी झाली. याच दरम्यान आमची ओळख महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या मुलींशी झाली. आम्हाला राहण्यासाठी खोली देण्यात आली. चहावगैरे झाल्यानंतर आम्ही 'दिनकर' हॉलमध्ये 'स्वयंसिध्दा' या युवती संमेलनाच्या स्वागत संमारंभासाठी एकत्र आलो. महाराष्ट्रातील जवळपास आठशे ते नऊशेच्या आसपास आम्ही सगळ्याजणी या दिनकरच्या छताखाली एक नवा निश्चय करून आलो होता, तो जाताना एक ठाम विचार घेवून जाण्यासाठीच....

संमेलनाच्या स्वागतासाठी आमंत्रित मान्यवर होते,– विकी रॉय,'नॅशनल फोटोग्राफर'. विकीजींनी भारताचेच नव्हे तर, आशिया खंडाचे नाव संपूर्ण जगभर पोहचवले, दिल्लीची नवी ओळख ज्यांच्यामुळे झाली, अशी जगतविख्यात व्यक्ती

आमच्यापुढे उभी होती. पण, आमचे दुर्दैव की अशा जगभर ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्वाबद्दल मात्र आम्हाला त्यांना ऐकण्याअगोदर अजिबात माहिती नव्हती. दिल्लीसारख्या शहरात रस्त्यावर जगलेल्या आणि कचऱ्याच्या ढिगाऱ्यात झोपलेल्या, वयाच्या सातव्या- आठव्या वर्षी घरातून पळून आलेल्या अगदी सामान्य मुलाचा जगप्रसिद्ध फोटोग्राफर पर्यंतचा प्रवास खरंच खूप थक्क करणारा आहे. ज्या इंग्लडच्या राणीला पाहण्यासाठी हजारो लोक दररोज तिच्या पॅलेसच्या बाहेर तासनतास उभी असतात. त्याच राणीच्या पॅलेसमध्ये हा भारतपूत्र चार दिवस राहून आला, तेही त्याला मिळालेल्या फोटोग्राफीच्या निमंत्रणावरुनच. अतिशय नम्र असे विकी रॉय त्यांच्या बोलण्यातून आणि वावरण्यातून आम्हाला खूप काही देवून गेले.

विकीजी वयाच्या एवढ्या कमी वयात इतकी मोठी झेप घेवू शकले ते फक्त आणि फक्त त्यांनी स्वत:ला ओळखल्यामुळे आणि योग्य वयात ओळखल्यामुळेच. याचबरोबर आयुष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर-वळणावर त्यांना मिळालेल्या चांगल्या लोकांमुळे. ज्यांनी विकीजीना प्रोत्साहन दिले. ज्या-ज्या वेळी विकीजी खचले त्या-त्या वेळी ह्याच लोकांनी त्यांना सावरले. आणि म्हणूनच मला वाटतय, विकीजी एक 'इंटर नॅशनल फोटोग्राफर' म्हणून नावारुपाला आले. कारण माणसाच्या आयुष्यात आर्थिक मदतीपेक्षाही मनोर्धेय वाढवणारे चार शब्दही परिवर्तन होण्यास साह्यभूत ठरतात. खरचं खूप साधा माणूस पण, त्यांच्या कलेमुळे ते इतके मोठे झाले की, आज ते वर्षातील जवळपास सात-आठ महिने वेगवेगळ्या देशामध्ये भ्रमण करत असतात. जेमतेम शिक्षण पण, 'कला' माणसाला मोठी बनवते हे मात्र विकीजींना पाहिल्यानंतर समजून चुकले. तेही भारतासारख्या देशात, जिथे कलाकारांची कदर आणि किंमत फारशी कुणाला नाही.

विकीजीना दीड-दोन तास ऐकल्यानंतर आणि त्यांनी काढलेल्या अंध-अपंगाची फोटोग्राफी पाहिल्यानंतर अस वाटलं की, अंधअपंग ज्या परिस्थित जगतात ती, परिस्थिती ते आपल्या मतांनुसार बदलण्यास तयार असतात, समर्थ असतात, आणि त्यामुळेच ही लोक सामान्य माणसाला जगण्याची एक नवी उमेद देवून जातात. खूप अप्रतिम अश्या फोटोग्राफी आम्ही पाहिल्या. ज्यातून विकीजीची प्रत्येक कलाकृती बोलत होती. वेगवेगळ्या प्रकारचे भाव बघणाऱ्याच्या मनपटलावरती उमटवत होती.

विकीजीना पाहिल्यानंतर खरचं अस वाटलं, रस्त्यावरती जगलेला, कचऱ्यात झोपलेला, ज्या वयात घरच्यांची साथ खूप गरजेची असते. प्रत्येक मुला-मुलीच्या आयुष्यात, योग्य जडणघडण होण्यासाठी अश्याच वयात घराला आणि घरच्या माणसांना मुकलेला हा मुलगा जर एवढं काही करु शकत असेल तर आपण का नाही? 'मी' का नाही? आणि हा 'मी' पडलेला प्रश्नच आम्हाला 'स्व:' ची जाणीव करुन देण्यासाठीच पहिल पाऊल ठरला.

उद्घाटन समारंभाच्या दरम्यान आमची ओळख झाली ती, मा. सौ. सुनंदा पवार.- विश्वस्त, ॲग्रीकल्चरल, डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती. ज्यांना संपूर्ण शारदानगर 'वहिणीसाहेब' या नावानं ओळखत. पावणेदोनशे वर्षापूर्वी ज्या सावित्रीने मुलीच्या शिक्षणासाठी शेणादगडाचा मारा सहन केला, त्या सावित्रीच्या लेकी इतक्या समर्थ आणि स्वाभिमानी पद्धतीने स्वत: तर जगत आहेतच पण, दुसऱ्याही माझ्या बहिणी-मुली जगल्या पाहिजेत म्हणून खूप धीराने आणि धाडसाने लढताहेत, हे पाहिल्यावर त्या सावित्रीच्या डोळ्यातही पाणी येत असावं. ज्या शारदानगरच्या कॅम्पसमध्ये आम्ही चार

दिवस वावरत होतो, नव्हे तर खूप आनंदान वावरत होतो. तो संपूर्ण परिसर या माऊलीच्या अविरत कष्टातून निर्माण झालेला होता. आणि सगळ्यात अभिमानाची गोष्ट म्हणजे सहा से सात हजार मुली ज्या, वयाच्या पाच ते चोवीस वर्षापर्यंतच्या आणि वेगवेगळ्या परिस्थितीतून इथे एकत्र आलेल्या. या सगळ्यांना शिबिरार्थींना हाताळण्याचे कामही सावित्रीची लेक सुनंदावहिणी करत होत्या.

सुनंदा ताईना पाहिल्यानंतर आणि त्यांनी हा सुंदर परिसर निर्माण करण्यासाठी खाल्लेल्या खस्ता ऐकल्यानंतर आम्हा प्रत्येकीच्या मनामध्ये त्यांच्यांबद्दल तेवढ्याच उंचीचा आदर निर्माण झाला. आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक मुलीच्या मनामध्ये 'सावित्रीबाईने' बदल केला आहे. महाराष्ट्रातल्या प्रत्येक मुलीसाठी खरंच ही खूप अभिमानाची गोष्ट आहे की, ज्यासाठी आणि ज्याच्यामुळे आम्ही सगळ्या महाराष्ट्र कन्या चार दिवस एकत्र आलो तेही एका समर्थ महाराष्ट्र कन्येमुळेच. मुलींनी आपल्या आयुष्यामध्ये खूप काही करावं, स्वत:च्या पायावरती उभ राहावं आणि समाज्यामध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करावी, म्हणून वहिणी सतत कार्यरत असतात. तसअ, शारदानगरच्या मुली आम्हाला सांगत होत्या. त्यांची धडपड आम्हालाही त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसत होती. 'नारी तू नारायणी' हे सुनंदा वहिणीना पाहिल्यानंतर वाटलं आणि ते आम्ही प्रत्यक्ष अनुभवलसुद्धा. पण...

मनान एक विचार येवून गेला, या माझ्या महाराष्ट्राच्या मातीत एका बाजूला इतकी सामर्थ्यवान स्त्री आपली सर्व शक्ती पनाला लावून नवीन प्रगत महाराष्ट्राच्या निर्मितीमागे लागलेली आहे वर, दुसऱ्या बाजूला स्वसंरक्षण न करता आल्यामुळे नराधमांच्या अत्याच्याराला बळी पडलेली स्त्री, ही याच मातीतून निर्माण झालेली आहे. ती परिस्थिपुढे दुबळी का ठरत असावी, ती का कमजोर असावी? असो....

बारामती म्हणजे, 'शरद पवारसाहेब' आणि शरद पवार साहेब म्हणजे बारामती अस एक समीकरण संपूर्ण महाराष्ट्र आणि भारतभर तयार झालंय. माझ्या मते ते, 'बारामती–शरद पवारसाहेब आणि विकास' अस असायला हवयं. मी अगोदर म्हटल्याप्रमाणे 'पवारांची बारामती' मी ऐकली होती. ती पाहिली शारदानगरच्या रुपाने आणि आता,...जर महाराष्ट्राचा विकास झालेला आहे. हे पाहावयाचे असेल तर, बारामती नक्कीच पाहिली पाहिजे! अस एक ठाम मत. हे मत ठाम झाले ते 'कृषी विज्ञान केंद्र' बारामती पाहिल्यानंतर. १९/१२/२०१६ ला आम्ही सकाळी जवळपास दोन ते अडीच तास हा एकशे दहा एकरचा संपूर्ण परिसर फिरुन पाहिला. आणि शेतकऱ्याच्याच आम्ही मुली क्रांती या परिसरातून आम्हाला पाहायला मिळाली. आशिया खंडातील पहिला 'ठिबक सिंचन' प्रयोग याच कृषी विज्ञान केंद्रात झाला आणि पुढे महाराष्ट्र–भारत नव्हे, तर आशिया खंडभर त्याचा प्रसार होवू लागला. आजही हा एकशे दहा एकरचा परिसर पूर्णपणे ठिबक सिंचन युक्त असाच आहे. पाण्याचा अत्यंत योग्य आणि आवश्यक तेवढाच वापर. संपूर्ण परिसर सौर ऊर्जेवर चालतो, केंद्रातील प्रत्येक काम हे मशीन करतय कंम्पुटरच्या मदतीने. असं हे कामगार विरहीत बारामतीचं 'कृषि विज्ञान केंद्र'.

खरचं खूप छान वाटलं आणि मनात आलं, शेतकऱ्यावर आज जी वाईट वेळ आली आहे. शेतकरी असलेल्या मुलाला लग्नाच्या बाजारात आज मुली विचारत सुध्दा नाहित अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पण अशा प्रकारे आधुनिक शेतीच तंत्र आत्मसात करुन नियोजनपूर्ण शेती जर

केली गेली, तर महाराष्ट्रातीलच काय तर भारतातील 'बळीराजा' हा फक्त 'राजाचं' असेल....त्याचा 'बळी' शेतीमुळे जाणार नाही, एवढं मात्र नक्की.

कृषि विज्ञान केंद्र बघून आल्यानंतर 'दिनकर' हॉलमध्ये आमच्या भेटीला आले होते ते, मा. श्री. यजुवेंद्र महाजन, जळगाव. ए.पी.जे अब्दुल कलाम सर यांच्या स्वप्नांतील '२०२०' चा महासत्ताक भारत हे स्वप्न पूर्ण होणारच! असा ठाम विश्वास आमचाच आमच्यावरती निर्माण होण्यास आणि तो निर्माण करण्यास 'स्वयंसिद्धा' युवती संमेलनाचे सर्वात प्रेरक आणि क्रियाशिल अशी व्यक्ती महाजन सरांबद्दल मी यापूर्वी ऐकले ते, १८/१२/२०१६ च्या रात्री अकरा वाजता. तोपर्यंत महाजन सर कोण? असा प्रश्न मी आणि माझ्या असंख्य जणीच्या मनात होता. सरांचा विषयही तसाच 'उत्तुंग भरारी घेवुयात!' हा होता.

दिनकर हॉलमध्ये ज्याप्रमाणे सरांनी प्रवेश केला ते पाहून मी तर अक्षरश: हसत होते कारण, सरांमध्ये इतकी ऊर्जा, इतका ऑटिव्हपणा आहे की, तो त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवत असतो. त्याची बरोबरी करणं कुणा सामान्याचं काम नाही, हे पुढचे तीन-साडेतीन तास त्यांना ऐकल्यानंतर आणि पाहिल्यानंतर समजलं. मी हसत होते ते ऐवढ्यासाठीच की सरांना आणण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सरांना सोबत होते, पण सर इतक्या जोरात चालत होते की, प्राचार्य अक्षरश: त्याच्यापासून खूप अंतर लांब महाजन सरांनमागून पळत येत होते. त्यांनी प्रवेशच इतक्या दमदारपणे केला, त्यांनी सहजच पुढचे तीन- साडेतीन तास इतक्या हुशारीनं 'उत्तुंग भरारी घेवुयात!' भोवती बांदून ठेवल की, साडेतीन तासांनंतर मनामध्ये एक वेगळ्या प्रकारच वादळ निर्माण झालं. आपण कसं जगतोय? कशा प्रकारे जगतोय? खरचं विध्यात्यानं दिलेल्या सुंदर जगण्याला आपण न्याय देऊ शकतोय का? जगत राहिलो तर ते देणं आपण कधी त्यांनी परतफेड करणार? असे एक ना हजार प्रश्न सरांनी आमच्या भोवती निर्माण केले. पण, फक्त प्रश्न निर्माण करुन सर थांबले नाहीत तर, त्या प्रश्नांच्या उत्तरांच्या मुळाशी आम्हाला नेवून उभं केलं. आणि पुन्हा प्रश्न निर्माण केला, आता तुम्हाला काहीतरी करायचंय... पण काय?कसं? ते तुमच तुम्हीच ठरवा.

आमच्यापैकी काहीजणी सरांच्या मोठ्या चाहत्यांपैकी होतो. ज्या सरांना आजपर्यंत फक्त सोशल मिडीयावरती आम्ही बघायचो, ऐकायचो त्या सरांना आज प्रत्यक्षात हाताच्या अंतरावर बसून ऐकत होतो. ह्या गोष्टीचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावरुन ओसंडून वाहत होता. आजपर्यंत मी अनेक वक्त्यांना ऐकत आले होते. बऱ्याच जणांचे स्फूर्ती देणारे भाष्य जवळून अनुभवले होते. पण, त्यांच्या स्फूर्ती देणाऱ्या भाषणातून श्रोतावर्ग आपल्या मनातल्या शंकांनी मोकळा झालेला मी पाहिला नव्हता. पण, महाजन सरांची तिच कडी आम्हाला त्यांच्या विचारांन भोवती बांधून ठेवत होती. मोकळी होण्यास संधी देत होती. प्रत्येकीला तिच्या मनातल्या भावना मांडण्यासाठी प्रेरित करत होती. खरंतर पहिल्याच दिवशी आम्हाला, स्वयंसिध्दाचा आम्ही भाग बनल्यापासून सुनंदावहिणी सारख्या बजावून सांगत होत्या,''तुम्हाला जे वाटतं ते बोला, तुमच्या कल्पना आमच्या समोर मांडा. तुम्ही इथं मोकळ्या व्हा. कारण उद्याचा समर्थ महाराष्ट्र तुम्हीच घडवणार आहात.''

माझ्यापुढे हाच खरा तर मोठा प्रश्न होता, सगळेच सांगतात- 'तुम्ही बोला, मत मांडा' पण कोणताच वक्ता तो बोलत असताना श्रोत्यांच मत ध्यानात घेत नाही. तो बोलतो त्यावेळी श्रोत्यांच्या

मनांत कोणत्या प्रकारच वादळ सुरु असते, याची त्याला तसूभर ही जाणीव नसते. माझ्या मते त्यांच्या डोक्यात त्यावेळी फक्त एकच गोष्ट असते, 'मला बोलायला इथे बोलावलय तर मी माझा बेस्टच दिला पाहिजे, माझ बोलणं प्रभाविपणे मांडल गेल पाहिजे, जे मुद्दे मी आज काढलेत ते सर्व माझ्या आजच्या भाषणात, व्याख्यानात बोलले गेले पाहिजेत.' पण, त्याच्या डोक्यात हे नसतं, की श्रोत्यांच्यातून मला एखादा आज 'बेस्ट' भेटला पाहिजे, त्याच्या नवीन कल्पना घेवून मी उद्या असं काही बोलेण, अस एखाद मत मांडेन की, ते चांगल्या दिशेने समाजपरिवर्तन होण्यास भाग पडेल.

आज आपण महासत्ताक होण्याच फार मोठ स्वप्न बघतोय. एक एक दिवस महासत्तेचा उंबरठा आपल्या जवळ जवळ येत निघालाय पण ज्यांच्या जीवावर आपण हे स्वप्न बघतोय ती, 'युवा' पिढी त्यांची मत, कल्पना आपण खरचं ध्यानात घेतोय का? समजा त्यांनी एखाद मत मांडल तर ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यापाठीमागे आपला प्रयत्न किती? याचा विचार करतोय का... आज समाजामध्ये हे मोठ्या प्रमाणावर बघायला मिळतय की, एखाद्या युवकानं एखादी कल्पना मांडली तर, ती कशा प्रकारे पूर्ण होणार नाही, किंवा हे होणं अशक्य आहे.' हे कोणतेही प्रयत्न करण्याअगोदर कल्पना मांडणाऱ्याच्या मनावर मोठ्या प्रमाणात बिंबवण्यात येते. साधा प्रयत्न ही त्याला त्या दिशेने करण्याची संधी दिली जात नाहिये... आणि मला वाटतयं, आजचा शिक्षित समाज इथंच चुकतोय. आजच्या एकविसाव्या शतकातील युवापिढी 'अनुभव' घ्यायलाच विसरुन चाललीये कारण, त्यांच्या पुढे सोशल मिडिया आणि त्यांच्या अवतीभोवती असणारा त्यांचा शिक्षित पालक आणि शिक्षिक वर्ग. त्यांच्या कल्पनांना तो मांडण्याची संधी देत नाहीये. भले कल्पना मांडण्याऱ्याची कल्पना चुकीची असुदेत, पूर्ण होवू न शकणारी असूदेत, त्या कल्पनेतील अडचणी तुमच्या लक्षात येणाऱ्या असूदेत, पण कल्पना मांडणाऱ्याला त्या दिशेने प्रयत्न करण्याची मुभा आजचा पालक आणि शिक्षिक वर्गानं दिली पाहिजे. त्यांनी मांडलेल्या कल्पनेतून, आणि त्यासाठी केलेल्या मार्गदर्शनापेक्षा, त्यांच्या आयुष्यावर अधिक प्रभावीपणे काम करणारा असतो.'तुम्हाला आलेल्या चांगल्या किंवा वाईट अनुभवांमुळे तुम्ही आजच्या युवकाला त्याला येणाऱ्या किंवा त्याला जो अनुभव येणं अपेक्षित आहे पण तो, तुमच्या 'तू यासाठी प्रयत्नच करू नकोस.' या एका वाक्यावरतीच थांबतोय. तुम्हीच आमच्या मनावर-डोक्यात लहानपणापासून हे बिंबवताय, आणि सतत हे सांगण्याचा प्रयत्न करताय की, 'अनुभव हा माणसाचा सर्वात मोठा गुरु आहे.'

महाजन सर याच दिशेने जात होते. त्यामुळे सरांच व्याख्यान एका जागेवरती उभे राहून, डेस्कचा आधार घावून असं केल जाणारं नव्हतं, तर ते फिरते होते. क्षणभरही सर एका जागेवर उभे नव्हते. ऐकणाऱ्याच्या मनातील प्रश्न सर त्याच्या चेहऱ्यावरील हातभावातून ओळखायचे आणि त्यांना बोलण्यासाठी प्रवृत्त करायचे त्यांच्या कल्पना, मत यांना योग्य प्रकारे न्याय देण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे मी अगोदर म्हटल्याप्रमाणे घड्याळी तीन ते साडे तीन तास सरांनी विचारांभोवती आम्हाला बांधून ठेवलं. त्यादिवशी कोणाला जेवणाचंही भान नव्हतं. सरांना ऐकल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली, की आजच्या शिक्षकवर्गावरती सर स्वत: एक शिक्षक असूनही फार नाराज आहेत. कारण आजचा शिक्षक विद्यार्थ्याला मोकळ होण्यास, मत मांडण्यास वाव देत नाहीये. त्यामुळेच नवीन कल्पना निर्माण होत असतानाही त्या समाजापुढे येत नाहीत. आणि

कदाचित याचमुळे भारत अजूनही आपल्याकडे सगळं काही असतानाही विकसनशील आहे. अपेक्षित यश आपण अजूनही गाठू शकलो नाहीये आणि यासगळ्यामुळेच महाजन सरांच्या भाषेत सांगायच झाल्यास, आजच्या शिक्षकाला पूर्वीच्या 'मास्तर' (आईच्या जागी जावून माया करणारा तो 'मा-स्वर') चा अर्थच कळला नाही. त्याला तो पूर्णपणे समजला आणि उमजलाच नाही आणि आजच्या शिक्षकांनी तो समजून आणि उमजून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. पण आजच्या शिक्षकांनी मुलांना मत मांडण्याच, त्यांच्या कल्पना सत्यात उतरवण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न, भले ते चुकीच्या दिशेने जाणारे का असेनात पण त्यातून मिळणारा 'अनुभव' घेण्यांच स्वातंत्र्य द्यावं, हे मात्र नक्की.

माझ्या मते आजचा भारत सर्वच क्षेत्रात पुढे आहे. औद्योगिक, शैक्षणिक, वैज्ञानिक आणि यातही कौतुकास्पद बाब अशी की मुलीही आज कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीयेत. सगळे म्हणतात, आजही स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतेय,प्रगती करतीये...हे सगळ जरी खर असल तरी, दुसरीकडे प्रचंड बेरोजगारी, व्यनाधीनता, मागासलेपणा, विषमता, जातीयता अजूनही का? आपण एकविसाव्या शतकात जगतो, विज्ञानाला सोबत घेवून समाजात वावरतो. मग अजूनही जातीय दंगली का होतायेत,जातीच्या हक्कासाठी मोठमोठाले मोर्चे का काढावे लागतायेत? आणि विशेषत: यातही युवापिढीच पुढे आहे असं का? अशा प्रश्नांच वादळ निर्माण झालं, की अस वाटत आजची तरुणपिढी आपले योग्य आदर्श निवडतच नाहीये आणि आदर्श निवडले तर ते चुकीचे निवडतीये. असं म्हणतात, 'ज्या त्या वयात जी, ती गोष्ट केली तर ती बरी दिसते.' आजच्या तरुणांचे आदर्श नटनट्या असणं हे समाजाला चुकीचं वाटतं, पण मी अस कधीच म्हणणार नाही. कारण आज ज्या पद्धतीने अभिनय करणाऱ्यांना स्वत:ला सिध्द करण्यासाठी जी कठोर मेहनत, कष्ट करावे लागतायेत याकडे समाजाचं अजिबात लक्ष जात नाही. जे आपण नाहीच ते बनून त्या भूमिकेत शिरणं आणि पडद्यावरती पाहिजे असणारी व्यक्ती उभं करणं; ही गोष्ट वाटते किंवा डोळ्याला दिसते तेवढी सोपी मूळीच नाही. ही गोष्ट बोलणाऱ्याच्या ध्यानात येत नाही. त्यांच्या कठोर मेहनतीचा विचार कोण करत नाही. कोणत्याही क्षेत्रात आपला ठसा उमटवणं इतक सहज सोपं नसतं. हे मोठमोठ्या क्षेत्रांतील लोकांचे लेख वाचल्यानंतर समजले. पण आपण ज्या गावाला जाणारच नाही, त्या गावाच्या गाडीत बसायचच कशाला! याचपध्दतीनं आपण ज्या क्षेत्रात जाणार आहोत ना, त्याच क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तींना आपल्यासमोर 'आदर्श' म्हणून ठेवावं, आणि त्या दिशेनेच प्रयत्न करावेत. म्हणजे, आपल्याला आयुष्यात जे साध्य करायचं आहे ते, सरळ-सोपे नाही मिळाले तरी चांगल्या पद्धतीने का होईना प्राप्त होईल.

महाजन सर खरचं खूप सरळ, साध्या आणि आमच्या युवा मनाला पटेल, अश्या मार्गाने मार्गदर्शन करत होते. आमच्यामध्ये मिसळत होते. आम्हाला व्यक्त होण्यास भाग पडत होते. या सगळ्यातच आमच्यामध्ये आमच्याच वयाची पण, असामान्य अशी एक मुलगी बसली होती. आमच्याच समोरच्या रांगेत. महाजन सर बोलत असतानाच ती येथून बसली होती. ती येवून बसली त्याच वेळी आमच्या नजरा तिच्यावरती खिळल्या, कारण ती VIP लोकांच्या रांगेत बसली होती. अगोदरच महाजन सरांचे व्याख्यान असल्यामुळे 'दिनकर' हॉल खचाखच भरलेला होता. मिळेल त्या जागी मुली

बसून होत्या. आणि अश्यातच ती VIP लोकांच्या सोफ्यावरती येवून बसली. आम्हाला वाटलं बसायला जागा नाहीये, म्हणूनच ती तिथे येवून बसलीये. कारण दिसायला एकदम सामान्य, बारीक, काळी-सावळी, केसांना चपचपून तेल लावून आलेली एक अठरा-एकोणीस वर्षाची मुलगी. कोण होती ती? जिला आपल्यामुळे दोन तास बसावं लागलं असं महाजन सरांना वाटलं. तितक्यात स्टेजवरुन नाव पुकारण्यात आलं,-'अंकिता नगरकर' होय! ही तीच सामान्य वाटलेली मुलगी अंकिता नगरकर. जिच नाव आम्ही आल्यापासून कार्यक्रम पत्रिकेत वाचत होतो. जिचा विषय होता-'नाविण्य आणि सर्जनशीलता' खरंच आश्चर्य आणि अभिमान अश्या दोन्ही प्रकारच्या भावना निर्माण करणारा तो क्षण होता.

अंकितानं असं काय केल होतं!, की ज्यामुळे तिला 'स्वयंसिद्धा' सारखे व्यासपीठ देण्यात आले होते. त्याच्याही पुढे जावून मी थोडसं सांगेन...'स्वयंसिद्धा गाजवण्याअगोदर मोठमोठी वैज्ञानिक व्यासपीठं ती गाजवून आली होती. ज्या वयामध्ये सामान्य मुलीचं आकर्षण आरसा, आपलं दिसणं असतं त्याच वयाच्या सतराव्या-अठराव्या वर्षी अंकिताच्या नावे 'सहा पेटंट' होती. तिने नवीन सहा शोध लावले होते. आणि त्या शोधांचा मालकी हक्क तिच्याकडे होता. आता पुण्यामध्ये इंजिनीअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणारी अंकिता 'स्वयंसिद्धा' मधली 'स्व:' ची जाणीव निर्माण करुन देणारे तिसरे पाऊल ठरली.

मी अगोदर म्हटल्याप्रमाणे दिसायला एकदम साधी आणि चपचपून तेल लावून आलेली मुलगी, पुण्यासारख्या शहरात राहूनही बाहेरच्या-वरच्या कोणत्याही आकर्षणांना न भुलता स्वत:ला सिद्ध करत राहिली आणि त्याचमुळे आज महाराष्ट्र कन्यांना स्वत:भोवती दोन तास खिळवून ठेवू शकली. यातून माझ्या एक गोष्ट लक्षात आली. लहानपणापासून आम्हाला एक सांगण्यात येते, की 'तुम्ही जर चारचाकी वाहनातून प्रवास करत असाल तर, दोन चाकीवाल्यांकडे बघा. दोन चाकीवरुन प्रवास करत असाल तर, चालणाऱ्यांकडे बघा. चालत असाल तर, पाय नसल्यामुळे सरपटणाऱ्यांकडे बघा आणि पाय असून सरपटत असाल तर, पायच नाहीत अश्यांकडे बघा आणि आपण जिथं आहेत तिथ खूप सुखी, समाधानी आणि चांगले आहोत! हे मनाला पटवून देत जा.' पण, आम्हांला आज पर्यंत हे कोणी नाही सांगितलं, की, चालतोस ना तर तू अजूनही चालतोयसच का? तुझ्याकडे गाडी का नाही. तू गाडीवरती आहेस ना, तर तू गाडीत का बसू शकत नाहीयेस? ही मानसिकता जो पर्यं आपण बदलत नाहीये, मला वाटतयं, तोपर्यंत अश्या असंख्य अंकिता आपण घडताना, तयार होताना पाहू शकणार नाहीये. आपण जिथे आहोत तिथेच खूप समाधानी आहोत. हे मनावर बिंबवण्यापेक्षा, जे आपल्याकडे असणं आवश्यक आहे ते कोणत्याही परिस्थितीमध्ये साध्य करता आलच पाहिजे. असा दृष्ठ निश्चय युवापिढीच्या मनावर बिंबवला गेला पाहिजे. आणि ज्यावेळी हा निश्चय युवापिढी स्वत:च्या मनावर कोरुन घेईल, त्याचवेळी आपण महासत्ताक भारताचे खरे हक्कदार होवू, असे मला प्रामाणिकपणे सांगावेसे वाटते.

अंकिताने लावलेल्या शोधांबद्दल आणि कोणत्या परिस्थितीत ते शोध लागले. याची माहिती दिली. तिच्या मते, आपल्याला प्रत्येक गोष्ट ठरवूनच करावी लागते, असे नाही. तर, आपल्या भोवती, एखाद्या वेळेस अशी परिस्थिती निर्माण होते, की त्यातून काहीतरी नवनिर्मिती होते; फक्त एवढच की, त्या परिस्थितीचा आपल्याला पुरेपुर वापर

करता आला पाहिजे. म्हणजे, थोडक्यात सांगायच झाल्यास, 'संधीचा सोनं करता आलं पाहिजे.' अप्रत्यक्षपणे खूप काही शिकवून, सांगून अंकिता दोन तासानंतर थांबली.

यानंतर जेवण वगैर झाल्यानंतर मा. सौ. अस्मिता जावडेकर. यांचे 'स्वत्व–The power within'या विषयावरती आयोजित व्याख्यानही अगोदर झालेल्या व्याख्यानांइतकेच दमदार आणि प्रेरणादायी अश्या प्रकारचे होते. अस्मिता मॅडमच्या व्याख्यानाविषयी थोडक्यात सांगायचे झाल्यास मी म्हणणे,–'स्वत:वरती विश्वास ठेवा आणि पुढे–पुढे चालत रहा.' हा त्यातून मिळालेला मौलिक संदेश होता.

'स्वयंसिद्धा' सुरु झाल्यापासून आणखी एक गोष्ट घेण्यात आली होती ती म्हणजे, 'गटचर्चा' पण ही घेण्यास यायची ती, रात्री जेवणानंतर दिवसभर झालेल्या व्याख्यानावर आधारित. यातूनही एक अनुभव मिळाला तो म्हणजे, एखाद्या घटनेकडे पाहण्याचा, ऐकण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन खूपच वेगळा असतो. हे जरी खर असल तरी, तो इतका वेगळा असू शकतो, जितका आपण त्या गोष्टीचा विचारही केलेला नसतो. असो...संपूर्ण 'स्वंयसिद्धा' शिबीराच्या गटचर्चा' खूप मस्त आणि आमच्या ज्ञानात भर पाडणाऱ्या, स्वत:ला सिद्ध करण्यासाठी महत्त्वाचा भाग असलेली गोष्ट म्हणजे, 'आपल्याला पहिल्यांदा योग्यरितीने व्यक्त होता आलं पाहिजे आणि आपल जे मत आहे ते समोरच्याच्या गळी उतरवता आलं पाहिजे. ही जी कनसेप्ट आहे ती, खूप वेगळ्या पद्धतीने अवलंबता आली ती या गटचर्चेच्या माध्यमातून गटचर्चनंतर तीनही दिवस रात्री आम्हाला प्रेरणादायी फिल्मस् दाखवण्यात आल्या त्याही आमच्यासाठी खूपच सुंदर व प्रेरणादायी अश्याच ठरल्या.

स्वयंसिद्धाच्या पाचव्या सत्रामध्ये मंगळवार दि. २०/१२/२०१६ रोजी, मी अगोदर म्हटल्याप्रमाणे ही,'सावित्रीची लेक सुनंदा महाराष्ट्राच्या भावी कन्या समर्थपणे घडल्या पाहिजेत यासाठी अविरत मेहनत घेत होती' आणि याचवेळी एक अपेक्षाही मी व्यक्त केली होती, की 'या महाराष्ट्रात पुन्हा शिवबा जन्माला नाही आला तरी चालेल! पण शिवबाच्या संस्कारावर आधारित 'मावळा' जर महाराष्ट्राच्या घराघरात निर्माण झाला तर, अजून चांगले रुप महाराष्ट्रच दिसून येईल.' आणि मला वाटतंय माझ्या या अपेक्षेला न्याय देणारा एक मावळा मी पाहिला तो,–मा.श्री.रोहित पवार.– कार्यकारी संचालक बारामती ॲग्रो. लि. यांच्या रुपानं ज्यांचा जन्मच झाला सुनंदा पवार यांच्यासारख्या एक समर्थ महाराष्ट्र कन्येच्या पोटी साहजिकच आईच्या अंगचे अनेक चांगले गुण घेवून रोहित पवार घडले होते. यामुळेच उद्योगाच्या दुनियेत एक वेगळा ठसा उमटवू पाहत होते. आणि तो ठसा उमटणारच असा ठाम विश्वास आम्हाला त्यांनाही ऐकल्यानंतर मिळाला. रोहित पवार यांनी आमच्याशी 'उद्योजकता' या विषयावर संवाद साधला. जो आमच्यापैकी ज्या मैत्रींनीना उद्योजगता या क्षेत्रामध्ये आपल करियर शोधत होत्या , त्यांना मार्गदर्शनपण असाच ठरला.

यानंतर मा. श्री. नवीन काळे पुणे. यांचे 'आकाशाचे खांब काहीतरी नवीन' या विषयी आयोजित व्याख्यान होते. येथे एका गोष्टीचा उल्लेख मला आर्वजून करावासा वाटतो, तो म्हणजे 'ज्यांच नाव 'नवीन' आणि ज्यांच्या व्याख्यानाच्या विषयातही 'काहीतरी नवीन' अशा सारख्याच शब्दांनी बांधलेले हे 'नवीन काळे' यांनी आम्हाला खरचं खूप काही 'नवीन' आणि वेगळ देण्याचा

प्रयत्न केला आणि तो खूप परिणामकारक असाच ठरला. कारण ज्या देशाचा आम्हाला खूप अभिमान वाटतो तो आमचा 'भारत' एका बाजूला मागासलेला तर, दुसऱ्या बाजूला याच मागासलेपणावर मात करत जगणारी आजची जनता, जी आपल्या अज्ञानान खचत नाहीये. आपल्या दुबळ्या परिस्थितीपुढे हात टेकत नाहीये. तर, ती बदलण्याच सामर्थ्य घेवून जगतायेत. याच उदाहरण सरांनी आम्हाला 'राजस्थान' सारख्या राज्यातील एका गावच्या ग्रामस्थांच्या रुपाने घडविले. ज्या लोकांना वाचता येत नाही. इंग्रजीच ज्यांना अजिबात ज्ञान नाही. मात्र ही लोक उद्योग करत आहेत. जो इतका जोमाचा आणि ताकदीचा की त्याच्यावर त्यांची घरे तर चालताहेतच पण, संपूर्ण गावच्या गाव ह्या एकाच उद्योगच आहे. आणि तेही जिथ आजही पडदा पध्दत अवलंबली जाते. आपला चेहरा आपल्या गळ्यापर्यंत झाकल्याशिवाय स्त्रीला समाजामध्ये वावरता येत नाहीये. पण, खूप आश्चर्याची गोष्ट अशी या उद्योगासाठी ज्या-ज्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्यामध्ये कंम्प्युटरवरचे काम किंवा निर्माण मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे असेल ही सगळी काम इथल्या 'स्त्रिया' करतायेत. खूप आश्चर्य वाटलं की, अजूनही जिथ पडदा पद्धत आहे. आपला चेहरा आपल्या गळ्यापर्यंत झाकला जातो, ती स्त्री कंप्युटर न शिकताही अगदी लिलया हाताळू शकते.

मला आठवतय, नवीन सरांनी एक स्वत:चा अनुभव सांगितला. सरांची ही कंपनीच म्हणूयात, ही चालते ती पत्र्यांच्या भिंतीच्या आत, ती पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी सर थोडेसे 'मी' पणाच्या भावनेला चिकटलेले होते. सर म्हणाले, मला वाटल होतं, ' मी खूप शिकलोय, इंग्रजीवर स्वार झालोय. या लोकांना इग्रजीचा गंधही नाही. या सगळ्यामुळेच मी खूप महान अशा अविर्भावात सरांनी तिथ प्रवेश केला. प्रवेश करताच सरांनी एक महिला कंम्प्युटरवरती काहीतरी काम करत असताना पाहिली. ती काहीतरी टाईप करत होती, काय ते माहित नाही. सहजच सरांच्या नजरेत एक अशिक्षित, अडाणी, की- बोर्डेची बटण दाबत बसलेली स्त्री आली आणि, याच 'मी' पणाच्या स्वरात सर त्या महिलेला म्हणाले, 'तुम्हाला समजतय तुम्ही काय करताय?' तेव्हा त्या महिलेच उत्तर सरांसाठी आणि आमच्यासाठीही खूप मार्मिक असंच होत. ती म्हणाली, 'की मला माहित नाही मी कोणत्या अक्षराच बटण दाबतीये पण, कोणत बटण दाबल्यानंतर माझ्यासमोर असलेल्या या पडद्यावरती मला जे पाहिजे ते येत हे मात्र मी नक्कीच सांगू शकते.' म्हणजेच अक्षरांच ज्ञान नसताना ही, फक्त बटण लक्षात ठेवून काम करणारी लोक ज्यावेळी सरांनी पाहिली, सर म्हणाले की, 'खरंच मला त्यावेळी माझीच लायकी कळाली. लोक कशा प्रकारे जगतायेत हे मी जवळून उघड्या डोळ्यांनी पाहिलं. आणि क्षणाक्षणात माझा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलला. मिनिटापूर्वी स्वत:ला अति शहाणा समजणारा मी त्यांच्या एक मिनिटानंतर स्वत:ला खूप लहान, शिकून ही अडाणी समजू लागलो.' खरचं थोड्याशा यशानं आपण खूप हुरळून जातो. आपल्यापेक्षा थोऱ्यामोठ्यांकडे आपण तुच्छतेच्या भावनेन बघू लागलो. आणि, मी खूप शहाणा' या खोट्या अविर्भावात जगत असतो. पण म्हणतात ना, 'या जगात शेराला सव्वाशेर असतोच!' आपल्यापेक्षा यशाने खूप मोठी माणसं आहेत, घडतायेत आणि घडतच राहणार आहेत. ही गोष्ट आपण कुठतरी विसरत चाललोय आणि त्यामुळेच या सगळ्यातून जन्माला येणारी 'नीतीमत्ता' म्हणूनच तर ढासळत चाललीये. असो...

सरांच्या व्याख्यानातून जो भाग उमगला तो असा होता जो सरांच्या विषयाच 'सार' होता. ते म्हणजे, हे अधांतरीच आभाळ कोसळत का नाही? प्रत्येक अधांतरी गोष्टीला आधाराची –खांबाची गरज असते. पण, या आभाळाचे खांब नाहीयेत मग ते कोसळत का नाहीये? तर, ते याच मुळे या जगात जे चांगले लोक आहेत तेच या आभाळाचे न दिसणारे खांब आहेत. त्यांच्यातून निर्माण होणाऱ्या चांगल्या शक्तीमुळे हे आभाळ आजही तितक्याच समर्थपणे आपल्यावरती तरंगतय.

सरांच व्याख्यान आम्हाला आणखी एका वेगळ्या याटेवरती घेवून जाणारं असच ठरलं. आणि 'स्व'ची जाणीव निर्माण करुन देणारं स्वयंसिद्धातल पाचव पाऊल ठरलं.

स्वयंसिद्धाच्या सातव्या सत्रामध्ये डॉ. श्री. सचिन कुलकर्णी, कोल्हापूर यांचे 'स्त्रित्वाची जाणीव' या विषयावरती व्याख्यान आयोजित केले होते. भलेही आज आपण प्रत्येक क्षेत्रात पुढे असू, पुरुषाच्या बरोबरीने प्रगती करत असू पण, आपण एक 'स्त्री' आहोत या स्त्रीपणाची जाणीव आणि भान आपल्या अंगी असलच पाहिजे. अस थोडसं बंधनात्मक आणि आपल्याला आपलीच जाणीव निर्माण करुण देणार अस सचिन सरांच व्याख्यान, 'अपर्णा रामतीर्थकर ' या समर्थ महाराष्ट्र कन्येची आठवण करून देणार असंच ठरलं.

खरंतर आज 'स्वयंसिद्धा' या शिबीराची शेवटची रात्र आणि याच रात्रीचा आणि एकंदरीत शिबीराचा आनंद घेण्यासाठी सर्व शिबीरार्थी विद्यार्थिनींसाठी शेकोटीचे आयोजन करण्यात आले होते. थंडी असल्यामुळे या शेकोटीचा आनंद सगळ्यांनी खूप सुंदररित्या घेतला आणि उल्लेखनिय म्हणजे फक्त शिबीराच्याच विद्यार्थिनी यामध्ये सहभागी झाल्या नाहीत तर, शारदानगरच्याच सर्व मुलींसाठीही ही आमची शेकोटी खूप आनंद देणारा असाच ठरली. वेगवेगळ्या माध्यमांतून इथेही मुली व्यक्त होतच राहिल्या. कुणी कवितांच्या रूपाने, कुणी डान्सच्या रुपाने तर कुणी नाटकाच्या रुपाने शेवटी डॉल्बीच्या तालावर थिरकणाऱ्या तरुणायीच्याही रुपाने आणि या सगळ्यांनंतर रात्री दीड वाजता या शेकोटीचा आनंद घेवून आमच्या 'स्व' ची जाणीव झालेल्या 'स्वयंसिद्धा' झोपी गेल्या.

बुधवार दि.२१/१२/२०१६ हा स्वयंसिद्धा संमेलनाचा शेवटचा दिवस दिवसाच्या सुरुवातीपासूनच संमेलनाच्या आम्ही सगळ्याजणी खूपच भावनिक झालो होतो. हे 'स्वयंसिद्धा' संमेलन चारच दिवसांऐवजी सात–आठ दिवसांचे का नाही! याची खंत प्रत्येकजण व्यक्त करत होती. याच दरम्यान शिबीरार्थी मुलींनी मनोगते व्यक्त केली. बऱ्याच जणींनी आपल्या भावनांना या स्वयंसिद्धाच्या स्टेजवरती वाट मोकळी करुन दिली, तर काहीजणींच्या भावस्पर्शी मनोगतांमुळे ऐकणाऱ्यांची मनं अश्रूच्या रुपांनी मोकळी झाली. खरचं शब्दातही न सांगता आणि मांडता येणारा असा तो क्षण ...आयुष्यातील अविस्मरणीय अशाच प्रसंगापैकी एक.

समारोपाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित मा. होते लोखंडे सर. त्यांचा विषय होता,'खेड्यांचा विकास करुयात!' भारत हा खेड्यांचा देश. ज्याची ओळख एक संस्कृतीप्रधान देश म्हणून जगभर आहे. याच भारताचे प्रमुख अंग म्हणजे ही खेडी. आणि म्हणूनच खेड्यांचा विकास होण खूप गरजेच आहे याची जाणीव आपल्याला सतत करुन देण्यात येत असते. लोखंडे सरांचे कार्य याबाबतीत खूप मोठं

अस आहे. भारतातील जवळपास ७० से ७५% खेड्यांना सरांनी स्वत: हा जावून भेट दिली आहे. याचमुळे खेड्यातील लोकांच्या समस्या त्यांनी जवळून पाहिल्यात आणि अनुभवल्यातही आणि त्याचमुळे खेड्यांच्या विकासासाठी अहोरात्र कष्ट आणि धडपड सर करत आहेत. आज या खेड्यांची ओळख खरतरं सरांच्या नावाने होत आहे, हे सरांच्या कार्याची माहिती करुन देण्यात आली त्यातून समजलं. या सगळ्यामुळेच सरांच व्याख्यान 'स्वयंसिद्धा संमेलनातील 'स्व' ची जाणीव निर्माण करुन देणारे सहावे पाऊल ठरले.

यासगळ्यानंतर आम्ही शपथ घेण्यासाठी ए.पी.हॉल. (आप्पासाहेब पवार सभागृह) ज्याची ओळख संपूर्ण बारामतीमध्ये 'व्हाईट हाऊस' अशी आहे. त्या व्हाईट हाऊसमध्ये आम्ही चार दिवस स्वत:ची जाणीव झालेल्या सगळ्याजणी भावी आयुष्यात येणाऱ्या अनेक महत्त्वाच्या प्रसंगाना सामोरे जाताना आपण एका समर्थ राज्याची-देशाची एक सामर्थ्यवान मुलगी आहोत याच भान प्रत्येकवेळी रहावं, जी ठिणगी घेवून या शारदानगरच्या प्रारंगणात आलो होतो, त्या ठिणगीचीच ज्योत झालेली महाराष्ट्राची प्रत्येक 'महाराष्ट्र कन्या' आपल्या हातामध्ये पणती घेवून शपथ घेत होती, की ''मी एक स्त्री आहे. मी मुलगी आहे. माझी निर्मिती एका स्त्रीमुळेच झाली ती म्हणजे माझी आई. आणि भविष्यात माझ्यामुळे जिची निर्मिती होणार आहे, ती माझी मुलगी. कोणत्याही परिस्थितीत ती जन्माला येण्याअगोदर तिच अस्तित्व माझ्यामुळे मिटल जाणारं नाही. ज्या पद्धतीनं मी या महाराष्ट्रात जन्म घेतला त्याच समर्थ महाराष्ट्रात जन्म घेण्याचा अधिकार तिलाही आहे. ज्या अभिमानानं आणि स्वाभिमानानं मी या मातीत जगतिये त्याच मातीत त्या उमळू पाहणाऱ्या कळीला उमळण्याचा आणि फुल बनून जगण्याचा अधिकार आहे. आजपर्यंत ज्या कळ्या उमलू शकल्या नाहीत, ज्यांना उमलण्या अगोदरच खुडण्यात आलं ते मी बदलू शकत नाही. पण, माझ्यामुळे कोणतीच कळी उमलण्याअगोदर खुडली जाणार नाही.''

स्वयंसिद्धाची ही शपथ घेताना अक्षरश: मुलींच्या डोळ्यातून अश्रूधारा ओघळत होत्या. आपण खूप काही गमवल्याचा भावही त्यांच्या चेहऱ्यावरती दिसत होता. पण, आपण अजूनही खूप माही सावरु-सांभाळू शकतो! असा ठाम विश्वासही त्याच्या हृदयामध्ये निर्माण झाला होता. आणि हाच शपथविधी आम्हाला स्वयंसिद्धातील 'स्व' ची जाणीव निर्माण करुन देणारे सातवे पाऊल ठरला.

प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील महत्त्वाचा क्षण म्हणजे, 'लग्न' असं म्हणतात, लग्न झाल की तिच आयुष्य पुन्हा नव्याने, नव्या लोकांनसंगे सुरु होते ते 'सप्तपदीच्या' साक्षीनं मला वाटत स्वयंसिद्धासाठी आलेली प्रत्येक मुलगीही या 'स्व' ची जाणीव निर्माण करुन देणाऱ्या विविध व्याख्यांनांच्या व्याख्यानरुपी सप्तपदीने परिपूर्ण झाली. आणि 'स्वयंसिद्धा' या चार दिवसांच्या शिबीराबधून नवीन सात विचार, सात प्रकारे ठाम विश्वास घेवून उगवल्या महाराष्ट्राची दशा आणि दिशा बदलण्यास सज्ज झाली.

■■■



थक्क करणारा प्रवास : मन मे है विश्वास

(ग्रंथपरीक्षण)

– कु. प्रियांका महादेव साखरे
बी.एस्सी.भाग ३

समाजात मानसन्मान मिळावा, पद आणि प्रतिष्ठा असावी आणि या पदाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी करावी अशी स्वप्ने पाहणाऱ्या, त्यासाठी धडपडणाऱ्या युवक युवतींना स्पर्धा परीक्षेचे क्षेत्र नेहमीच खुणावत असते या क्षेत्राचे आकर्षण यासाठी अहोरात्र कष्ट करण्याची तयारी जिद्द असूनही या क्षेत्रात यश मिळतेच असे नाही. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरूणाईला मार्गदर्शन व योग्य दिशा देण्याच मार्गदर्शन करणारे आत्मचरित्र म्हणजे आय. पी. एस. अधिकारी विश्वास नांगरे–पाटील यांचे 'मन में है विश्वास'.

एकूण अकरा प्रकरणांमध्ये विभागलेल्या 'मन में है विश्वास' या आत्मचरित्रात लेखकाच्या इच्छाशक्तीला दृढ असणारे त्यांचे आई–वडील, आजीचं प्रेम, आत्या व त्यांच्या यजमानांची शिस्त यातून घडत असलेल्या, भारतीय पोलीस सेवेमध्ये येण्यासाठी अपार कष्ट, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी मानसिकता , अभ्यासातील चुका यामधून शिकण्याची धडपड प्रसंगी आवडत्या पदार्थांचा त्याग करणारा व यशाची एक–एक पायरी चढणारा, एक धडपडा उमदा युवक आपल्याला 'मन में है विश्वास' या आत्मचरित्राच्या पाना–पानांवर भेटतो.


सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा या तालुक्यातील कोथरुड या गावच्या विश्वास नांगरे–पाटील यांचा शैक्षणिक प्रवास हा शिराळा–कोल्हापूर–मुंबई असा आहे. कोल्हापुरात राजाराम कॉलेजमध्ये बी.ए.ची पदवी घेत असताना 'बेस्ट राजारामीयन' हा पुरस्कार आर.माधवन हे रुममेंट, हेमंत निंबाळकर जे बंगळूर येथे आय. जी.म्हणून महाराष्ट्र व कोल्हापूर तसेच शिवाजी विद्यापीठाचे नावलौकिक करीत आहेत यांचे अनुभव लेखकाने आत्मचरित्रात लिहीलेले आहेत. सद्गुणी अभ्यासू मित्रांची संगत करावी, भरकटणाऱ्या मित्रांपासून कटाक्षाने लांब राहावे, याचे मार्गदर्शन या पुस्तकातून वाचताना आपल्याला मिळते.

अत्यंत ओघवत्या शब्दात, सोप्या भाषेत आपला जीवनपट विश्वास नांगरे–पाटील यांनी आपल्या पुस्तकात उलगडलेला आहे. त्यांची सहज, साधी, सोपी भाषा आपल्या थेट हृदयाला भिडते. हातात घेतलेले पुस्तक एका बैठकीत वाचून संपवावे, असे आपल्याला वाटते. पुस्तक वाचताना आपण पानामागून पाने उलटवत जातो आणि लेखकाचे यश हे आपलेच यश वाटू लागते. त्यांच्या खेचून आणलेल्या यशाला आपल्याला नक्कीच सलाम करावासा वाटतो. जेव्हा विश्वास नांगरे–पाटील आय. पी. एस. झाले हे वडीलांना समजले, तेव्हा वडील म्हणतात 'भावड्या माझ्या वाघा' या त्यांच्या वाक्यावर वाचणाऱ्यांचे डोळे पाणवतात.

'मन में है विश्वास' या आत्मचरित्रातील शेवटची चार प्रकरणे ही स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी लेखक हा मुंबईच्या एम्.आय.ए.सी वसतीगृह व ग्रंथालयाचा उपयोग करतो. याविषयी तसेच यू.पी.एस.सी. पूर्व परीक्षा एम.पी.एस.सी ची तयारी नंतर केंद्र व राज्य स्पर्धा परीक्षेची तयारी नंतर निकाल यावर आधारित आहेत. यात लेखकाने मुलाखती प्रश्न व त्यावरील उत्तरे तर्क संगती यांचे केलेले वर्णन आपल्याला प्रेरणादायी ठरते. एकूणच ही यशस्वी जीवनगाथा प्रत्येकाने वाचून प्रेरणा घेण्यासारखी आहे. माझ्या आयुष्यातील एक टर्निंग पॉईंट ठरलेलं हे आत्मचरित्र नक्कीच प्रत्येक युवकांनी वाचावं असचं आहे.

अशा या सामर्थ्यवान व्यक्तीमत्त्वाचं आत्मकथन वाचून तुमच्यापुढे मांडण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न!

■■■



प्रेम

मावळणाऱ्या सूर्याला डोंगर विचारतो
तू मावळताना नेहमी माझ्याच जवळ का येतोस
तेव्हा सूर्य म्हणतो डोंगराला
मी तुझ्यावर खूप प्रेम करतो
तसेच
जेव्हा सखी विचारते सख्याला
तू नेहमी माझ्याकडेच का पाहतो
तेव्हा सखा म्हणतो सखीला
मी तुझ्यावर जीवापाड प्रेम करतो.

कु. दिपाली नितीन ढेरे
बी.कॉम.भाग १

जगणं खूप सुंदर आहे

जगणं खूप सुंदर आहे
त्यावर हिरमुसु नका
एक फूल उमललं नाही म्हणून
रोपाला तोडू नका
सगळं मनासारख होतचं असं नाही
पण मनासारखं झालेल विसरु नका
सुटतो नकळत काही जणांचा हात
पण धरलेला हात सोडू नका

कु. सोनाली विष्णू कदम
बी.ए.भाग १



फॅशन

(माहितीपर लेख)

– कु. शर्मिला भगवान देशमुख
बी.ए.भाग ३

''धूम मचाले, धूम मचाले, धूम''

असा म्हणायचा अवकाश की आमच्याकडे आमचे बंधू धूम मचवून रिकामे लगेच घरा–घरात 'धूम' गाडी हवीय म्हणून चिरंजीवांचा पिताश्रीकडे हट्ट, ऐश्वर्याचा 'शरारा' ड्रेस तिचा पिक्चर रिलिज व्हायच्या आतच कॉलेजतरूणींच्या अंगावर आणि या सर्वातूनच जन्म होतो तो 'फॅशन' चा.

कोठेही गेलात तरी आपले व्यक्तिमत्व हे छाप पाडणारे असावे, यात महत्त्वाची भूमिका बजावते ती 'फॅशन' माणूस चुकल्यामुळे ज्या गोष्टीचा जन्म होतो ती म्हणजे 'फॅशन'.

मानवी मन सौंदर्ययुक्त आहे. सुंदर व आकर्षक दिसण्यासाठी माणूस वाटेल ते करतो. स्वत:ला अनेक प्रकारे नटवत असतो. आपण कोणीतरी विशेष आहोत, याची जाणीव त्यांना होत असते. त्यासाठी मनाचा कल विविध प्रकारच्या फॅशनकडे वळू लागतो. वर्षानुवर्षे वडीलधाऱ्या लोकांच्या विरोध झाला तरी माणूस फॅशनचा पाठपुरावा करीत राहतोच कारण फॅशन ही त्याच्या मनाची ओढ आहे.

'फॅशन' या इंग्रजी शब्दाचा 'पद्धत' असा मराठी अर्थ होतो. फॅशन म्हणजे जगण्याची रीत ती स्थळकाल, वातावरण यानुसार वेगवेगळी असते. हा शब्द नव्याने रुढ झाला असला तरी अशा तऱ्हेच्या बदलांची फार पुरातन काळापासून वाहिवाट आहे. मग तो बदल कधी वेशभूषेत असतो, तर कधी केशभूषेत असतो. फार पूर्वीपासून भारतात वेगवेगळ्या प्रांतातील पोशाखातील पद्धत त्या त्या प्रांतातील वातावरणानुसार वेगवेगळी असायची.

फॅशनचे एक उत्तम उदाहरण म्हणजे, 'आजकाल प्रत्येकाच्या एक हात आणि एक कान मग्न ठेवणारा मोबाईल.'

फॅशन कॉलेजची,
नवीन स्टाईल,
बारावी नापास,
तरीही हातात मोबाईल.

अनेकदा फॅशन ही अनुकरणातूनच जन्माला येते. गेल्या वर्षात चित्रपटातील नट–नट्यांनी तरुण पिढीवर इतका प्रभाव पडला आहे की फॅशनच्या नावावर अंधानुकरण करण्याची प्रथाच निर्माण झाली आहे. पण हे वेड पुरवताना सभ्यता, संस्कार, नितिमत्ता यांचा विचार न करता कमीत–कमी व तंग कपडे परिधान करून देह प्रदर्शन करत वावरणारी पिढी दिसत आहे. त्यामुळे 'पचेल ते खावे, आणि शोभेल ते परिधान करावे' या तत्वाला तिलांजली देत आहे. अहो, आम्हाला फॅशन म्हणजे काय हेच कळत नाही, तरीही आम्ही फॅशन करतो.

आजच्या गतिमान युगात नव–नवीन शोधामुळे तर जग इतक जवळ आले आहे की, जगाच्या कोपऱ्यातील कोणतीही फॅशन लगेचच जुनी होत आहे. कारण फॅशन चक्राकार आहे. सध्याची फॅशन तर सारासार विचारसरणी व सौंदर्यदृष्टी गहाण टाकलेलीच वाटते.

उदाहरणार्थ– 'चांगली पँन्ट फाडून ठिगळे जोडणे हे

लोकप्रिय झालेली फॅशन.

बाकी सगळे ठीक आहे. पण प्रेमात सुद्धा फॅशन आपलं डोक वर काढीत आहे, ते कसं सांगते,

''प्रेमाच्या घरात घसरला पाय
एकीला हाय तर दुसरीला बाय,
अन् तिसरीसंग पळून जायं.''
'तू नही तो कोई और सही,
और नहीं तो और सही

च्या पद्धतीला फॅशनच म्हणतायचं बरं का!

फॅशन ही वाईट नाही. सतत बदलत जाणे ही मानवी प्रवृत्ती असल्याने नको त्याचे अंधानुकरण न करता स्वत:चे कोणतेही नुकसान न करण्याची काळजी तरुण पिढीने घेतली पाहीजे. 'जमाने के साथ हमे भी बदलना चाहिए' तरूणांनी आता फॅशन करायची नाहीतर मग कधी? तसे फॅशनला वयाचे बंधन नाही. कारण लांब कशाला आपल्या 'कौन बनेगा करोडपती' चा कर्ता-करविता अमिताभ बच्चन वयाची सत्तर वर्षे उलटून गेलो तरी फॅशनच्या दुनियेतून बाहेर पडायच नाव घेत नाही.

कसेही असले तरी फॅशन ही तरुणांच्या जीवनातील खूप महत्त्वाची गोष्ट बनली आहे. फॅशन कधी आपल्याला सोडणार नाही आणि आपण कधी फॅशनला सोडणार नाही, एवढे मात्र खरे.

■■■

मैत्री

मैत्री असावी कडकडणाऱ्या विजेसारखी
स्वत:हाच्या मैत्रिणीवर जेव्हा संकट येईल
तेव्हा त्या संकटावर तुटून पडणारी
मैत्री असावी समुद्राच्या संथ पाण्यासारखी
सखोल, निस्वार्थी
त्यात फक्त स्वत:हाचा विचार न करणारी
मैत्री असावी रिमझिम पडणाऱ्या पावसासारखी
एकमेकींवर प्रेमाचा वर्षाव करणारी
मैत्री असावी जत्रेतल्या विदुषकासारखी
सतत एकमेंकीना हसवत राहणारी
तिच्या चेहऱ्यावर आनंदाची एक रेषा पाहण्यासाठी
तरसलेल्या एका वेड्या प्रियकरासारखी
मैत्री असावी फणसासारखी
वरुन काटेरी पण आतून रसाळ असणारी
मैत्री असावी तेजस्वी सूर्यासारखी
एकमेकांना प्रकाश देणारी
मैत्री असावी चंद्रासारखी
अंधाऱ्या रात्री एकमेकींना प्रकाश देणारी
सोबत देणारी
मैत्री असावी ताऱ्यांसारखी
चमकणारी व लुकलुकणारी
मैत्री असावी पर्वतशिखरांसारखी
उंचच उंच वाढत जाणारी
मैत्री असावी कैरीसारखी
थोडी खट्टी थोडी मिठी

कु. दिपाली नितीन ढेरे
बी.कॉम.भाग १



पेन्सिल

(ललित लेख)

– कु. प्रणाली दिलीप पाटील
बी.कॉम.भाग १

'पेन्सिलीला' हे माहिती असतं की आपल्यात बरीच ताकद आहे. आपण काय वाटेल ते लिहू शकतो. ते वाचून मोठमोठ्या सत्ता हादरु शकतात. पण ती ही कधीही विसतर नाही की लिहिण्याची ताकद तिच्यात असली तरी लिहून घेणारा, लिहितं करणारा हात मात्र वेगळा असतो. त्या हाताच्या ताकदीवर पेन्सिल तारं लिहीत असते. आपल्याही जगण्याला असाच एक हात सतत मार्गदर्शन करीत असतो. आपल्याला मान्य असो वा नसो. एक हात आपलं जगणं घडवितो. त्याला दिशा देतो. त्याला आपण देव असं म्हणतो. म्हणून हे कधीही विसरू नये की कर्ताकरविता दुसराच असतो.

लिहिण्याची ताकद आहे म्हणून लिहितच सुटलं, एकच काम एकाच तऱ्हेने करीत राहिल तरी चालतं असं पेन्सिल कधी करत नाही. थोडकाम झालं की तिला शार्पनर लागतं. स्वत:ला तासून काढाव लागतं, त्यान तिला त्रास होत नसेल का...? तो होतोच पण तरी ती स्वत:ला तासून घेते, स्वत:ची धार वाढवते, तसंच आम्हालाही करायला हवं. वेळोवेळी स्वत:ला तासायला हवं, मनावर साचलेली काजळी निपटून काढायला हवी. त्रास त्रास होईलच पण सहन करायला हवं...पेन्सिलीसारखं.

पेन्सिलीचा तिसरा गुण म्हणजे पेन्सिलीच्या दुसऱ्या टोकाला एक खोडरबर असतो. पेन्सिल ज्या चुका करते त्या चुका खोडरबर खोडून काढतो. पण आपण चुका करतो आणि त्या वेळोवेळी कबूल करुन दुरुस्तही कराव्या लागतात. हे पेन्सिल खुलेआम कबूल करते. चुका करणे आणि आपल्या चुका मान्य करुन दुरूस्त करणे यात कमीपणा काही नाही. उलट तसं केलं तरंच आपल्या चुका कमी होतात आणि आपण योग्य मार्गाने चालत रहातो.

चौथा गुण, पेन्सिल बाहेरुन लाकडाची दिसते. काही पेन्सिल चकाकतात काही साध्याच असतात काही सुंदर दिसतात. काही नेमतेम असतात. पण पेन्सिलीची परीक्षा ही तिच्या बाह्य रुपावरुन कुणी करु नये तिच्या आतलं शिसं किती उत्तम आहे, किती लिहितं, कसं लिहित, किती झिजतं हे पाहून तिची गुणवत्ता ठरते. आपण स्वत:च्या संदर्भातही हेच करायला हवं. बाहेरच्या रंगरुपापेक्षा आपल्या आत काय चाललयं, आपलं अंतरंग कसं आहे याकडे लक्ष द्यायला हवं कारण आतली ताकद हिच तरी पेन्सिलीची खरी ताकद असते...!

पाचवा गुण, पेन्सिल जे काही करते तिच्या खुणा कायम राहतात. कितीही खाडाखोड केली तरी काही काळे डाग कायम दिसतात, आपणही हे लक्षात ठेवायला हवं की आयुष्यात जे काही करु त्याची एक खुण, एक ओरखडा, एखादा डाग कायम आपल्या जीवनपटावर उमटेल. त्यामुळे जे काही कराल ते अत्यंत विचारपूर्वक करा...कारण काही ओरखडे कायम राहतात...!



अतूट नातं

(ललित लेख)

– कु. लक्ष्मी सुभाष पाटील
बी.कॉम.भाग ३

'मैत्री' एक अर्थपूर्ण शब्द, इतका की जीवनभर मैत्री निभावूनही शेवटपर्यंत न उलगडणारा. खरंच , काय असतं असं या मैत्रीच्या नात्यात? अतूट विश्वासाच्या भक्कम पायावर उभी असलेली ही मैत्रीची इमारत खुप काही घटक आणि घटनांनी भरलेली आणि सजलेली असते. उंचउंच कडेकपाऱ्यांतून आणि डोंगरांवरुन कोसळणाऱ्या धबधब्यात मैत्री असते ती निस्वार्थपणे स्वत:ला झोकून देण्याची, इतकी की कोणताही मागचा पुढचा विचार न करता ओसंडून वाहण्याची आणि भरभरून खळाळण्याची.

भल्या पहाटे आपल्या अतूट मैत्रीची आठवण करुन देतात ते म्हणजे दवबिंदू, इतके कोमल, तरल आणि निर्मल असतात की नुसत्या त्यांच्या अस्तित्वानेच हरिततृण तृप्त होऊन जातात. यामुळे दोन विभिन्न घटकांच्या एकरुपतेचं ते एक उत्तम प्रतिक बनतात.

नदीची मैत्री असते ती काठाशी. वेडीवाकडी वळणे घेत मनसोक्त वाहणाऱ्या नदीला काठ तिच्या मर्यादांची जाणीव करून देतो. नदीचं वाहत जाणं आणि तिचं मनसोक्तपणे बहरणं रमणीयं, नयनरम्य आणि मनोहारी करतो, तो काठच, नाही का? नदी सुद्धा या मर्यादा न ओलांडता, या मर्यादांच्यापलीकडे न जाता मैत्रीचं नातं जपते. एकमेकांच्या मैत्री व्यक्त करण्याची नाजूक अशी कला नदीला आणि काठाला सहज जमूनही गेलेली आहे आणि त्यामध्ये ते रमलेदेखील आहेत.

कमळ आणि भ्रमर यांच्यात नातं असलं तरिही प्रथमत: त्यांच्यात मैत्रीच होती, आहे आणि राहील. त्यांच्या मैत्रीची घट्ट वीण आहे म्हणूनच त्यांच्यातील नातं आजही अतूट आहे. निसर्गात असणाऱ्या असंख्य सुवासिक कमळ आणि भ्रमर यांचीच मैत्री नावाजली गेली कारण फक्त एकच – 'अहंकाररहित मैत्री' मी आणि माझं हे सर्व विसरुन ते एकमेकांना स्वीकारतात, एकमेकांच्यामध्ये रमणाम होतात आणि काळ, वेळ हरपून आलेला क्षण जगतात. हा कोणताही नैसर्गिक चमत्कार नसून हीच खरी मैत्री आहे.

रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचं नातं हे नेहमी श्रेष्ठ ठरतं म्हणूनच मैत्री करताना ती निरपेक्ष भावनेनं करावी तरच त्यातील वीण ही अबाधित राहते. मैत्री हे मानवजातीला मिळालेल खुलं दालन आहे. यामध्ये समरसून सहभागी व्हावे, पण हाताचं राखून नाही. फक्त मैत्री जपण्याची कला आपल्यात असायला हवी.

आपण लहान असताना एकमेकांना एक कोडं घालत असू, दोन मित्र शेजारी पण एकमेकांना भेटत नाहीत. याचे उत्तर हे 'आपले दोन डोळे' होय. आपले हे डोळे एकमेकांना कधीच भेटत नाहीत पण ते एकमेकांच्या साह्याने संपूर्ण जग पाहतात. हीच ती खरी मैत्री!

काही जणांच्या मते मैत्रीच्या अनेक व्याख्या असतात. त्यामध्ये ती कधी कृष्ण–सुदामासारखी निखळ, वात्सल्यपुर्ण तर कधी ती झऱ्यासारखी खळखळणारी व चंद्रासारखी शीतल असते.

माझ्या मते मैत्री म्हणजे,

'Few Relations In Earth Never Die (FRIEND)

म्हणूनच कधीही मैत्रीविना आयुष्य जगू नका.

■■■



भारताच्या गुप्तहेर संघटना व त्यांचे कार्य

(माहितीपर लेख)

– अक्षय नेताजी पाटील
बी.एस्सी.भाग २

भारताचे अंतर्गत तथा बहिस्थ संरक्षण हे गुप्तपणे ज्यांच्या खांद्यावर असते त्या धाडसी वीरांना गुप्तहेर (SPY) म्हणतात. पाहुया अशाच संघटनेचे कार्य, व त्या वीरांच्या बलिदानाची कहाणी.

*** अंतर्गत संरक्षण गुप्तहेर संघटना :–**

भारताच्या भूप्रदेशामधील असे काही संशयित व्यक्ती जे देशविघातक कृत्य करतात त्यांना रोखण्याचे किंवा ती माहिती (गुप्त) सुरक्षा बलांना पुरवण्याचे काम ही संघटना करते. जिचा जागतिक १० गुप्तहेर संघटनेमध्ये दबदबा आहे. त्या संघटनेचे नाव भारतीय गुप्तहेर संघटना IB (Intelligence Bureau) होय.

IB या गुप्तहेर संघटनेची स्थापना सन १८८५ मध्ये ब्रिटीशांनी केली. त्याचे कारण ही तसेच होते. जेव्हा १८५७ ची मंगल पांडे यांनी जो सशस्त्र उठाव केला. तेव्हाच एका गुप्तहेर संघटनेची आवश्यकता ब्रिटीशांना लागून राहीली. आणि तेव्हाच सर चार्ल्स यांनी IB ची स्थापना केली होती. पण जेव्हा भारत सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य झाला. तेव्हा Intelligence Bureau हे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अधीन गेले. IB हे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या जबाबदारी कक्षेमध्ये येते.

* अंतर्गत गुप्तहेर संघटना (IB) चे कार्य :–

१) सर्वात महत्त्वाचे IB चे कार्य कोणते असेल तर ते भारतीय भूप्रदेशामधून पाकिस्तानी गुप्तहेर संघटना ISI (Inter Service Intelligence) च्या हस्तकांचे (Agent) जाळे उद्वस्थ करणे. ISI चा प्रभाव कमी करणे, दहशतवादी नेटवर्क नेस्तनाबूत करणे.

२) नेपाळमधून पळून विदेशात जाण्याचा प्रयत्न करणारा हैद्राबाद (दिलसूखनगर) बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी इंडियन मुजाहिदीन या दहशतवादी गटाचा प्रमुख यासीन भटकळ याला IB च्या अधिकाऱ्यांनी केलेली अटक हे IB चे सर्वांत मोठे यश आहे. परंतु ही अटक आधी झाली असती तर दिलसूखनगर बॉम्बस्फोट घडलेच नसते. व अनेक निष्पाप भारतीयांचे प्राण वाचले असते.

३) २००८ मुंबई ताज हॉटेल दहशतवादी हल्ला होण्याअगोदर IB च्या Telecom division ने दहशतवाद्यांचे हल्ला करण्याअगोदरचे संभाषण Intercept केले होते. व ती गुप्त माहीती (Intelligence input) महाराष्ट्र गृह मंत्रालयाला दिली होती. परंतु महाराष्ट्र सरकारने या गोष्टीकडे गांर्भीयाने पाहीले नाही. व तो दुदैवी दहशतवादी हल्ला झाला. त्यामुळे शेकडोमुंबईकरांचे प्राण गेले. हे सुद्धा IB चे यशच आहे. परंतु त्याचा गांर्भीयाने सरकारने विचार केला नाही.

*** बहिस्थ (External) गुप्तहेर संघटना :–**

विदेशातील कोणत्याही भू–भागातून भारत सरकार, कट, कारस्थान, किंवा दहशतवादी हल्ले याविषयी गुप्त माहीती काढण्याचे काम ही

बहिस्थ गुप्तहेर संघटना करते. व त्या संघटनेचे नाव आहे RAW (Resarch and Analysis Wing) होय.

प्रामुख्याने ह्या गुप्तहेर संघटनेचे काम पाकिस्तान, चीन या देशामधील सैनिक, संरक्षणविषयक माहीती काढण्याचे काम गुप्तपणे करणे हे असते.

गुप्त माहीती ही तीन प्रकारची असते:-

a) Political Intelligence
b) Defence Intelligence
c) External Affairs Intelligence

प्रामुख्याने RAW चीन, पाकिस्तान या देशामधून Defence Intelligence संरक्षणविषयक माहिती आपल्या देशाला पुरवते. व त्यानंतर भारतीय सैनिक त्या देशाविरुध्द मोहिम आखते. व देशाला धोकादायक आक्रमणापासून रोखते.

त्यानंतर Political Intelligence (राजनैतिक गुप्त माहिती) RAW - अमेरिका, इंग्लंड, रशिया, श्रीलंका या देशामधून गुप्तपणे मिळवते. त्यानंतर भारत सरकार आपले पुढील धोरण आखते.

त्यानंतर येते ती (External Affairs Intelligence) परराष्ट्रविषयक गुप्त माहिती RAW गुप्तपणे त्या देशातून मिळवते. व आपल्या राष्ट्राला बलशाही तथा देशविघातक शक्तिपासून वाचवते. व आपले परराष्ट्रविषयक धोरण आखण्यास परराष्ट्र मंत्रालयाला मदत मिळते. सर्वात महत्त्वाचे काम करते म्हणजे ISI हस्तकांना (Agent) विषयी माहीती मिळवणे व ती माहीती Prime Minister Office (PMO) ला पुरवते.

*** <u>बहिस्थ गुप्तहेर संघटना व त्यांचे कार्य</u> :-**

RAW ची स्थापना सन १९६८ मध्ये केली. त्याचे पहीले प्रमुख हे रामेश्वरनाथ काव होते. तेच खरे चे RAW संस्थापक होते.

१) RAW ने सर्वांत महत्वपूर्ण भूमिका सन १९७४ मध्ये सिक्किम या राज्याच्या विलीनकरणामध्ये केली. सन १९७१ च्या भारत-पाक लढाईमध्ये पाकिस्तानच्या संरक्षणविषयक माहीती काढण्यामध्ये अग्रेसर होती. व त्यामध्ये RAW ने महत्वपूर्ण भूमिका बजावली. RAW चे सर्वात महत्वाचे धाडसी RAW Agent जे पाकिस्तानच्या गुप्तपणे कित्येक वर्ष राहून भारताला पाकिस्तानच्या गुप्त संरक्षणविषयक माहिती पुरवत होते. ते म्हणजेच RAW Agent रविंद्र कौशिक होय. ज्यांना पाकिस्तान सरकारने २००३ मध्ये छळ करुन रावळपिंड जेल मध्ये मृत घोषित केले.

बोलावं तर विचार करुन
नाहीतर बडबड तरच सारेच करतात
ऐकायचे तर अंत:करणातून
आरोप तर सारेच करतात

टिपावं तर अचुक टिपावं
नेम तर सारेच धरतात
शिकाव तर माफ करायला
राग तर सारेच करतात

जगावं तर इतरांसाठी
स्वत:साठी तर सगळेच जगतात
ठेवावा तर शत्रूवर पण विश्वास
घात तर सारेच करतात

खळगी भरावी उपाशी पोटाची
पोट भरुन तर सारेच जेवतात
घ्यावे तर दुसऱ्याचे दु:ख
सुखाचे घोट तर सारेच घेतात

दु:खामध्ये सुद्धा हसत रहावं
वेळ तर सर्वांचीच येते

-कु. सोनाली गणेश पाटील
११ वी आर्टस् (अ)

फक्त एवढचं करुन जा...

माझ्या अस्वस्थ मनातल्या
तुझ्या आठवणी पुसून जा
भग्न पावलेल्या स्वप्नाचे
आवशेष तरी वेचून जा

दु:ख तुझं सार देऊन
सुख माझं घेऊन जा
डोळ्यानं मधल्या आश्रूंचा
सडा तरी पाडून जा

कोमजलेल्या कळीचं
दर्शन तरी करुन जा
आशाहीन अवस्थेवर
केवळ दुरुन हसून जा

मृत्यूनंतर माझ्यासाठी
शेवटी एकदाच येऊन जा
खांदा नाही दिलास तरी
फुलं तरी वाहून जा...

-कु. रुकैय्या रिजवान तांबोळी
१२ वी आर्टस् (ब)



बैलपोळा

तुझ्यासाठी करीन म्हटलं चार पैसे गोळा
विसरुन सारं दु:ख आपलं साजरा करु पोळा
मालकाप्रति मातीचे इमान तू राखतो
चार वाढ्यांच्या मोबदल्यात दिवसभर राबतो
रानात राहू असेच आपण कष्ट आपले येतील फळा
विसरुन सारं दु:ख आपलं साजरा करु पोळा

जलमभर सेवा करणं तुझ्याकडून शिकाव
तरीसुध्दा वर्षातून तुला एकदा का ...रे पुजावं
हीच गोष्ट सर्जा मला कळत नाही मुळा
विसरुन सारं दु:ख आपलं साजरा करु पोळा

स्मार्ट होतीया सिटी, लोक होतायत फास्ट
नोकरदार मंडळीना काय कळणार आपले कष्ट
खाऊ घालतो त्यांना आपनं देऊन आपल्या पोटाला
पिळा विसरुन सारं दु:ख आपलं साजरा करु पोळा

आपल्या कष्टाला मोल नाही सरकारी दरबारात
नुकसान फक्त आपलेच असते व्यापाऱ्याच्या कारभारात
खरं तर सरकारी धोरणांनी घोटला आपला गळा
विसरुन सारं दु:ख आपलं साजरा करु पोळा

-कु. रुपाली रावसाहेब जाधव
११ वी आर्टस् (ब)



भारताचे अग्निपंख विसावले

(डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम)

– कु. गायत्री विश्वास राजमाने
११ वी सायन्स (अ)

भारतमातेच्या मस्तकावरच्या राजमुकुटात विराजमान होणारी फार मोजकीच रत्ने असतात. असेच एक रत्न म्हणजेच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना माझा सलाम.

''शब्दांनाही कोडी पडावीत
अशी काही माणसे असतात,
आमचं केवढ भाग्य म्हणायचं
जेव्हा ती आमची असतात.''

भारताने नुकताच चंद्रावर चंद्रयान पाठवून मोजक्याच प्रगत देशात महत्त्वाचे स्थान पटकावले आहे. या उज्ज्वल यशामध्ये अनेक तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञांचे कठोर परिश्रम कारणीभूत आहेत. अशा या शास्त्रज्ञांमध्ये आदराने ज्यांचे नाव घेतले जाते ते म्हणजे डॉ. ए.पी. जे. अब्दुलकलाम. कलामांनी 'अग्नी'आणि'पृथ्वी' ही क्षेपणास्त्रे तसेच उपग्रह प्रक्षेपणासाठी वापरण्यात येणारे अग्निबाण विकसित करण्यामागे मोलाचे योगदान दिले. त्यामुळे कलामांना प्रत्येक भारतीय 'मिसाईल मॅन' (अग्निपुरुष) म्हणून ओळखले जाऊ लागले.

मंदिरासारखा भव्य विचार, लिंगासारखा शुध्दाचार असलेल्या कलामांचा जन्म ५ ऑक्टोंबर १९३१ रोजी तमिळनाडूमधील रामेश्वर येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकीर जैनुलाब्दिन अब्दुल कलाम असं आहे.

कलामांच संपूर्ण बालपण हे रामेश्वरमध्येच व्यथित झालं. रामेश्वरच महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे तेथील समुद्रकिनारा. त्याच्या वडिलांचा मासेमारी आणि नाव चालवणे हा व्यवसाय होता. त्यामुळे कलाम हे तासनतास समुद्रकिनाऱ्यावर असायचे. वाळूत खेळणं, शिंपले गोळा करणे हा त्यांचा छंद होता.

त्या समुद्रकिनाऱ्यावर सीगल नावाचे पक्षी यायचे. त्या पक्ष्यांकडे पाहूनच त्यांनी लहानपणी एक स्वप्न पाहिलं, ते म्हणजे विमानाचं पायलट व्हायचं विमानात बसणारा रामेश्वरमधील पहिला मुलगा आपणच व्हायचं, हे त्यांच्या आयुष्यातील एकमेव स्वप्न होते. त्यातूनच त्यांना भावी आयुष्यात रॉकेट निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. चेन्नई येथूनच त्यांनी एअरॉनॉटिकल अभियांत्रिकीमधील पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी भारताच्या क्षेपणास्त्रे व प्रक्षेपक अग्निबाण विकसन कार्यक्रमात स्वत:ला झोकून दिले. भारत सरकारच्या संरक्षण विभागाचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार म्हणून त्यांनी सुमारे सात वर्षे काम केले. ११ मे १९९८ मध्ये भारताने पोखरण येथे अणुस्फोट चाचण्या केल्या होत्या. याचे शिल्पकार कलाम हेच होते.

कलामांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना अनेक विदयापीठांकडून डॉक्टरेट देऊन सन्मानित करण्यात आले. भारतसरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण हे किताब देऊन त्यांचा गौरव केला. १९९७ मध्ये भारतातील सर्वोच्च समजला जाणारा 'भारतरत्न' हा पुरस्कार बहाल करण्यात आला.

गणित, विज्ञान, तमीळ, इंग्रजी हे त्यांचे आवडते विषय होते. विज्ञानाने विकास, विवेकाने प्रतिष्ठा आणि ईश्वराची पूजा केल्याने आपल्याला आनंद होतो, हे सांगणारे कलाम २५ जुलै २००२ मध्ये आपल्या या देशाचे चौदावे राष्ट्रपती बनले. म्हणून मला म्हणावेसे वाटते की–

''उत्तुंग पाखरांना परतीची तमा नसावी,
नजरेत सदा नवी दिशा असावी,
घरट्याचे काय आहे,
बांधता येईल केव्हाही,
क्षितिजापलीकडे झेप घेण्याची हृदयात एक जिद्द असावी.''

'भारतरत्न' या पुरस्काराने सन्मानित झालेले माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना आपल्या भारत देशाला २०२० झाली वैभवाच्या शिखरावर नेऊन ठेवण्याचे म्हणजे महासत्ता बनविण्याचं स्वप्न पाहिलं आणि त्यांनी तसं आव्हानही केलं. 'लीड इंडिया २०२०' हे त्याच केवळ स्वप्न नव्हे तर या भारत देशाला दिलेली हाकच आहे.

कलाम युवा विद्यार्थ्यांवर खूप प्रेम करायचे. विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमात ते आवर्जुन सहभागी व्हायचे. त्यांना प्रेरणा दयायचे. 'सुजाण जगण्याची प्रेरणा' ही कलामांकडूनच घ्यावी. असे प्रत्येक युवा विद्यार्थ्यांला वाटत अनेक विदयार्थ्यांशी आणि तरुणाशी कलमांनी जवळीक साधली. भारताच्या या भावी आधारस्तंभाला त्यांनी मोठी स्वप्ने पाहण्याची दृष्टी दिली. स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्यांनी युवा पिढीला प्रोत्साहित केले.

कलाम अविवाहित होते. त्यांच्या जीवनाचे सार म्हणजे काम ....काम.... आणि फक्त काम.... एळाद्या कार्यात कार्यमग्न राहणे आणि त्या कार्यातच स्वत:ला गुंतवून ठेवणे, अशी त्यांची वृत्ती होती.

कलाम यांचे प्राथमिक शिक्षण हायस्कूल रामनाथपूरम येथे झाले. तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमधून बी. एस. सी. पदवी प्राप्त केली. ते बालपणी वृत्तपत्र वितरणाचे काम करीत.

''बंदे है हम उसके,
हमपे किसका जोर,
उम्मीदों के सुरज निकले चारो ओर,
इरादे है फौलादी हिम्मती हर कदम,
अपने हाथों किस्मत लिखने
आज चले है हम !'

डॉ. अब्दुल कलाम हे नेहमी हसतमुख असत. त्यांच्या अथक परिश्रमामुळे त्यांनी पाश्चात्य राष्ट्रांना भारतात अग्निबाण तंत्रज्ञानाचे हस्तातरण करण्यास नकार देऊन आजपर्यंत १००० पदके भारतताने पटकवली आहेत.

अलौकिक कर्तृत्वाला शतकाची कुंपणे अडवीत नाहीत. आणि काळाच्या ओघात ती वाहून जात नाहीत. विस्मृतीचा शाप त्याला लागत नाही. असे महामानव म्हणजे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे

होय. म्हणूनच मी म्हणते–

''पायाखाली असून काटे
असतो हासत जात कुणी,
फुलासारखी उचलून घेती,
अंधाराची रात कुणी.''

कलामांना अस विमान बनवायचं होत, जे एक संदेशवाहक म्हणून किमान ३६ हजार किमी प्रवास करुन तो उपग्रह एळाद्या विशिष्ट ठिकाणी स्थिर राहील. अशा त्यांच्या धाडशी कर्तृत्वाबद्दल एवढेच म्हणेन की–

''इरादे नेक होते है,
तो सपने भी साकार होते है,
अगर अच्छी लगन हो,
तो रास्ते भी आसान होते है।''

'निसर्गाबाबत सांगताना कलाम म्हणतात निसर्गाने रौद्ररुप धारण केल्यानंतर तो आपल्यातील प्रचंड शक्तीचे आत्मप्रदर्शन घडवितो, जसा वडिलांच्या कुरणातील गीतांचा जसा माझ्यावर प्रभाव पडला, तसं गीता आणि उपनिषदांनी मला प्रभावित केलं.''


कलाम म्हणतात की, ''आजचे विद्यार्थी हे राष्ट्रांची भविष्यता घडविणारी खरी संपत्ती आहे.'' म्हणूनच मी म्हणते–

''शब्द झाले मुके
अक्षरही भांबावली,
शब्दावाचून ही कृतज्ञेची,
ओंजळ मी अपूरी वाहिली.

शेवटी मी एवढेच म्हणेन की–

''बोले तैसा चाले,
त्याची वंदावी पाऊले।''

■■■





अवकाश कन्या कल्पना चावला

(कर्नालपुत्री चावलांची सुकन्या कल्पना चावला)

– कु. मोनाली चंद्रकांत भोसले
११ वी आर्ट (ब)

तेजाची दिव्यशलाका तळपते ती ।
गगनी गरुडझेप घेई ।।
उत्तुंग स्वप्नांना सत्यस्वरुप देई ।

१९६१ साली सोव्हिएत रशियाने अवकाशात पहिले यान सोडले व युरी गागरीन हा जगातील पहिला अंतराळवीर ठरला. याच वर्षात ९ जुलै १९६१ रोजी भारतात कल्पना चावलाचा जन्म झाला हा एक अपूर्व योगायोगच होता.

बालपणापासून कल्पना जिद्दी व स्वप्नाळू होती. ते स्वप्न सत्यात आणण्यासाठी ती सतत प्रयत्नशील होती. कॉलेजमध्ये तिला एशॅनॉटिक्स या विषयात प्रवेश हवा होता. पंरतु तिच्या पारंपारिक शीख कुंटुंबातून तिच्या शिक्षणाला विरोध झाला. पंरतु तिचा निर्धार पक्का होता. तिने याच विषयात पुढे पंजाब विदयापीठाचे सुवर्णपदक मिळवले. इंजिनियरींगच्या शेवटच्या वर्षात शिक्षणासाठी जायचा तिचा मानस होता. एक स्वप्नवेडी व भारताची सुपुत्री अमेरिकेकडे सोपवली गेली. कल्पनाच्या पुढील अवकाश भराऱ्या होत्या.

उत्तम रितीने एम. एस. पदवी मिळवून तिने अवकाशात जाणाऱ्या वस्तुसाठी लागणारे तंत्रज्ञान हा विषय निवडला. १९८८ मध्ये डॉक्टरेट पूर्ण झाल्यावर अवकाशात जायच्या प्रयत्नांची आखणी सुरु केली. नासाच्या संशोधन विभागात नोकरीसाठी तिने अर्ज केला. नासाकडे प्रखर बुध्दिमत्ता असलेल्या संशोधकांचा ताफा आहे.

मानवाचे अवकाशात जाण्याची, त्याचा शोध घेण्याची स्वप्ने पाहिली या स्वप्नांना सत्यात आणण्यासाठी कष्ट करणाऱ्या बुध्दिमान लोकांचा ठेवा नासाकडे आहे. या अनमोल ठेव्यापैकी कल्पना एक होती. नासामध्ये चाचण्या घेऊन निवड केली गेली व तिला १९९७ साली प्रथमच अवकाशात जाण्याची संधी मिळाली. हा क्षण तिच्या दृष्टीनेच नव्हे तर भारतीयांच्या दृष्टीने अत्युच्च आनंदाचा होता.

हीच संधी तिला पून्हा मिळाली. १६ जानेवारी २००३ साली कोलंबिया हे अवकाशयान कल्पनाच्या स्वप्नांसह आकाशात झेपावले. त्यात त्यांना प्राण्यावर संशोधण व प्रयोग करायचे होते.

१ फेब्रु.२००३ रोजी कोलंबियाची परतीची यात्रा सुरु झाली. पण .....पण नियतीच्या मनात काही वेगळच होते. सकाळी ९ वा.१ मि. नी कोलंबियाने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला. हवेशी घर्षण होऊन सुमारे जमिनीपासून ६० कि. मी. अंतरावर कोलंबिया यानाने पेट घेतला व अचानक कल्पना चावला ताऱ्यांना भेटायला निघून गेली.

इंदिरा गांधीची इर्षा, आर. डी. टाटाची जिद्द, किरण बेदीचा कर्मवाद यांच्या साहाय्याने एक–एक प्रकाश किरण वेचून तिनेच स्वत:चा ध्रुवतारा बनवला. स्वप्नातून सत्याकडे जाण्याची वाट अस्तिवात आहे ती शोधायची दृष्टी व धैर्य तुमच्या अंगी असावे लागते.

हे तेजाचे स्फुल्लिंग घेऊन जेव्हा भारताची नवीन पिढी आपल्या जीवनाची वाटचाल करेल हीच डॉ. कल्पनांना खरी श्रध्दांजली ठरेल. म्हणूनच म्हणावेसे वाटते–

नाही चिरा नाही पणती ।
दिव्यत्वाची जेथे प्रचीती ।।
तेथे कर माझे जुळती ।

■■■



मैत्री एक अतुट नातं

– कु. कल्याणी अरुण गुरव
११ वी वाणिज्य

प्रत्येक पतंग जाणतो
शेवटी कचऱ्यात जायच आहे
पण त्या आधी आपल्याला
आभाळ स्पर्शून यायचं आहे
आयुष्याचही आपल्याकडून हेच
मागण आहे.

खर तर आज माझा एक वेगळा प्रवास सुरु होणार. एक जुन्या वर्षाचा सूर्यास्त आणि एका नव्या वर्षाचा सूर्योदय खर पाहता सार जग आज पार्टी आणि सरत्या वर्षाला निरोप देण्याच्या तयारीत होतं. आणि मी मात्र माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय कथेला सुरवात करणार होते. जसे प्रत्येक पतंगाला वाटत तसं आपणास वाटत की आयुष्यातही आपलं हेच मागण आहे.

फुलाप्रमाणे फुलणारी आणि कोमजल्यावरही सुगंध देणारी अशी होती मैत्री पण या मैत्रीमध्ये एक दिवस असा आला की संकटाच्यावेळी धावून येणारी मैत्रीण यांच्यामध्ये अचानक ताटातूट झाली.

सुगंधीत फुललेल्या फुलांनी कुठल्यातरी दूर कोपऱ्यात असणाऱ्या मैत्रीणींना एकत्र आणले होते. पण या सुगंधीत फुलांचा गंध मात्र फार काळ टिकला नाही.

पहाटेच्या गुलाबी थंडित गोड उबीतून माही अजून उठायची होती आळस आजून गेला नव्हता आणि मनाची तयारी नसतानाही माही कॉलेजला निघाली आणि आज स्वरा देखील तिच्या बरोबरच होती.

त्या दोघी कॉलेजला निघाल्या आज कॉलेजचा पहिला दिवस होता. आणि आज नवनवीन मैत्रीण वर्गात असणार आणि मी नवीन मैत्रिणीच्या आसवासात निघाले आणि अचानक एका मुलीची माझी धडक झाली. मी तिला काही तरी बोलाणार तेवढयात ती मला सॉरी म्हणाली आणि मग तिने तीची ओळख करुन घेतली.

मी तन्वी आपल नाव काय? मी माही आणि ही माझी मैत्रिण स्वरा. आम्ही बी–कॉमला आहे. मी देखील बी–कॉमलाच आहे. तेव्हापासून माही व तन्वी याच्यामध्ये एक अतूट मैत्री निर्माण झाली. तेव्हापासून त्या एकमेकीच्या एवढया चांगल्या मैत्रिणी झाल्या की त्या कधी एकमेकीची साथ सोडत नव्हत्या. अभ्यासातही तेवढयाच हुशार होत्या.

फुलाप्रमाणे फुलाणारी
पाखराप्रमाणे बागडणारी
सुगंधाप्रमाणे दरवळणारी
अशी असावी मैत्रिण

अशी होती आमची मैत्री आम्ही एकमेकींच्या दु:खात सामील व्हायचो. सकंटाच्या वेळी प्रत्येकास मदत करायची अशी सुगंधप्रमाणे दरवळणारी आणि पाखरासारखे बागडणारी आमची मैत्री इतकी घट्ट झाली होती. आज तन्वी कॉलेजलाच आली नाही असे पाच ते सात दिवस तन्वी कॉलेजलाच आली नाही. पण आज अचानक असे कसे झाले असे कधीच झाले नव्हते. या फुलल्याल्या सुगंधीत फुलांनी मला कधी दगा दिला नव्हता.

पण मग आज अचानक ही सुगंधाप्रमाणे दरवळणारी फुले कोमजल्यासारखी झाली. अशी ती

का झाली असावी असे वेगवेगळे प्रश्न मनाला भेडसावत राहिले.

माही आणि स्वरा कॉलेजकडे जाऊ लागल्या. आजदेखील त्यांची मैत्रिण तन्वी आली नव्हती. म्हणून माही आणि स्वराला अगदी भकास वाटत होते. उद्या येईल अशा तऱ्हेने माही आणि स्वराने तन्वीची वाट पाहिली. पण तन्वी आलीच नाही म्हणून माही आणि स्वरा तन्वीच्या घरी गेल्या.

तन्वीच्या आईने दरवाजा उघडला व त्या आत गेल्या आणि तन्वी तिच्या बेडवर झोपली होती. नेहमीसारख्या सुगंधीत फुलाप्रमाणे फुलाणाऱ्या तन्वीचा चेहरा आज मात्र कोमजल्या फुलासारखा झाला होता कारण –

मैत्री नेहमी आरसा आणि सावली सारखी असावी. कारण आरसा कधी खोट बोलत नाही व सावली कधी साथ सोडत नाही.

आम्ही तन्वीला खूप उठवण्याचा प्रयत्न केला मात्र उठण्याच्या अवस्थेत ती नव्हती. तन्वी काही उठेना मग माही आणि स्वराने तन्वीच्या आईला तन्वी का उठत नाही असे विचारले तेव्हा तन्वीची आई जोरजोराने रडून अश्रु वाहू लागली. आणि आम्हांला एकदम मिठ्ठी मारली आणि तिच्या तोडांतून शब्द बाहेर आले.

आपल्या फुललेल्या सुगंधीत फुलाचा दरवळणारा गंध कधीच ओसरुन चाललाय ग तेव्हा माही आणि स्वराला धक्काच बसला.

नाही तन्वीला काय झालय काकू तेव्हा त्या म्हणाल्या तन्वीला खूप ताप आला आहे. आणि डॉक्टरांनी सांगितलय ही शेवटची स्टेप आहे. वाचण्याचे काही चान्सेस नाहीत.

माही आणि स्वराच्या डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रुंना आता कोणीच थांबवू शकत नव्हत. सार सुखद स्वप्नांचा भावी मनोरा एका क्षणात अस्वस्थ होताना त्यांच्या डोळ्यासमोर ती अनुभवत होती काही केल्या त्याच्या मनातल्या भावना ओठांवर आणत त्या तन्वीला म्हणाल्या उठ तन्वी आपली मैत्री केव्हाची तुझी वाट बघत आहे. त्यांना तू अस कोमजल्या फुलासारखं किती दिवस उदास ठेवणार आहे?

तन्वीची अशी धडपड बघण्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. स्वत:ला सावरुन स्वरा आणि माही मुक्ताकडे एकटक पाहून लागल्या. कारण त्या दरवळणाऱ्या सुगंधाचे भाग्य नव्हते की तो सुगंध कधीच निघून गेला. माही आणि स्वरा अनिमीष नेत्रांनी तन्वीकडे एकटक पाहत होत्या. मात्र आमच्याकडून दरवणारा सुगंध कधी दुरावला गेला होता.

आणि तन्वीचा हात माही आणि स्वराच्या हातातून केव्हाच निसटून विसावला होता. तिचा देह कधीचाच अगदी कायमचा शांत निद्रेत लीन झाला होता. अशी

फुलप्रमाणे फुलणारी
हृदयात दडलेली
आयुष्याच्या अंतापर्यंत
हसता बोलता घडलेली

अशी मैत्रीण आम्हाला कधी सोडून गेली ते कळलच नाही नेहमीप्रमाणे कॉलेजला जाताना नकळत हसता बोलता घडलेली मैत्री आज अचानक आमच्यातून सुगंधाप्रमाणे दरवळली आणि ईश्वराचा भास बनून राहिली. म्हणूनच

श्वासातला श्वास असते मैत्री
ओठातला घास असते मैत्री
काळजाला काळजाची आस असते मैत्री
जेव्हा एकटे असतो तेव्हा ईश्वराचा
भास असते मैत्री

■■■



''सौ'' होताना

- कु. भाग्यश्री सुर्यवंशी
१२ वी वाणिज्य

'ङ्कआजकाल सौ बोलले की पुढे येते ती एका स्त्रीची मुर्ती. त्या मुर्तीमध्ये तिने भागांमध्ये कुंकु, कपाळावरती टिकली, गळ्यामध्ये सौभाग्याचे लेनं म्हणजेच मंगळसूत्र. हे मंगळसूत्र म्हणजे तिला नवरा आहे. तिचे लग्न झालेल आहे हा पुरावा.''

सौ म्हटल्यावर आजकालच्या मुलींना अंगावर काटाच येतो का ? तर ऐका,

मुलगी शिकते पदवीधर बनते, नोकरी करते. आई-वडिलांच स्वप्न पूर्ण करते. आयुष्यात फक्त ती एकच स्वप्न बघते ती म्हणजे आई-वडिलांना आपल्या पहिल्या पगारातून काहीतरी द्यायचं. आईला मस्त तिच्या आवडीच्या रंगाची साडी, बाबांना सफारी बहिणीला भावाला ड्रेस अस तिच स्वप्न असते आणि ती ते पूर्ण ही करते.

त्या मुलीने कधीही शाळेत असताना अगदी पद्वीधर होई पर्यंत कोणाबरोबर भांडन नाही, कोणाच मन दु:खवत नाही, काही मुलाबरोबर बोलताना कधी ही मैत्रीची तयारी सोडत नाही. ती फक्त सगळ्या बरोबर मैत्री करते.सगळ्यांच्या बरोबर मनमिळावूपणे वागणे. शिक्षकांशी नेहमी आपुलकीने बोलणे. कॉलेजच्या प्रत्येक स्पर्धेत भाग घेऊन नंबर मिळवणे. कॉलेजमधील प्रत्येक गोष्ट मनापासून आनंदाने मनसोक्तपणे एन्जॉय करणे. अगदी ते करंडक का असेना अस ती आपल कॉलेजच आयुष्य जगते आणि नोकरीला लागते.

पण जेव्हा विषय तिझ्या लग्नाचा येतो, तेव्हा ती का घाबरते? असा प्रश्न आई-वडिलांना सारखा पडत असतो. तरी ते तिच्याशी नेहमी लग्नाबद्दल बोलत असतात. पण ती का नाही म्हणते? असं विचारल्यानंतर ती काय म्हणते तर, लग्नानंतर माझं आयुष्य पूर्ण बदलून जाणार आणि ते मला नको आहे. बाबा मी माझ्या सासू-सासऱ्याला, नवऱ्याला सांभाळेण त्यांच सगळ ऐकेण, पण बाबा जेव्हा मला तुम्हाला भेटायच असेल, बोलावस वाटेल तेव्हा मला त्यांची परवानगी घ्यावी लागणार आणि जर मला मित्र-मैत्रिणींना सोबत खास करुन मित्राशी बोलायचं असेल तर परवाणगी घ्यावे लागेल. परवानगी दिली तर त्यांच्याशी जास्त वेळ बोलल्यावर माझ्यावर शंका घेणार ते? आणि मला हे नको आहे. मला नाही आवडणार ते बाबा. तरी आई-वडिल समजूत घालतात. तिला लग्नाला तयार करतात. ती पण तयार होते.

मग स्थळ येण्यास चालू होते. पाहुणे बघायला येतात. पण त्यात आधी आई-वडिल बघून जाणार त्यांना पसंत असेल तर मग मुलगा बघायला येणार. मग पुढे लग्नाची बोलणी मग हुंडा आला. मुलाकडचे म्हणतील तेवढे मुलीकडच्यांना द्यावा लागणार. मुलीकडचे पण तयार होतात. याद्या होतात पण त्याही तोंडी (कच्च्या).

मुलगा रोज मुलगींला फोन करणार. मॅसेज करणार हे सगळ चालू पण त्यांचा साखरपुडा ही झालेला नसतो लग्न तर लांबच साधी साखरपुड्याची तारीख पण ठरलेली नसते तरी तो मुलगा रोज फोन मॅसेजेस आदी चालू असते. पण मुलगी सांगत असते साखरपुडा तरी होऊ दे. मग फोन, मॅसेजेस, भेटणे वैगेरे बघू. पण मुलगा म्हणतो ते तर होणारचं आहे. तुम्हाला विश्वास नाही का? म्हणत मुलीला तयार करतो ती ही तयार होते. तो मुलगा तिला तिच्या शाळेबद्दल, कॉलेजबद्दल,मित्र-मैत्रिणींबद्दल विचारतो ती पण सांगते. पण तिने विचारल्यावर मुलगा विषय बदलतो. टाळाटाळ करतो.

अशाचं गप्पा रंगल्यावर तो तिला असे प्रश्न विचारतो की, त्या मुलीने त्याचा कधी विचारच नव्हता केला. तो प्रश्न म्हणजे त्या मुलाने विचारलेला तु आता पर्यंत किती बी. एफ. केले आहेस? किती आणि कोणा कोणाबरोबर. १४ फेब्रु. मनवला आहेस ? असे प्रश्न तो विचारतो. मुलीच्या पायाखालची जमीनच सरकते. का तर ज्या मुलीने प्रत्येक मुलाबरोबर फक्त मैत्रीच ठेवली. ती पायरी कधीच सोडली नाही. मर्यादित राहिली. अशा मुलीला असे प्रश्न विचारल्यावर काय होईल हो? विचार करा.

का एक मुलगी वागायला चांगली नसली तर सगळ्या मुली तशाच असतात का वागायला. त्या एकीमुळे ज्या चांगल्या आहेत त्यांना ही तसेच समजायच का? सुंदर असण हा गुन्हा आहे ? तुम्ही जर या ठिकाणी त्या मुलीच्या ठिकाणी असता तर काय केले असते विचार करा कारण हे तुमच्याही आयुष्यात होऊ शकत.

मुलगी आई-वडिलांना सगळ सांगते ते म्हणतात, अग ती फक्त मस्करी करीत असेल का एवढा विचार करतेस असं म्हणतात. आणि विषय सोडून देतात. मुलगी पण विचार करायचा सोडून देते. २ ते ३ दिवस संपर्कातच राहत नाही. मोबाईल बंद करुन ठेऊन देते. आणि कामाकडे लक्ष देते.

पण तो मुलगा तिला भेटयासाठी तिच्या ऑफिस मध्ये जातो. सरळ तिच्याशी भांडायला सुरु करतो. मुलीने त्या क्षणीच ते लग्न मोडले, का तर हा मुलगा आता लग्नाआधीच माझ्यावर शंका घेतो. लग्न झाल्यानंतर काय करेल. जर मला ऑफिसमधून घरी येण्यास वेळ झाला तर हा माझ्यावर शंका घ्यायला ही मागेपुढे बघणार नाही. मित्रांशी बोलले तरी हा शंका घेईल.

अशा मुलाशी लग्न का म्हणून करायचे ? क ा, तर फक्त त्याची प्रॉप्रर्टी? का तो जास्त कमवतो म्हणून? पुन्हा असले स्थळ मिळणार नाही म्हणून? मान्य आहे मुलीने लग्नानंतर मुलाशी बोलायचं नाही. पण त्यांच्याशी मैत्री पण तोडायची ? हे योग्य आहे.

तुम्ही काय कराल अशा वेळी. अशी वेळ तुमच्यावर न येता तुमच्या बहिणीवर किंवा मैत्रिणीवर आली तर तुम्ही तिला काय सल्ला द्याल. तिने हे सगळं सहन कराव फक्त एका कारणामुळे. ती स्त्री आहे म्हणून? हे योग्य आहे? विचार करा हे तुमच्या आमच्या आयुष्यात होऊ शकते.

■■■



आई-वडिलांविषयी काहीतरी.....

- कु. उज्वला अंकुश पाटील
११ वी सायन्स (अ)

अगदी सहज एखादयाने आपल्याला एखादया विषयावर तुझं मत सांग असं म्हटल्यावर आपण विविधरंगी दुनियेत जातो. मग त्यामध्ये आपले मित्र-मैत्रिण, नातेवाईक, आदर्श व्यक्ती, आवडती एखादी व्यक्ती यांबद्दल माहिती सांगतो. अरे पण सगळ्याचं मुळ, ज्यांनी आपल्याला ही सर्व दुनिया ,जग दाखवलं, आपले सर्वांशी संबंध जोडले त्या आई-बाबाचं काय? त्यांना तर कुणीच लक्षात नाही ठेवलं एखादयाने मला सहज प्रश्न विचारला की तुला आई सर्वप्रिय आहे की बाबा? तर त्या व्यक्तिला समजुतीत घेऊन पहिल्यांदा मी आपल्यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या आई-वडिलांचं महात्मय समजावून सांगेन व नंतर या प्रश्नाचं उत्तर देईन.

आपण सर्वात जास्त आईलाचा का महत्त्व देतो. आईएवढेच बाबाही महत्त्वाचे आहेत. याची किमंत त्यालाच कळेल ज्याला बाबा नाहीत. आणि पालकांची खरी किमंत त्यालाच कळेल ज्या बिचाऱ्याला आई-वडिल दोघंही नाहीत. हायस्कूलमध्ये असताना आमचे गुरुवर्य सतत सांगायचे की आई-वडिलांचा लहानापासूनच आदर करायला शिका. जीवनातील आई-वडिलाचं महत्त्व इतकं आहे की ते कधी ही शब्दांत व्यक्त करता येत नाही. मी वैयक्तिकतरी आई-वडिलांशिवाय माझ्या आयुष्याची कल्पना कधीही करु शकणार नाही. लहानपणापासून अगदी तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्याला त्यांनी जपलेलं असतं. हळूहळू आपण मोठे होतो. जिल्हा परिषदेच्या शाळेतून आपल्याला जीवनाचा थोडासा अंश कळू लागतो.

हायस्कूलची ९ वी १० वी आणि कॉलेजची ११ वी, १२ वी अतिशय आपल्या विचाराचा पाया असते. त्या विचारांना आपण उत्तेजन देऊन एखादया वेळी लेख, कथा लिहू लागलो की तो पुढे कथाकार, कांदबरीकार बनू शकतो. तर आपण जेव्हा कॉलेजमध्ये जातो, तेव्हा सक्षम विचारक्षमता आपल्यामध्ये विकसित झालेली असते.

आयुष्यात येऊन काहीतरी मोठं यश मिळवलं पाहिजे की, जेणेकरुन आपल्या जन्मदात्यांना त्याचा अभिमान वाटला पाहिजे. नाहीतर प्रत्येकजण आयुष्यात येतोय, किडामुगी सारख जगतोय आणि मरुन जातोय. याला काहीच अर्थ नाही, स्वत: काट्याच्या रस्त्यावरुन चालून आपल्या वाटेत फुले पसरवण्याचा आपल्या आई-वडिलांचा थोडा तरी विचार करा. माझ्या मुला-मुलींना कोणत्याही कष्टातून तरंगावं लागू नये, की जे कष्ट त्यांनी घेतलं. त्यासाठी ते जीवचं रान करुन आपल्यासाठी सर्व काही पुरवितात. नसेल तर उधार आणतात पण आपल्याला देतात. त्याचाचं आपण थोडा तरी विचार करावा. आपलं हायस्कूल माझ्या मते सर्वात महत्त्वाचं असावं कारण आमचे शिक्षक सतत काहीना काही विचारधन आम्हांला देत असत. ते सांगायचे आयुष्यात आपल्याला अगदी मोठं यश मिळवता आल नसेल आपल्या आई-वडिलांची मान उंचावली नाही तरी चालेल पण असं काही कृत्य करु

नका की समाजात त्यांना खालमानेनं जगावं लागेल.

''तुम्हाला नाकारणाऱ्यांपेक्षा एवढं उंच पोहचा की त्यांना तुमच्याकडे बघण्यासाठी मान उंच करावी लागेल. तेथून तुम्ही त्याच्यापर्यंत सहज पोहचू शकाल पण त्यांना त्यांच्या हयाभर तुमची उंची गाठता येणार नाही.''

माझ्या आई-वडिलांएवढं मला कोणीच प्रिय वाटत नाही, कारण कधीतरी एकांतात बसा की जेथे तुम्ही व तुमचे विचार या दोनच गोष्टी असतील त्यावेळी या दात्यांचा विचार करा. आपण ज्या वयात सध्या आहोत आणि त्यांच्या त्या वयातील हालालकींचा विचार करा आपल्या आताच्या व त्यांच्या त्या वेळच्या आयुष्यात किती फरक आहे. तो फक्त त्यांनीच शक्य केला आहे. आणि एक लक्षात ठेवा नेहमी एकांतात स्वत:चा शोध जास्त लागतो.

कधीतरी आपल्या एखादया अनाथ मैत्रणीच्या किंवा मित्राच्या जागी स्वत:ला ठेवून बघा या जन्मदात्यांचं महत्त्व आपल्याला कळेल. खरचं खूप महान आहेत या दोन व्यक्ती. सर्वांनी सगळयात टोकांचं स्थान या दोघांनाच दिल पाहिजे. जे आजही आपल्या आई-वडिलांची अवहेलना करतात. त्यावेळी त्यांच्या मनातील आपल्याबद्दलच्या भावना जाणा.अजूनही वेळ आहे आई-वडिलांच महत्त्व जाणा, त्यांना आदर दया. त्यांच्या मनात असणाऱ्या आपल्याविषयच्या भावना ते कधी आपल्यापुढे मांडत नाहीत कारण आपल्यावर ते प्रेम करत असतांत. असं काही करु नका की, ज्यामुळे त्यांना वाईट वाटेल किंवा काळजी वाटेल. आपल्या सर्वांच्या आयुष्यात असा एकतरी दिवस नक्कीच येईल की ज्या दिवशी या दोघांसाठी आपल्याला किती बोलू कळणार नाही. भावना ओसांडून वाहतील. ते सध्या जाणा व कुंटुंबातील वातावरण सुखी-समाधानी ठेवा. त्यांना खूप समाधान वाटेल.

आज तुम्ही जिथे आहात त्या परिस्थितीचा विचार करु नका कार्य करत रहा यश नक्की मिळेल कारण परिस्थिती की बदलतच असते. जीवनात असे अनेक प्रसंग येतील ते तुम्हाला काहीना काहीतरी देऊन जातील त्यातून काहीतरी शिका अपयशानंतर यश हे ठरलेलेच आहे. आयुष्यात पुढे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला आदर दया.

माझे वडिल नेहमी म्हणतात समोर आलेल्या व्यक्तिला किंवा कोणालाच कधीही स्वत:पेक्षा कमी लेखू नकोस. प्रत्येकाचं भविष्य प्रत्येकाच्या हातात असतं वडिलांच्या अशा या अनेक लहान-लहान वाक्यातून आईने दिलेल्या अनेक संस्कारातून आजपर्यंत शिकत आले. त्यांनी केलेल्या या कष्टाचे फलित त्यांना देण्यासाठी मी शिकत आहे. त्याच्या

समाधानातूनच मला अत्यानंद मिळतो आणि असाचं प्रत्येकालाही मिळायला पाहिजे.

थामकर हात चलना सिखाया हमें
प्यार की थपकियों से बढाया हमें
आसान नही चुकाना
उनका हम पे जो कर्ज है,
माता-पिता के चरणो में स्वर्ग है।

शेवटी अगदीच मनापासून एवढंच म्हणेन की,

''थोर ते आई-वडिल
त्यांनीच दिला जीवनाला आधार
जन्म अपुरा आहे
फेडण्यास त्यांचे उपकार''

■■■



बाबा मला वचन द्या

– कु. सोनाली दादासो करडे
१२ वी सायन्स (ब)

संध्याकाळी वेळ होती बळीराम शेतातून घरी येत असतात. घराच्या दारात त्याची मुलगी व मुलगा घरात लाईट नसल्यामुळे चिमणी दिवा समोर ठेवून अभ्यास करत होते. ते पाहून बळीरामला बरं वाटलं बळीराम म्हणाला ''पोरांनो खूप अभ्यास करा.'' असे म्हणून मुलांच्या आईला आवाज दिला. अगं लक्ष्मी मला जेवायचं नाय असे म्हणत डेऱ्यातील पाणी पिण्यासाठी आत गेला घरात स्मशानाची शांतता. लक्ष्मी पण पाणी पीत होती ते पाहून बळीराम म्हणाला, लक्ष्मी तू कोरभर भाकरी खा लक्ष्मी म्हणाली घरात धान्याचा एक दाना पण नाय हाय. कशीबशी एक भाकरी केली हाय आणि ती पोरांना ठेवली हाय. ती खाऊन पोरांना काय देऊ म्हणून कालची कोरभर भाकरी खाली हाय. धनी तुम्हीपण कालचीच कोरभर भाकरी ठेवून आज खाल्ली हाय, माहीत हाय मला. बळीराम काही बोलला नाही नि शब्द राहिला आणि म्हणाला, लक्ष्मी काय करावं.

पाऊस पाणी नाय....! शेताचं तर स्मशान झालयं आणि शेतात तर काहीच नाय मग काय करावं ते मला समजत नाय बघ. आन उदया राखी पुनव हाय. पोरीला एक राखी आणून देण्याची ऐपत नाही माझ्याजवळ.

देव शेतकऱ्यावर का कोपला हाय आणि किती शेतकऱ्याचा बळी घेणार हाय.त्याचं त्यालाच माहित. शेतात गेलं की पोटात कलबलतयं काय कराव ते पण समजत नाय. म्हणून बळीराम पोटभर पाणी पिऊन बाहेर आला आणि म्हणाला पोरांनो बिगी बिगी चला कोरभर भाकरी खावा. दोन्ही पोरं घरात आली. त्यानापण घरची परिस्थिती माहित होती म्हणून पोरं नुसती भाकरी खात होती. बळीराम घरात आला त्याची मुलगी विद्या त्याच्याजवळ येऊ न बसली. विदया म्हणाली, बाबा थोडं जेवा की, बळीराम म्हणाला की, आताच तुझी आय आणि मी जेवलो हाय. विदयाला घरची सर्व परिस्थितीची पूर्ण जाणीव होती. त्यामुळे त्या चिमकुलीने स्वत: घास न घेता तो तिच्या बापाला भरवला. आणि बापाच्या डोळ्यातून पाणी आलं. स्वत:ला सावरत बाबा शांत झाले. विद्या म्हणाली, 'बाबा उदया राखी 'पुनव हाय' रात्रभर बळीराम जागाच होता. उद्या पोरगी काय मागतीया या विचारात तो कासावीस होत होता. सकाळ झाली. बळीराम अंघोळ करुन गावात गेला. एक दोघाकडे उसने पैसे मागितले. परंतु त्यांनी नकार दिल्यामुळे बळीराम हताश झाला. त्याला काय करावं हे समजत नव्हतं. राख्या घेण्यासाठी सुद्धा पैसा नसल्यामुळे राख्या कशा घेऊन दयायच्या या प्रश्नाने बळीराम व्याकुळ झाला होता आणि निराश होऊन घरी आला असता विद्या घरी वडिलांची वाट पाहत होती. बळीराम घरी आल्यावर विदया म्हणाली, बाबा किती वेळ कुठे गेला होता?

चला राखी बांधायची हाय माझ्याकडे राखी हाय. बळीराम आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला

तू राखी कोठून आणली हाय? त्यावर विद्या म्हणाली, बाबा तुम्ही मागच्या वर्षी कडदोरा आणला तोच मी जपून ठेवला होता. त्याच्या गोड्यांच्या मी दोन राख्या केल्या हाय. एक भैयाला बांधली एक तुमच्यासाठी ठेवली हाय. हात पाय धुवा पटकन मी तुम्हाला राखी बांधते. असे विद्या म्हणता बळीराम पटकन हात पाय धुवून राखी बांधायला बसला. परंतु त्याच्या मनात विचार आला की, रात्रीचं तर पोटशी म्हणाली हाय काय तरी मागणार हाय. मात्र आपल्याजवळ तर दमडी पण नाय. काय कराव ? आणि पोटशीला नाय म्हटलं तर पोटशी जिवाला खाईल....! हा विचार बळीरामाला सतावत होता आणि मुलीने त्याले ओवाळले राखी बांधली आणि ती म्हणाली बाबा मी मागणार ते देणार ना?

बळीराम हिम्मत करत म्हणला, माग काय मागायचं ते माग. नक्की देणार ना बाबा हे ऐकताच बळीरामच्या हृदयाचे ठोकेच वाढले आणि म्हणाला बोल पोरी....

विद्या म्हणाली, ''मला वचन द्या बाबा'' कशी ही परिस्थिती आली तर तुम्ही तया परिस्थितीशी हिम्मतीने सामना करायचा. तुमच्याशिवाय या जगात आमचे आहे तरी कोण? दुष्काळाला खचून न जाता सामना करायचा. आत्महत्या करायची नाय. आणि आम्हाला आयुष्यभर साथ दयायची ही ओवाळणी मला दया हे ऐकून बळीरामच्या आणि लक्ष्मीच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले. बळीराम म्हणाला होय पोरी मी हिम्मतीने दुष्काळाशी सामना करीन पण आत्महत्या करणार नाय. असं वचन बळीरामानं विद्याला दिलं. त्यावेळी विदयाला जगातील सर्वांत अनमोल ओवाळणी मिळाल्याचा आनंद झाला. तिच्या चेहऱ्यावरुन तो आनंद ओसांडून वाहत होता.

आई
आकाशाचा केला कागद
तर हिमालयाची लेखणी
अन् समुद्राची शाई
या पृथ्वीतलावर बसून
लिहिण्यासारखा एकच
शब्द, तो म्हणजे
माझी आई !





वेध : महाराष्ट्र पर्यटनाचा

– कु. निशाद रफीक मुलाणी
११ वी आर्टस् (ब)

मित्रांनो बदल हा मानवी जीवनातील अत्यंत अविभाज्य असा घटक आहे. बदल हा सर्वांना हवाच असतो. सारखे तेच तेच काम केल्याने त्या कामातील मजा संपते, कधी कधी कंटाळा येतो अशावेळी बदल हा आवश्यक असतो.'CHANGE IN WORK IS REST 'हे आपल्याला माहीतच आहे. कामात बदल ही विश्रांती होय. आजच्या या आधुनिक युगात औद्योगीकीकरण तसेच शहरीकरण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. यामुळे शहरी जीवन हे धकाधकीच्या जीवनापासून दूर मोकळ्या वातावरणात घालवावे अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. यातूनच पर्यटनाचा जन्म झाला. रोजच्या जीवनापासून अलिप्त राहून काही क्षण निवांत घालवणे म्हणजे पर्यटन होय. थोडक्यात रोजच्या जीवनापासून थोडा ब्रेक घेऊन काही वेळ एकांतात कुंटुंबाबरोबर घालवणे म्हणजे पर्यटन होय.आज पर्यटनाला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आणि या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे.

महाराष्ट्र! भारतातील तिसरे सर्वांत मोठे राज्य. भारतीय उपखंडातील सर्वांत प्राचीन भूभागांपैकी एक असा हा भूभाग भारताच्या दृष्टीने महाराष्ट्राला ऐतिहासिक, सामाजिक, भौगोलिक,सांस्कृतिक या सर्वच दृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. बेसॉल्ट खडकापासून बनलेल्या मध्यवर्ती पठारापासून ते पूर्वेला विदर्भ ते पश्चिमेला कोकण किनारपट्टीपर्यंत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर विविधता आढळते. पर्यटनाच्या दृष्टिने महाराष्ट्राला लाभलेले वरदान म्हणजे 'सह्याद्री पर्वत' होय. मध्यवर्ती पठार व कोकणाला जोडणाऱ्या भागात हा पर्वत पसरलेला आहे.या पर्वतात आढळणारे निसर्ग सौंदर्य भारतातील हिमालयाचा भाग सोडला तर इतरत्र क्वचितच आढळते. घाटमाथ्यापासून थेट कोकणात घुसणारे बेलाग कडे, कड्यांवरुन कोसळणारे धबधबे, नद्या हे सर्व डोळ्यांचे पारणे फिटवणारे आहेत. याच भागातून महाराष्ट्रातील महत्त्वाचे घाटमार्ग गेले आहेत. यामुळे या भागातील वाहतूक सुलभ झाली आहे. यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर थंड हवेची ठिकाणे तसेच इतर पर्यटनयोग्य ठिकाणे विकसित झाली आहेत.

हे झाले भौगोलिकदृष्ट्या ! ऐतिहासिकदृष्ट्या ही महाराष्ट्राला खूप महत्त्व आहे. या राज्ज्याने अनेक राजवटींचा उदयास्त पाहिला आहे. या राज्याने अनेक शिलाहारापर्यंत एवढेच नव्हे तर इंग्रजांची राजवटही महाराष्ट्राच्या परिचयाची आहे. शिवछत्रपतींचा सुवर्णकाळ ही या राज्याने अनुभवला आहे. या राजवटींनी ही महाराष्ट्राच्रा विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा पुरेपूर उपयोग करुन घेतला. घाटमाथ्यावरील उंच व अत्यंत अवघड अशी ठिकाणे हेरुन त्या ठिकाणी अजिंक्य असे किल्ले बांधले. शिलाहारांनी वासोटा, घाकोवा इ. किल्ले तर शिवछत्रपतींची तसेच मराठ्यांची शान असलेले रायगड, राजगड हे किल्ले अशी अनेक ठिकाणे देता

येतील. अशा प्रकारे या रज्याला अभेद्य किल्ल्यांसारख्या ठिकाणांचेही वरदान लाभले आहे

. या बरोबरच महाराष्ट्रात सातवाहन राजवटीच्या काळात अनेक लेणी बांधली गेली. अजिंठा व वेरुळची लेणी तर जगप्रसिद्ध आहेत. दुर्गम ठिकाणी बांधलेली असंख्य लेणी महाराष्ट्रात आढळतात. महाराष्ट्राला मोठी अशी संतांची परंपरा लाभलेली आहे.संत नामदेव,संत तुकाराम,संत एकनाथ या संतांनी आपापल्या कालखंडात महाराष्ट्राचे प्रबोधन केले,समाजाचे प्रबोधन केले. या काळात अनेक मंदिरे बांधण्यात आली आहेत.त्यामुळे याबाबतीतही महाराष्ट्र मागे नाही.

बाप रे! महाराष्ट्राबद्दल एवढे सांगताना पान भरले तर भारताबद्दल मी सांगितले असते तर काय झाले असते. या विचाराने तुम्ही थरकला असाल.असो.

वरील वर्णानावरून तुम्हाला समजलेच असेल की,महाराष्ट्रात बघण्याजोगी अनेक ठिकाणे आहेत.त्यामुळे येथे दरवर्षी पर्यटकांची गर्दी असते. पण मला एक सांगा. तुमचेच उदाहरण घ्या. तुम्हीही आनंद घेण्यासाठी पर्यटनाला जात असाल. पण सहलीला कोठेजायचे हे ठरवताना तुम्हाला महाबळेश्वर, माथेरान, कासपठार,रायगड,राजगड,प्रतापगड,शहरी पर्यटन म्हटले तर मुबंई,पुणे,औरंगाबाद याशिवाय इतर नावे सुचतात का? आपल्यापैकी अनेक जण वरील ठिकाणी गेले असतील पण आता या ठिकाणी पर्यटनातील आनंद हवा असणारा एकांत उरलाय का हो? पण तसं नाहीये. महाराष्ट्रात केवळ हीच पर्यटनस्थळे आहेत असे नाही. यापेक्षाही वेगळी नाजूक व सुंदर निसर्ग सौदंर्य असलेली अनेक ठिकाणे महाराष्ट्रात आहेत. सौदंर्य व निसर्गरम्यतेच्या बाबतीत माथेरान, महाबळेश्वरापेक्षा किंचित सरसच अशी असलेली जव्हार, मोखाडा, इगतपुरी, अंबोली ही सह्याद्रीतील व तोरणमाळ, चिखलदरा ही सातपुड्यातील अनेक थंड हवेची ठिकाणे अजून उपेक्षितच आहेत.

पर्यटकांना या बाबतीत जास्त माहितीच नाही असे दिसून येते. याठिकाणी पर्यटकांची मने जिंकणारे अनेक सुंदर पॉईंटस आहेत त्यामुळे ही ठिकाणेही प्रसिद्ध पाहणे आवश्यक आहे. अजिंठा-वेरूळच्या लेण्याइतकेच सुंदर व नाजूक कोरीवकाम असलेली कार्ले-भाज्यासारखी असंख्य लेणी महाराष्ट्रात आहेत, मात्र ठराविक सोडली तर इतर उपेक्षितच आहेत. मुंबईमधील चौपाट्या व पाय ठेवायला जागा नसणाऱ्या समुद्रकिनाऱ्यांपेक्षाही सुंदर व निसर्गरम्य किनारे रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात आहेत, पण ठराविक पर्यटक सोडता तेथे कोणी फिरकतही नाही.

सह्याद्रीचे रौद्र रूप जर आपल्याला अनुभवायचे असेल तर नाशिक जवळचा डोगरमाथा हा आदर्श आहे.येथील सर्व पर्वतांची उंची सरासरी ३००० फूटापेक्षा जास्त आहे. येथेच महाराष्ट्रातील दुर्लक्षित एवरेस्ट कळसूबाई हे शिखर आहे. ट्रेकर्स सोडता या भागाची पर्यटकाना अजिबात माहिती नाही. याच भागात हरिश्चंद्रगड, साल्हेर, मुल्हेर यासारखे अत्यंत अवघड असे किल्ले आहेत. उभे तासलेले कातलकडे पाहून डोळे फिरतात. याच भागात भंडारदरा, माणिकडोह यासारखे मोठे जलाशयही आहेत. पण हेही उपेक्षितच आहेत. या भागाला पर्यटनदृष्टया महत्व प्राप्त करुन देणे आवश्यक आहे.

पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विदर्भही काही कमी नाही. या भागाला अनेक तलावाचे वरदान लाभले आहे. याच भागात प्राणीसंपत्ती मोठ्या प्रमाणावर असल्याने येथे शासनाने अभयारण्ये विकसित केली

आहेत. नागझिरा, नवेगाव–बांध, ताडोबा या अभयारण्यांकडे पर्यटकांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. याचबरोबरच महाराष्ट्रात अशी अनेक दुर्लक्षित निसर्गरम्य व सौंदर्यपूर्ण ठिकाणे आहेत. जी कोणालाही माहीत नाहीत.


रायगड किल्ला

या ठिकाणांचा विकास होणे आवश्यक आहे. जर या ठिकाणांचा पर्यटनाच्या दृष्टीने योग्य विकास झाला तर पर्यटन व्यवसायाचा विकास होईल.या निमित्ताने तेथील लोकांना पर्यटनाला अनुरुप व पूरक असे व्यवसाय सुरू करता येतील, स्थानिक हस्तकला तसेच इतर व्यवसायाचा विकास होईल व स्थानिक लोकांना रोजगार उपल्बध होईल आणि परिणामी राज्याचा व देशाचा विकास होईल. याबरोबरच मीही खात्रीने सांगते की या ठिकाणी जर तुम्ही छोटीशी सहल आयोजित केलीत तर तुम्हाला खऱ्या पर्यटन व एकातांचा अनुभव येईल आणि एक चांगली व निवांत याबरोबरच निसर्गरम्य सहल अनुभवण्याचा आनंद घेता येईल. बस्स! झाल, आता तुम्हाला एकच काम करायचं आहे ते म्हणजे सारखी तीच तीच पर्यटनस्थळे पाहण्यापेक्षा जरा हटके ट्रीप काढणे आवश्यक आहे...

■■■











जलसाक्षरता काळाची गरज

– कु. मेघा राजू जाधव
११ वी आर्टस् (ब)

प्राचीन काळापासून निसर्ग आणि मानव यांचं अतुट नातं आहे. ते आजतागायत टिकून आहे. परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे आपण निसर्गाकडे पाठ फिरवू लागलो आहोत. अत्याधुनिक स्वार्थी प्रवृत्तीमुळे निसर्गाच्या भौतिक अस्तिवाची हानी मानवाकडून होऊ लागली आहे. मानवी जीवनात पंचमहाभूताचे पृथ्वी,आग, तेज, वायू, अग्नि यांचे खूप महत्व आहे.मनुष्याच्या जीवनातील अतिशय गतिमान आणि मौल्यवान तत्व पाणी आहे. जल हे सृष्टीचे आदितत्व आहे. आपल्या ऋषिमुनींना आपो ज्योति रसो ऽ मृतम असे म्हणून ज्योती, रस, आणि अमृताची उपमा पाण्याला दिली आहे. ऋग्वेदामध्ये विश्वातील पहिली कविता अपसूक्त जलतत्वावर लिहिलेली आहे.

पाण्याच्या प्रदुषणामुळे होणारे भविष्यकालीन संकट आताच आपल्या पुढे येऊ लागले आहे. वर्तमानपत्रामध्ये पाण्यामुळे उद्भवणाऱ्या अनेक घडामोडी आपण वाचू लागलो आहोत. पहिल्यांदा पाण्याचे प्रदुषण पुन्हा त्याच्या शुद्धीसाठी केलेले राजकारण आणि महत्वाचे नवीन संकट म्हणजे पाण्याचा तुटवडा त्यामुळे आताची दुष्काळसदृष्य स्थिती निर्माण झाली आहे. पावसाळी ऋतूमध्ये उन्हाळ्याची तीव्रता जाणवत आहे. हीच स्थिती कायम राहिली तर ! ...? बापरे! कल्पनाही करवत नाही. पृथ्वीवर पाणी नाही, तर समजा जीवनही नाही. पाणी ही सर्व जीवनाची जननी आहे.

यासंदर्भात बिरबलाची एक गोष्ट आहे. अकबराचा एक नातेवाईक नेहमी तक्रार करत असतो की त्याला नोकरी मिळत नाही. तेव्हा अकबर म्हणाले की तुला बेरीज वजाबाकी करता येते की नाही? तो नातेवाईक हो म्हणतो. अकबर प्रश्न विचारतात सांग तर मग सत्तावीस नक्षत्रांमधून पावसाची दहा नक्षत्र वजा केली तर बाकी काय राहील? नातेवाईक म्हणतो सतरा अकबर बिरबलाकडे दृष्टी वळतात. बिरबल म्हणतो,महाराज पावसाची नक्षत्रे काढून टाकली तर पृथ्वीचे स्मशान होईल! काय खाल आणि काय प्याल? जीवनच अशक्य होईल.

गोष्टीचा आशय खरोखर गांभीर्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. येरे येरे पावसा तुला देतो पैसा असे आपण म्हणतो. पण पैसे टाकून पाऊस विकत घेणे शक्य नाही. पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगासह अन्य वापरासाठी पाण्याची गरज आहे. ३% गरज ही पृथ्वीच्या पृष्ठभागावरील पाण्यातून तर २% गरज ही भूगर्भातील पाण्यातून भागवली जाते. म्हणूनच प्रत्येकाने पाण्याची बचत करून जल संधारणेचा वसा घेतला पाहिजे. हा वसा जपण्यासाठी पृथ्वीवरचे हे अमृत जपण्यासाठी जमेल तस त्या स्वरूपात पाणी वाचवले पाहिजे. नाहीतर भयानक दृष्परीनामांना सामोरे जावे लागेल. पाण्यासाठी दाही दिशा फिरुनही पाणी मिळाले नाही तर.....? पैसा आहे पण पाणी नाही अशी स्थिती झाली तर ....? मिडास राजाच्या गोष्टीप्रमाणे गत होईल म्हणूनच रहीमांनी म्हटल्याप्रमाणे बिन पाणी सब सून ही स्थिती टाळण्यासाठी जलतत्वाशी प्रामाणिक राहुया.

आजच्या युगात जसे संगणक साक्षर होणे गरजेचे आहे. तितकेच जलसाक्षर होणे गरजेचे आहे.

कारण –जल है तो कल है !

■■■



राजे, तुम्ही पुन्हा जन्माला या.....

– कु. काजल खरात
११ वी आर्टस् (ब)

चार मित्र आहेत शिवजयंती साजरा करण्याची तयारी चालू आहे.

महेश :–यावेळी शिवजयंती जोरात झाली पाहिजे बर का.

दिग्या :–भावा, आपण हाय म्हटल्यावर जोरातच होणार.

कुलद्या:–आरं, पण दंगलीमुळं कर्फ्यू लागलाय त्याच काय.

महेश:–हा मग... ?

दिग्या:–काय व्हायचं ते होऊ देत, शिवजयंती जोरातच करायची महाराजांसाठी काय पण....!

कुलद्या:–आरं करूया आपण शिवजयंती पण मिरवणूक नको, उगच दंगा होईल.

महेश:–काय होत नाय त्याला , मिरवणूक झालीच पाहिजे.

दिग्या:–सगळ्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. मिरवणूक व्हावी म्हणून.

कुलद्या:–आणि काय राडा झाला तर.... ?

दिग्या:–होऊ देत काय व्हायचं ते! अंगात मराठ्यांच रक्त्त आहे.. कुणाचा बा जरी आला तरी घाबरत नाय.

कुलद्या:–आज काय टाकून आलाय काय.... ?

मिरवणुकीत असं काय करू नको म्हणजे झालं

दिग्या:–ए मह्या, समजव जरा ह्याला,पेट्रोल असल्याशिवाय गाडी पळत नाय म्हणाव.

अभ्या:–तुम्ही म्हणताय म्हणून मी आता शिवजयंती करायला येतोय. पण तिथीनुसार शिवजयंती झालीच पाहिजे. नाय तर मग बघा.

दिग्या:–अरं करू रे, १९फेब्रुवारीला करू. तिथीनुसार करू आणि परंपरेनुसार पण करू. ३–३ वेळा शिवजयंती साजरी करू, लय प्रेम हाय आपलं महाराजांवर.

अभ्या:– बरं लावा पताका, मी डॉल्बीच बघतो.

कुलद्या:–असलं कसलं झेडें लावल्यात, अजून कसं आलं नाहीत.

तोया:–आलोच, आलोच उगाच दंगा लावू नको.

मह्या:–तोया लावलं का झेडें, सगळीकड ?

तोया:–लावलं की भावा.

दिग्या:–अनं मशिदीवर ?

तोया:–नाय लावला

दिग्या:–का रं.... ?

तोया:–दिग्या,आधीच दंगल झाल्या त्यात मशिदीवर भगवा झेडां लावला तर आणखी दंगल पेटल. नको लावायला.

मह्या:–तू मुसलमान हाय म्हणून लावला नाय ना झेंडा.....?

तोया:–मी मुसलमान असण्याचा इथं काय संबंध, उगच दंगल पेटू नये म्हणून नाय लावला.

कुलद्या:–आम्हाला कळत नाय , व्हय....? तू शेवटी मुसलमानांचीच बाजू घेणार.

तोया:–हे बघ, मुसलमान असलो तरी महाराजांवर प्रेम करतो, रक्तात प्रामाणिकपणा आहे माझ्या. म्हणून शिवजयंतीचं काम करतोय उगाच जाती वरून जावू नका.

मह्या:–हा गेलो.काय करणार?

दिग्या:–तू मशिदीवर भगवा झेडां लाव, मग आम्ही मानतो तू खरंच महाराजांचा भक्त आहेस.

तोया:–शिवाजी महाराज माझ्या रक्तात आहेत आणि मी सच्च्या शिवभक्त आहे. दंगल होईल असं मी काही करणार नाही आणि तुम्हाला पण करु देणार नाही. मशिदीवर भगवा झेडां नाय म्हणजे नाय.

मह्या:–तुझ्या तर.....

(तोयाच्या अंगावर सगळे जातात तेवढ्यात शिवाजी महाराज प्रकट होतात.)

महाराज:–अरे वा...आमच्या जयंतीची तयारी जोरात चालू आहे.

कुलद्या:–आयच्या गावात महाराज.

दिग्या:– राजं.....राजं तुम्ही पुन्हा जन्माला या.....

महाराज:–कशाला..? कशाला येऊ मी पुन्हा जन्माला

दिग्या:–कशाला म्हणजे .....

महाराज:–आमच्याच जयंतीच्या कार्यक्रमात आमच्याच प्रतिमेसमोर कर्णकर्कश गाण्यांच्या तालावर मद्यधुंद अवस्थेत आमचेच मावळे कसे नाचतात हे पाहण्यासाठी का आमच्या स्वराज्यात आमच्याच माता भगिनींची अब्रू आम्ही कशी वेशीला टांगतो हे पाहण्यासाठी आम्ही पुन्हा जन्म घेऊ काय..?

अभ्या:–महाराज, आम्ही तुमचे भक्त आहोत. म्हणून तुम्ही पुन्हा जन्माला यावे असं वाटतं.

महाराज:–जे लोक आमच्या विचारांना लाथाडतात. ते आमचे भक्त कदापी असू शकत नाहीत.परस्त्री मातेसमान असते असे विचार आम्ही जपले आणि आज पाहतो तर का?स्वत:ला आमचे भक्त म्हणवणाऱ्यांना महिलांची छेडछाड करताना शरम कशी वाटत नाही. जातीय भेदभावाला आम्ही कधी थारा दिला नाही. आणि आज..आमचेच मावळे जातीय मतभेद घेऊन आपआपसात दंगली करण्यात गुंतले आहेत. हत्तीशी झुंज देणारा येसाजी कंक कुठे अन व्यसनाधीनतेमुळे गुरफटलेली आजची तरूणाई कुठे,स्वराजाची झालेली ही दयनीय अवस्था पाहण्यासाठी पुन्हा जन्म घेऊ काय.?

दिग्या:–महाराज तसे नाही पण आम्ही काहीच करू शकत नाही म्हणून तुम्ही पुन्हा जन्माला यावे.

महाराज:–आम्हास जेवढे आयुष्य लाभले होते. त्या आयुष्यात आम्ही स्वराज्य निर्माण केले. त्या स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करण्याचे काम तुमचे आहे. तुमच्यात पण एक शिवाजी आहे. त्याला जागे करा. तुम्ही स्वत: शिवाजी व्हा.

कुलद्या–पण महाराज तुमचा काळ वेगळा होता. आजची परिस्थिती वेगळी आहे.

महाराज:– बदल हा निसर्गाचा नियम आहे.काळानुसार बदलायला शिका. त्याकाळी तलवार आणि ढाल आमचे शस्त्र होते. आजच्या परिस्थितीत ज्ञान हे शस्त्र आहे. ज्ञान मिळवा,ज्ञानाच्या सहाय्याने सर्व समस्यावर मात करा. स्वराज्याला हानी पोचवणारे लोक आमचे शत्रू होते आम्ही कधीच हिंदू–मुस्लिम भेदभाव केला नाही असा भेदभाव करणे टाळा. जातीय दंगलीना थारा देऊ नका.सामाजिक एकात्मता,सामाजिकसौख्य,सलोखा जपा.आज स्वराज्यासमोर अनेक शत्रू आहेत. महिलांची असुरक्षितता, निरक्षरता भ्रष्टाचार, प्रदुषण, महागाई, सामाजिक असुरक्षितता असे अनेक शत्रू आज तुमच्यासमोर उभे आहेत.त्या शत्रूंवर मात करा. त्यांच्याशी लढा द्या. स्त्रियांचा आदर करा. स्त्रीभ्रूण हत्त्या टाळा.जर जिजाऊ जन्माला आली तरच शिवराय जन्माला येतील. आज अनेक पक्ष, संघटना, आमचे नाव वापरून समाजविघातक कृत्ये करतात. त्यांना थांबवा.आजकाल आम्ही अनेक ठिकाणी आमचे पुतळे पहातो. परंतु त्यांचा आदर होण्याऐवजी विटंबनाच मोठ्या प्रमाणावर होते. आमचे पुतळे उभारण्याऐवजी आमचे विचार वैभव जपा, आमच्या विचाराचे पुतळे तुमच्या मनात उभे करा आणि त्यानुसार तुमचे आचरण ठेवा. तुमचे आचरण जर शिवरायांसारखे असेल तर मग पुतळे उभे करण्याची काय गरज? जागे व्हा. वैचारीक, सामाजिक, आर्थिक,भौतिक,राजकीय सर्व क्षेत्रात प्रगती करा आणि गर्वाने सांगा दिल्लीचे ही तरूत राखतो महाराष्ट्र माझा. तुमच्या कार्यक्षेत्रातील शिवाजी आहात तुम्ही. राजे तुम्ही जन्माला या असं म्हणणं आता बसं करा. आमची जयंती साजरी केली नाही तरी चालेल, पण आमच्या जयंतीनिमित्त तुमचे विटंबन चालू असते ते थांबवा. आमचे विचारवैभव जपाल तेव्हा आम्हास चांगले वाटेल. आमची इच्छा आहे की हे स्वराज्य सुराज्यामध्ये रूपांतरीत व्हावे, त्यासाठी तुम्हास शुभेच्छा....

(महाराज निघून जातात)

मह्या:–महाराजांनी बरोबर सांगितले.

अभ्या:–आतापासून महाराजांच्या विचारांचे अनुकरण करायचे.

(दिग्या तोयाच्या हातात भगवा झेंडा देतो)

तोया:–आज आपण शपथ घेऊया की, महाराजांचे विचारवैभव जपले जाईल आणि महाराजांना वाईट वाटेल असं कोणतेही काम आपल्या हातून होणार नाही.

कुलद्या:–होय, स्वराज्याला सुराज्य बनवायचे. महाराजांची इच्छा पूर्ण करायची.

शिवाजी महाराज की ,जय.....!

■■■



चारोळ्या

आपल्याला आपली समजणारी
माणसे भरपूर अस तात
पण आपल्याला आपली बनून साथ देणारी
माणसे क्वचितच भेटतात.

नात्यांना भावनांच्या जाळ्यात
गोवता येते
पण प्रेमाच्या गाठोड्यात मोजता
येत नाही.

आयुष्यात अशी अनेक माणसे
भेटतात
जी आपली नसूनही आपली वाटतात.

–भाग्यश्री गजानन भोसले
१२ वी सायन्स.

ज्याने आयुष्यात
दु:ख अनुभवलय
तोच नेहमी
इतरांना हसवू शकतो
कारण हसण्याची
किंमत त्याच्याएवढी
कोणालाच ठाउक नसते.

तुटलेली फुले सुगंध देऊन जातात.
गेलेले क्षण आठवण देऊन जातात.
प्रत्येकाचे आनंद वेगळे वेगळे आहेत
म्हणून काही माणसे क्षणभर तर
काही आयुषयभर लक्षात राहतात.

चांदण्या मोजायच्या नसतात
चांदणं टिपायचं असतं
आयुष्य फक्त जगायचं नसतं
जगण्यातही सौदंर्य बघायचं असतं...!

आयुष्यात नेहमी रक्तापेक्षा
अश्रु श्रेष्ठ असतात
कारण शरिराला जखम झाली की
लगेच रक्त बाहेर येते
परंतु अश्रु बाहेर येण्यासाठी
आदी मनाला जखम व्हावी
लागते.....

–प्रिया शिवाजी पाटील
१२ वी आर्टस(ब)



बाप

बाप म्हणजे कोण म्हणेल फादर
पण बाप म्हणजे थोडीशी कठोर मदर

बाप म्हणजे चोचीत भरवलेला प्रत्येक दाणा
बाप म्हणजे घराचा कणा

बाप म्हणजे आईचा भक्कम आधार
त्याच्या विना सारेच निराधार

तो असतो तेव्हा कळत नाही
गेला की पुन्हा मिळत नाही

–कु. दिव्या रमेश भोसले
११ वी (अ)

परिस्थिती बदलली की इच्छा बदलतात
इच्छा बदलल्या की स्वप्ने बदलतात
स्वप्ने बदलली की अपेक्षा बदलतात
आणि अपेक्षा बदलल्या की नाती
बदलायला खूप वेळ लागत नाही

–कु. श्वेता पोपट पाटील
१२ वी सायन्स् (अ)

सुखी जीवनाचे गणित

सौंदर्य आणि सुस्वभाव यांची बेरीज करा
मैत्रीतून राग वजा करा

प्रेमाला शुद्ध अंत:करणाने गुणा
परनिंदेचा लघुत्तम काढा

दया, क्षमा, शांती यांचे समीकरण करा
हेच आपल्या सुखी जीवनाचे गणित आहे

–कु. ऋतुजा गणपत चिपटे
११ वी सायन्स् (अ)

कोणतीही अपेक्षा न करता
स्वप्न मी पाहिले
आणि वास्तवाला विसरुन
जगायला मी शिकले
पावलोपावली मनावर माझ्या
संस्कारांचे मोती पेरले
आणि न पाहिलेले स्वप्नही आज
प्रत्यक्षात मी अनुभवले
मनोमनी आभार मी त्यांचे मानले
आणि
न कळत उपकाराच्या ओझ्याखाली
दबून मी गेले
आज अचानक मन माझे
उदास झाले
आणि अलगद डोळ्यातून माझ्या
आठवणींचे अश्रू वाहू लागले

–कु. भाग्यश्री गजानन भोसले
१२ वी सायन्स् (अ)



विसरु नको तू मला
विसरणार नाही मी तुला
विसरतं का कधी कोण
आपल्या मित्रांना
मैत्रीन तर तूच आहेस माझी खास
कसं विसरु शकते मी तुला

मोठे होता होता सरलं सारं बालपण
मैत्री मात्र आपली अशीच राहील
कालपण आजपण आणि उद्यापण
तुमच्यासाठी कायपण

–कु. प्रियांका चंद्रशेखर शहापुरे
११ वी आर्टस् (ब)

जीवनात भेटली एक नवीन वाट
त्या वाटेवर भेटली मैत्रिणींची साथ
जशी सुंदर समुद्राची लाट
तशीच आपल्या मैत्रिणींची गाठ

– कु. प्रतिक्षा प्रकाश कांबळे
११ वी आर्टस् (अ)

मित्र

जुने मित्र सोन्यासारखे असतात
तर नवीन हिऱ्यासारखे असतात
पण सोन्याला विसरु नका
कारण हिऱ्याला अंगठीत ठेवण्यासाठी
सोन्याचीच गरज असते.....

– किशोर पाटील
१२ वी कॉमर्स्

आठवण

नाजूक पाकळ्या किती सुंदर असतात
रंगीत कळ्या रोजच उमलत असतात
नजरेत भरणारी सर्वच असतात
पण हृदयात राहणारी माणसं
फारच कमी असतात

–कु. शितल जितेंद्र जाधव
१२ वी कॉमर्स्

सागराचे पाणी कधी आटणार नाही
मनाची आठवण कधी मिटणार नाही
एक काय हजारो जन्म झाले तरी
तुझी आणि माझी मैत्री कधी तुटणार नाही

– कु. दिव्या सुभाष जमदाडे
११ वी सायन्स् (अ)

बस्याँ म्हारे णेणण माँ नंदलाल ।।
मोर मुगट मकराक्रत कुण्डल अरुण तिलक सोहाँ भाल ।
मोहन सुरत साँवराँ सूरत णेण बण्या विशाल ।
अधर सुधा रस मुरली राजाँ उर बैजंती ।
मीराँ प्रभु संताँ सुखदायाँ, भक्त बछल गोपाल ।।



संत मीराँबाई



प्रा. अनिता तात्यासो पाटील
हिंदी विभाग (ज्युनिअर)

अनुक्रमणिका

ज्युनिअर विभाग

पद्य –

१. प्यारी माँ	श्री. सहाद जहाँगीर लडकरवाले	१२ वी आर्टस् (ब)
२. राष्ट्रभाषा हिंदी	कु. अनिसा अलताब शेख	११ वी आर्टस् (ब)
३. पानी में जीवन	श्री. निलेश एकनाथ पाटील	११ वी आर्टस्
४. प्रेम	कु. सोनाली सपकाळ	१२ वी सायन्स
५. आ माँ अब लौट आ....।	कु. जयश्री बाळासो बेले	१२ वी वाणिज्य
६. हमारा कॉलेज	कु. जयश्री बाळासो बेले	१२ वी वाणिज्य
७. हिंदी जन की बोली	श्री. मनोज शशिकांत साळुंखे	१२ वी आर्टस्
८. जिन्दगी	कु. प्रियांका चंद्रशेखर शहापुरे	
९. कभी ना माँगो	कु. प्रियांका चंद्रशेखर शहापुरे	
१०. पी.डी.व्ही.पी. कॉलेज	श्री. मनोज शशिकांत साळुंखे	१२ वी आर्टस्
११. माँ-बाप	श्री. मनोज शशिकांत साळुंखे	१२ वी आर्टस्
१२. लेकिन	श्री. मनोज शशिकांत साळुंखे	१२ वी आर्टस्
१३. चाँद का कुरता	श्री. अमोल अशोक चव्हाण	११ वी आर्टस् (ब)
१४. एक दिन की जिंदगी	कु. मयुरी विठ्ठल काळे	११ वी आर्टस्
१५. जीवन की पहचान	कु. मयुरी विठ्ठल काळे	११ वी आर्टस्
१६. मंझिल	कु. काजल सर्जेराव खरात	११ वी आर्टस्
१७. जीवन की पहचान	कु. काजल सर्जेराव खरात	११ वी आर्टस्
१८. कॉलेज हमारा	सजाजबी शेख	१२ वी आर्टस्

गद्य –

१. दास्ताँ जिने की	कु. अनिसा अलताब शेख	११ वी आर्टस् (ब)
२. प्रेम	कु. छाया राजेश जाधव	११ वी आर्टस् (ब)
३. दोस्ती	कु. अनिसा अलताब शेख	११ वी आर्टस् (ब)
४. पेड का संदेश	श्री. निलेश पाटील	११ वी आर्टस् (ब)
५. महात्माओंके विचार	श्री. मनोज शशिकांत साळुंखे	१२ वी आर्टस्
६. सच बात	कु. सोनाली सपकाळ	१२ वी सायन्स
७. फिल्मी इंटरव्हयू	कु. काजल सर्जेराव खरात	११ वी आर्टस्
८. चुटकुले	कु. निकिता पाटील	११ वी आर्टस्
९. सच पूछो तो...	कु. अनिसा अलताब शेख	११ वी आर्टस् (ब)
१०. आज का दाता- Data (हास्यविनोद)	श्री. निलेश पाटील	११ वी आर्टस् (ब)
११. भारत के राष्ट्रपति एवं कार्यकाल	संग्रहक- काजल शंकर गिजरे	११ वी आर्टस्
१२. भारत के प्रधानमंत्री एवं कार्यकाल	संग्रहक- काजल शंकर गिजरे	११ वी आर्टस्

शायरी–

१. शायरी	श्री. मनोज शशिकांत साळुंखे	१२ वी आर्टस्
२. शायरी	कु. काजल शंकर गिजरे	११ वी आर्टस्
३. शायरी	कु. सोनल संभाजी पाटील	११ वी आर्टस्
४. शायरी	कु. सोनाली सपकाळ	१२ वी सायन्स



प्यारी माँ

प्यारी माँ मुझको तेरी दुआँ चाहिए।
तेरे आँचल की थंडी हवा चाहिए।
लोरी गा-गा कर मुझको सुलाती है तु,
मुस्कुराकर सँवेरे जगाती है तु,
मुझको इसके सिवा और क्या चाहिए?
प्यारी माँ मुझको तेरी दुआँ चाहिए।
तेरे ममता के साये में फुलूँ फलूँ,
थम कर तेरे ऊँगली बढता चलूँ,
आसरा बस तेरे प्यार का चाहिए।
प्यारी माँ मुझको तेरी दुआँ चाहिए।
तेरे खिदमत से दुनिया में इज्जत मेरी,
तेरे कदमों के निचे जन्नत मेरी,
उमर भर सर पे साया तेरा चाहिए।
प्यारी माँ मुझको तेरी दुआँ चाहिए।

- सहाद जहांगीर लढकरवाले
१२ वी आर्टस् 'ब'

राष्ट्रभाषा हिंदी

मनुष्य के विचार विनिमय के साधन अनेक
उन साधनों में,
भाषा एक महत्वपूर्ण साधन।
भाषा विचार विनिमय का साधन,
भाषा सार्थक ध्वनि प्रतिकों का समूह,
भाषा मनुष्य को जोडती हैं,
एक दुसरे की दूरियाँ मिटाती हैं।
भारत में है अनेक भाषा,
उन भाषाओं में, हिंदी हमारी प्यारी भाषा,
विविधता में एकता का सृजन यह करती।
देश की संस्कृति, आदर्शों को व्यक्त करती।
सरकारी कामकाज , प्रशासन,
न्यायव्यवस्था का साधन,
यह राजगौरव का हैं चिह्न।
संविधान के १७ वे धारा के,
३४३ धारा में इस राजभाषा को,
किया स्विकार तब से,
१४ सितंबर 'हिंदी दिवस' का हुआ,
सर्वत्र सत्कार।
हिदीं भारत की बनी संपर्क भाषा,
राजभाषा और राष्ट्रभाषा।

- कु. अनिसा अलताब शेख
११ वी आर्टस् 'ब'



पानी में जीवन

मानव का जीवन, पानी हैं,
क्योंकि उसमें कोई रंग नही हैं।
उसमें कौनसा भी रंग मिलाया जाए,
वह उस रंग जैसा हो जाता हैं।
हमारी दोस्ती भी पानी की तरह हे,
उसमें हर दोस्त को समालेदेनेवाली हे।
पानी मानव को जीवन देता हैं,
सृष्टि को शृंगार देता हैं।
पानी मानव को,
समता का संदेश देता हैं...।

– निलेश एकनाथ पाटील
११ वी आर्टस्

प्रेम

सुबह आँखे खुलनेपर जिसका चेहरा देखने की
इच्छा होती हैं,
वह है प्रेम।
मंदिर दर्शन करते समय, जिसका नजदीक
होने का एहसास होता हैं,
वह है प्रेम।
झगडने पर भी, जिसका गुस्सा नहीं आता,
वह प्रेम हैं।
जिसके कंधे पर सिर रखँकर दिन की थकान
मिटने का एहसास होता हैं,
वह है प्रेम।
खुद तकलिफ सहकर जिसके लिए
सुख माँगते हैं,
वह है प्रेम।
जो भूलने पर भी भूलता नहीं,
वह है प्रेम।
परिवार की फोटो में माँ–बाप के साथ जिसका
फोटो होने की इच्छा होती हैं,
वह है प्रेम।
यह सब लिखते समय जिसकी याद आती,
वह है प्रेम।

– कु. सोनाली सपकाळ
१२ वी सायन्स



आ माँ अब लौट आ.....।

कभी कभी हो जाती है गलती,
आखिर इन्सान ही हूँ में,
माँ क्यों रुठी है, ऐसी तू?
आ माँ, अब लौट आ।

कभी जब तु मुझे डाटेगी,
नही दुँगी कभी पलटके जवाब,
आ माँ, अब लौट आ।

मेरी इतनी सी गलती की,
ना दे इतनी बडी सजा,
कभी कोई माँ तडपाती है ऐसे?
आ माँ, अब लौट आ।

तु जो कहे मै सुनूँगी,
पर ऐसे मुझसे ना रुठना,
आ माँ, अब लौट आ।

करदे आखरी बार माफ,
अपने इस लाडले को,
अब मान भी जाओ माँ,
आ माँ अब लौट आ।

– कु. जयश्री बाळासो बेले
१२ वी वाणिज्य

'हमारा कॉलेज'

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थासे,
निकाली एक धारा,
उसमें पैदा हुआ,
पी. डी. व्ही. पी. कॉलेज हमारा।
सरस्वती की प्रार्थना,
दिप जलते है यहाँ,
कला, वाणिज्य, विज्ञान का,
संगम हैं यहाँ।
उसकी प्रेरणा से, उज्ज्वल भविष्य की,
ज्योती की नवकिरणें है यहाँ।
कोल्हापूर के विशाल शिक्षा सागर से,
निकली एक पवित्र धारा,
इतिहास को देखो, उज्वल है सारा।
आपस में सब भाई–भाई,
जाती–पाती यहाँ बैर न कोई।
सबने इतनी परंपरा देखी,
सबको इसने नयी राह दिखाई।
स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था से,
निकाला यह एक सुंदर तारा,
उसमें पैदा हुआ,
पी. डी. व्ही. पी. कॉलेज हमारा।

– कु. जयश्री बाळासो बेले
१२ वी वाणिज्य

'हिंदी जन की बोली'

हिंदी जन की बोली हैं।
एक डोर में, सबको जो हैं बाँधती,
वह हिंदी हैं।
हर भाषा को, सगी बहन जो मानती
वह हिंदी हैं।
भरी-पूरी हो सभी बोलियाँ,
यही कामना हिंदी की हैं।
गहरी है पहचान आपसी,
यही साधना हिंदी की हैं।
सौत विदेशी रहे न रानी,
यही भावना हिंदी की हैं।
उच्च वर्ग की प्रिय अंग्रेजी,
हिंदी जन की बोली हैं।
वर्ग-भेद को खत्म करेगी,
हिंदी सबकी संगम हैं।
शब्द, नाद लिपि से भी आगे,
एक भरोसा अनुपम हैं।
गंगा कावेरी की धारा का,
संगम कराती हिंदी हैं।
पूरब-पश्चिम, कमल-पंखुडी,
सेतु बनाती हिंदी हैं।

- मनोज शशीकांत साळुंखे
१२ वी आर्टस्



जिंदगी

दिल के टुटने पर भी हँसना,
शायद जिंदादिली इसीको कहते हैं।
ठोकर लगने पर भी,
मंझिल तक भटकना,
शायद, तलाश इसीको कहते हैं।
किसी को चाहकर भी,
न पाना,
चाहत इसीको कहते हैं।
टूटे खंडहर में,
बिना तेल का दिया जलाना,
उम्मीद इसीको कहते हैं।
गिर जाने पर भी,
फिर से खडा होना,
हिम्मत इसीको कहते हैं।
यह उम्मीद, हिम्मत, चाहत, तलाश...
शायद जिंदगी इसीको कहते हैं।

- कु. प्रियांका चंद्रशेखर शहापुरे

कभी न माँगो.....

यारों किसी कातिल से,
कभी प्यार ना माँगो।
अपने ही गले के लिए,
तलवार ना माँगो।
गिर जाओगे तुम,
अपने मसिहा की नजर में।
काँटो से कभी,
फूल की महक न माँगो।
सच बात पर मिलता है,
सदा जहर का प्याला।
जीना है तो फिर,
जीने का इजहार ना माँगो।
उस चीज का जिख्र ही क्या,
जो मुमकिन ही नहीं हैं।
वह कभी न माँगो...

– कु. प्रियांका चंद्रशेखर शहापुरे

माँ–बाप

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ या वर्षात जिमखाना विभागाने १५ ऑगस्ट व २६ जानेवारी, १ मे महाराष्ट्र दिन या सारख्या राष्ट्रीय दिनाचे उत्तम नियोजन केले. तसेच जिमखाना विभागाने या वर्षात झालेल्या नॅक मुल्यांकन समिती समोर उत्तम नियोजन केले. व कराटे, किक बॉक्सिंग, तायक्वॉदो, तलवारबाजी इ. प्रकाराचे प्रात्यक्षिक केले यावेळी १०० माजि विद्यार्थी खेळाडूनी नॅक कमिटीसमोर जिमखाना विभागाच्या कार्याची माहीती दिली तसेच जिमखाना

विभागाकडे असणाऱ्या व्यायाम शाळेत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, सेवक यांना व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देऊन त्यांच्यामध्ये आरोग्यविषयी जागृता निर्माण केली जाते.

२९ ऑगस्ट रोजी जिमखाना विभागामार्फत महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच या विभागाकडे उपलब्ध असणाऱ्या ४०० मी. धावण मार्गाचा वापर महाविद्यालयातील माजि विद्यार्थी, खेळाडू, पालक, माता परिसरातील नागरीक सैन्य भरती, पोलिस भरतीसाठी प्रशिक्षणार्थींना उपयोगी पडतो. हा महाविद्यालयाच्या विभागाचा चांगला उपक्रम होतो. तसेच या विभागामार्फत विभागीय, आंतरविभागीय राज्य व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. स्पर्धेच्या काळात पोषक आहार देवून त्यांची शारिरीक क्षमता वाढविण्यावर भर दिला जातो.

सन २०१६-१७ या वर्षामध्ये महाविद्यालयात संपन्न झालेल्या विविध कार्यक्रमांत जिमखाना विभागाने सहकार्य केले. तसेच या वर्षात श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार १२ जानेवारी ते १९ जानेवारी सप्ताहमधील वार्षिक क्रीडा स्पर्धामध्ये ॲथलेटिक्स क्रीडा प्रकाराची पुरुष विभागाची जनरल चॅम्पियनशीप कु. घाईल रोहित रंगराव, बी.ए. भाग-२ व महिला विभागाची जनरल चॅम्पियनशीप कु. अश्विनी विश्वजीत पाटील, बी.एस्सी. भाग-२ या खेळाडूंनी पटकाविली आहे.

सन २०१६-२०१७ या वर्षात बी.ए. भाग-१, बी.कॉम. भाग-१, बी.एस्सी. भाग-१ या वर्गातील विद्यार्थ्यांच्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्गत घेण्यात येत असलेली १० गुणांची सक्तीची शारिरीक शिक्षण विषयाची परीक्षासंबंधी माहिती देण्यात आली व परीक्षांचे नियोजन करण्यात आले.

या वर्षामध्ये महाविद्यालयातील ज्या खेळाडूंनी विभागीय, आंतरविभागीय, राज्य व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये यश संपादन केले आहे. त्यांचा आज दि. ०८/०२/२०१७ रोजी संपन्न होत असलेला वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये प्रमुख पाहुणे,

मा. जयसिंग सावंत यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार लाभले. हा पारितोषिक वितरण समारंभ व या वर्षातील जिमखाना विभागाकडील सर्व क्रीडा स्पर्धा, विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे सन्मानीय प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. तसेच जिमखाना कमिटीतील सर्व सदस्य व महाविद्यालयातील सर्व घटकांचे वेळोवेळी सहकार्य लाभले आहे. म्हणून जिमखाना विभागामार्फत या सर्व घटकांना धन्यवाद देऊन त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

।। '' जय हिंद, जय महाराष्ट्र''।।

-प्रा. ए. के. पाटील

चेअरमन

लैंगिक छळ प्रतिबंध व विद्यार्थिनी विकास समिती

या विभागामार्फत प्रथमवर्ष विद्यार्थीनीच्या मनात, जाणीवा जागृती सदैव राहाव्यात यासाठी उद्बोधन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विवेकानंद सप्ताहात मुलींच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे आयोजन केले होते. अग्रणी महाविद्यालय योजनेंअंतर्गत ४ फेब्रुवार २०१७ ला एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. जयश्री पाटील सांगली यांचे ''स्त्री शक्तीची उत्तुंग भरारी तरी स्त्री भृणहत्या

का..?'' या विषयावर मुलींना मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय Basic in beauty culture हा कोर्स चालू करण्याचा आमचा मानस आहे. या विभागाचे काम डॉ. जाधव पाहतात.

– डॉ. एस. डी. जाधव
चेअरमन

दूरशिक्षण अभ्यासक्रम

शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडलेल्या विद्यार्थी-विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्याची संधी मिळावी या हेतूने शिवाजी विद्यापीठाने या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून दूरशिक्षण अभ्यास केंद्रांत बी.ए./ बी.कॉम. या पदवी वर्गांना प्रवेश दिला जातो. याशिवाय एम.ए./ एम.कॉम. भाग-१,२ साठी मराठी हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, स.शास्त्र याविषयासाठी कला शाखेतील तर वाणिज्य विभागातील विद्यार्थी ॲडव्हान्स अकौंटन्सी, ॲडव्हान्स कॉस्टींग, ॲटव्हान्स बँकींग विषय घेऊ शकतात. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर संपर्क सत्राचे आयोजन केले जाते. विद्यापीठ पुस्तकाशिवाय महाविद्यालयातील ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करुन दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये या केंद्रात एकूण.... विद्यार्थी प्रवेशित आहेत. प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाने स्वत:चे वेगळे नाव निर्माण केले असून श्री. अशफाक शेख व जोतीराम साळुंखे हे अभ्यास केंद्रास सहाय्यक म्हणून मदत करतात. सध्या दूरशिक्षण विभागात १००४ घेतात.

– प्रा. के. एस. पाटील
समन्वयक, दूरशिक्षण अभ्यासकेंद्र

ग्रंथालय विभाग अहवाल –

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाने ग्रंथालय विभागासाठी असलेल्या सर्व बजेट हेड अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण ग्रंथाची खरेदी केली आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालय गुणात्मक व संख्यात्मक दृष्ट्या समृध्दीकडे वाटचाल करीत आहे. स्वतंत्र इमारत, निसर्गरम्य परिसर व तासगांव तहसीलमधील एकमेव माहिती स्तोत्राचे अद्ययावत दालन म्हणून उल्लेख करावा लागेल. विविध विषयावरील आधुनिक ग्रंथ, जुने दुर्मिळ व संशोधन मूल्य जोपासणारी येथील ग्रंथसंपदा आहे. आज ३१/०३/२०१७ पर्यंत एकूण ग्रंथसंख्या ७९,७६६ (सिनियर ५११३४, ज्युनियर ११०७५, बुक बँक २४३३ व सिध्दीविनायक पुस्तक पेढी १५०२४) इतकी आहे.

ग्रंथ खरेदी :

यंदाच्या आर्थिक वर्षात ग्रंथालयात खालीलप्रमाणे पुस्तके खरेदी करण्यात आली.

अ.क्र.	विभाग	पुस्तक संख्या	रक्कम
१	सिनिअर	६९३	१,४६,५६३/-
२	पी.जी.	१४३	६५,८४६/-
३	बी.सी.ए.	१२	७,३५५/-
४	ज्युनिअर	११५	२७,१५८/-
	एकूण	९६३	२,४६,९२२/-

स्पर्धेच्या युगामध्ये स्वत:ला टिकून ठेवण्यासाठी, अद्ययावत ज्ञान, स्पर्धेची जाणीव व वर्तमान घडामोडीवर लक्ष असणे आवश्यक आहे. त्याकरिता ६४ नियमकालिके, २१ वर्तमानपत्रे नियमितपणे ग्रंथालय खरेदी करत असते.

नियतकालिकामधील उपयुक्त अशा मासिकांचे बांधीव खंड तयार केलेले आहेत.

ग्रंथालयाचे प्रशंसनीय उपक्रम –

वाचन कट्टा उपक्रम – विद्यार्थ्यांच्यात वाचनाची आवड वाढावी यासाठी हा उपक्रम.

बहिस्थ वाचक योजना– महाविद्यालयीन बाह्य समाजाभिमुख लोकांसाठी ग्रंथालय खुले.

'बुक बँक' योजना– एस. सी., एस. टी., अपंग व आर्थिकदृष्ट्या कमकुवत व होतकरु विद्यार्थ्यांना ग्रंथ संच उपलब्धता.

'कमवा आणि शिका' योजना– आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना या योजनेत समाविष्ट.Information and Library Network (INFLIBNET) Centre : INFLIBNET चा N-LIST चे या प्रोजेक्ट अंतर्गत ई-जर्नल्स व ई-बुक्स यांचे वार्षिक सभासदत्व. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक यांना ही सुविधा उपलब्ध.

ग्रंथप्रदर्शन– विविध घटनांचे औचित्य साधून ग्रंथालय विभागामार्फत विद्यार्थ्यांना ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची माहिती व्हावी यासाठी ग्रंथप्रदर्शन भरविले जाते.

ग्रंथालय भेटीचे आयोजन– विविध विषयांच्या विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात येते.

या २०१६-१७ शैक्षणिक वर्षामध्ये Library Automation साठी Stage-2 साठी वायरलेस बारकोड रीडर मशीन घेण्यात आले. वाचन कक्षात नवीन आठ टेबल व स्टॅक रुम मध्ये लाकडी कपाटे बनविण्यात आले.

महाविद्यालयात ५००० पेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असल्याने अपंग, तृतीय वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए. आणि पी.जी. कोर्सच्या विद्यार्थ्यांना Open Access सुविधा देण्यात आलेली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. आर. आर. कुंभार यांचे मौलिक मार्गदर्शन सतत लाभत आहे. ग्रंथालय कमिटीच्या सर्व सदस्यांचे आणि प्राध्यापक वृदांचे सहकार्य ग्रंथालयास मिळत आहे. दैनंदिन कामकाजामध्ये ग्रंथालयीन कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले आहे.

– हेमाडे एन. एन. –ग्रंथपाल
ग्रंथालय विभाग प्रमुख

राष्ट्रीय सेवा योजना अहवाल शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७

नियमित अहवाल–

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. चालू शैक्षणिक वर्षात २५० स्वयंसेवकांना अनुदानीत राष्ट्रीय सेवा योजना युनिट १, २, व ३ मध्ये प्रवेश देण्यात आला. तसेच ५० स्वयंसेवकांना राष्ट्रप्रेम, श्रमसंस्कार, सामाजिक उत्तरदायित्त्व अशा विविध मुल्यांचे संस्कार राबविण्यात आलेल्या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून करण्यात आले. या सर्व उपक्रमांचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे–

आंतरराष्ट्रीय योगदिन :

दि. २१ जून २०१६ रोजी झाले. महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर दिवशी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत योगाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. या समारंभात सुमारे १०० विद्यार्थांनी सहभाग घेतला. NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. टी. के. बदामे, प्रा. पी. आर. जाधव, प्रा. ए. बी. कांबळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यावेळी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योगदिन२ कोटी वृक्षलागवड उपक्रम : दि. १ जुलै, २०१६ रोजी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- २०१६/ प. क्र. ७६-२०१६/ आस्था-२ मंत्रालय मुंबई दि. २७ एप्रिल, २०१६ नुसार १ जुलै, २०१६ रोजी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एकाच दिवशी २ कोटी वृक्षलागवड करण्याच्या या राज्यव्यापी उपक्रमाअंतर्गत पहिल्या टप्प्यात ८२ व दुसऱ्या दिवशी ६८ अशी १५० झाडे लावण्यात आली. महाविद्यालय परिसरात झालेल्या या वृक्षलागवड उपक्रमाचे उद्घाटन मा. आनंद देशपांडे, मुख्य प्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा तासगाव हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थी असे एकूण ३५० लोक सहभागी झाले होते. या समारंभाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व प्रा. डॉ.टी.के.बदामे, कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. जाधव व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.आर.एम. गणेशवाडे यांनी केले.

नॅक टिम चे स्वागत -

दि. १,२ व ३ ऑगस्ट ,२०१६ रोजी महाविद्यालयाचे नॅक, बंगलोर यांच्याकडून मुल्यांकन झाले. दि. २ ऑगस्ट, २०१६ रोजी नॅक कमिटीचे स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी NSS क्लॅपस वाजवून केले. यावेळी NSS प्रेरणागीत सादर करण्यात आले. नॅक कमिटी NSS कार्यालयात आल्यानंतर NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.टी.के.बदामे, कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. जाधव तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एम.गणेशवाडे यांनी NAAC कमिटीने विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारकपणे उत्तरे दिली. यावेळी कु. डर्षली जाधव (बी.ए.भाग-२०), सचिन माळी (बी.ए.भाग-) तसेच शिवंभू माळी (बी.एस्सी.भाग-३) या स्वयंसेवकांनी NAAC कमिटीबरोबर चर्चेत सहभाग घेतला.

अवयवदान अभियान -

दि. ३१ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयात अवयवदान संकल्प अभियान राबविण्यात आले. यावेळी 'अवयवदान जाणिव जागृती' या विषयावर शासकीय वैद्यकीय अधिकारी डॉ. ए.एन.बोर्डे यांचे व्याख्यान संपन्न झाले. या समारंभास सुमारे २०० विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमांचे आयोजन NSS कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आर.एम.गणेशावाडे यांनी यशस्वीपणे केले.

NSS उद्घाटन व उद्बोधन :

दि. ९ सप्टेंबर २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना २०१६-२०१७ चे उद्घाटन तुर्ची, ता. तासगांव येथील पोलिस प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य मा. संभाजीराव पाटील (डी.वाय.एस.पी.) यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांचे 'राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक व त्यांची स्वयंशिस्त' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी प्रास्ताविक NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.टी.के.बदामे यांनी केले तर आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. पी.आर.जाधव यांनी मानले सदर कार्यक्रमास NSS चे २५० स्वयंसेवक उपस्थित होते.

रक्तदान शिबीर -

दि. २३सप्टेंबर, २०१६ रोजी दरवर्षाप्रमाणे NSS च्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. तासगावच्या रोटरी क्लब व सांगली येथील ए.एस.आय.ब्लड बँक या संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या रक्तदान शिबीरात ९२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच यावेळी मुलींसाठी मोफत हिमोग्लोबीन तपासणी ही घेण्यात आली. त्याचा लाभ १०० मुलींनी घेतला. रोटरी क्लबचे अध्यक्ष मा.

संजय नाईक (प्रसिध्द अभियंता, तासगांव) यांच्या शुभहस्ते या शिबीराचे उद्घाटन घेण्यात आले. यावेळी अध्यक्ष म्हणून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच रक्तदानाचे मानवी जीवनातील महत्त्व विषद केले. तासगाव येथील वृंदावन ज्वेलर्सचे श्री शरद जाधव यांच्या वतीने रक्तदात्यांना चहा व नास्ता देण्यात आला. या शिबीरास रोटरीचे जगदीश कालगावकर, श्री पेटकर, शानी डिजीटलचे, डॉ.प्रशांत पाटील, श्री. धनंजय जाधव, डॉ.अमर मस्के, LIC चे सावंत साहेब उपस्थित होते. या रक्तदान शिबीराचे आयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.टी.के.बदामे व प्रा. पी. आर.जाधव यांनी यशस्वीपणे केले.

निर्भया सायकल रॅलीत सहभाग–

दि. १७ ऑक्टोंबर, २०१६ रोजी सांगली जिल्हा पोलीस प्रमुख श्री. दत्तात्रय शिंदे यांनी त्यांच्या प्रमुख उपस्थितीत काढलेल्या जिल्हाव्यापी निर्भया सायकल रॅलीचे स्वागत महाविद्यालयाच्या विभागातील कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.टी.के. बदामे व स्वयंसेवकांनी या रॅलीत तासगाव शहरात सक्रीय सहभाग घेवून केले. यावेळी महाविद्यालयात आल्यानंतर सायकल रॅलीचे रुपांतर जाहिर सभेमध्ये झाले. यावेळी मा. दत्तात्रय शिंदे साहेबांचे 'महिला अत्याचार व स्वसंरक्षण' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व बाहेरील नागरीक असे सुमारे चारशे लोक उपस्थित होते.

स्वच्छता रॅलीत सहभाग –

दि. २६ ऑक्टोंबर २०१७ रोजी तासगाव नगरपालिकेने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत तासगाव शहरव्यापी 'स्वच्छता रॅली' चे आयोजन केले होते. या स्वच्छता रॅलीत NSS च्या ७० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. तासगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी मा. अभिजित वायकोस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या स्वच्छता रॅलीत NSS चे कार्यक्म अधिकारी प्रा.डॉ.के.बदामे, कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. जाधव यांनी सक्रीय सहभाग घेतला.

कॅशलेस कार्यशाळा –

UGC नवी दिल्ली व राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या आदेशानुसार दि. १० जानेवारी, २०१७ रोजी कॅशलेस कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेसाठी साधनव्यक्ती म्हणून मा. सूरज वाघमोडे व मा. तेजस येडेकर जनसंपर्क अधिकारी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा तासगाव हे उपस्थित होते. या कॅशलेस कार्यशाळेत सुरुवातीस व्याख्यानरुपाने डिजीटल बँकींगचे स्वरुप मा. सुरज वाघमोडे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे कॅशलेस व्यवहार कसे केले जातात हे मशीनद्वारे दाखविले. त्यानंतर महाविद्यालय परिसरातील हॉटेल शिवप्रताप व हॉटेल स्वामी यांना विद्यार्थ्यांनी कॅशलेस व्यवहाराचे महत्व पटवून सांगितले. या कार्यशाळेत NSS चे तीस स्वयंसेवक सहभागी झाले होते. सदर कार्यशाळेचे आयोजन NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. टी. के. बदामे यांनी यशस्वीपणे केले.

नेत्रदान उपक्रमात सहभाग –

दि. ३ जानेवारी, २०१७ रोजी दृष्टी व्हिजन या संस्थेच्या वतीने शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात एकाच दिवशी संपन्न झालेल्या उपक्रमात NSS च्या ५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व मरणोत्तर नेत्रदान करण्याचा संकल्प केला.

विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय शिबीरात सहभाग –

शैक्षणिक वर्ष २०१६–१०१७ मध्ये विविध विद्यापीठ स्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीरांमधून एकूण ३१ विद्यार्थी स्वयंसेवक सहभागी झाले. यातून

दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय आव्हान शिबीरासाठी निवड झाली. शिवाजी विद्यापीठ स्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीरात दोन विद्यार्थींनींना बेस्ट व्हॉलेंटियर पारितोषिक प्राप्त झाले. या खेरीज एका विद्यार्थिनींने बारामती येथे 'स्वयंसिध्दा' संमेलनात यशस्वी सहभाग झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील संमेलनात सहभाग घेतला विशेष प्राविण्यप्राप्त स्वयंसेवक पुढीलप्रमाणे-

१) कु. हर्षली विजयसिंह जाधव - विद्यापीठ स्तरीय शिबीरातून आव्हानसाठी निवड. ७ व्या राष्ट्रीय छात्र संसद पुणे येथे सहभाग अव्युक्त कार्यशाळेत सक्रीय सहभाग

२) कु. अनघा पोपट पाटील बी.ए.भाग-३ राज्यस्तरीय 'स्वयंसिध्दा' युवती संमेलनात सहभाग

३) शिवंभू चंद्रकांत माळी बी.ए.भाग-३ राज्यस्तरीय आव्हान शिबीरासाठी निवड, अव्युक्त IT कार्यशाळेत सक्रीय सहभाग

४) कु. गायत्री संजय पाटील बी.ए.भाग १ विद्यापीठस्तरीय शिबीरात बेस्ट व्हॉलेंटियर पुरस्कार प्राप्त

५) कु. ज्योती आनंद पागडे बी.एस्सी.भाग-१ विद्यापीठस्तरीय शिबीरात बेस्ट व्हॉलेंटियर पुरस्कार प्राप्त

६) कु. ऋतिका प्रताप डिसले बी.ए.भाग-३ अव्युक्त IT कार्यशाळेत सक्रीय सहभाग

७) रविराज बाळासो खरे बी.ए.भाग-२ ,सचिन संजय माळी बी.ए.भाग-२, आकाश संजय पाटील बी.ए.भाग-२ जिल्हास्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीरात विद्यापीठ दत्तक खेडे मौजे तडवळे येथे प्रभावी स्वयंसेवक म्हणून सुवर्णपदक प्राप्त.

शिबीर अहवाल -

विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे उपळावी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ अहवाल : -

राष्ट्रीय सेवा योजनेचे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील विशेष श्रमसंस्कार शिबीर गुरुवार दि. १९ जानेवारी, २०१७ ते बुधवार दि. २५ जानेवारी २०१७ या कालावधीत मौजे उपळावी, जि. सांगली येथे संपन्न झाले. या शिबीरामध्ये १२५ इतक्या NSS च्या स्वयंसेवकांनी भाग घेतला. या शिबीराचे उद्घाटन दि. १९/०१/२०१७ रोजी दुपारी २ वा. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या हस्ते झाले यावेळी उपळावी गावच्या प्रथम नागरिक मा. सरपंच सौ. अश्विनी रोकडे तसेच उपसरपंच मा. चंद्रकांत कदम सर उपस्थित होते. प्रास्ताविक NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.टी.के.बदामे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.ए.बी.कांबळे यांनी केले.

ग्रामस्वच्छता - शिबीर कालावधीत नालेसफाई उपक्रमा अंतर्गत संपूर्ण उपळावी गावातील नालेसफाई व कचरा भरून टाकणे संपूर्ण ग्रामस्वच्छता या उपक्रमाअंतर्गत गावातील ग्रामपंचायत कार्यालय परिसर, हनुमान मंदिर परिसर, सिध्देश्वर मंदिर परिसर गावातील इतर सर्व मंदिरांचा परिसर,सर्व प्रमुख रस्ते, र्पाथमिक शाळा, अंगणवाड्यांचा परिसर नवीन व जुनी स्मशानभूमी अशा सर्व ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

रामोशी समाज स्मशानभूमी रस्ता निर्मिती :-

उपळावी-मतकुनकी रस्त्यावरील ओढ्यावर पूर्व बाजूस २०० फूट रस्ता व स्मशानभूमीसाठी ४०×५० चौ. फूट जागा भराव टाकून तयार करण्यात आला. ओढ्यातील दगड व वाळू तसेच मातीची भर टाकून हा रस्ता तयार करण्यात आला. त्यामुळे गावातील रामोशी समाजाची स्मशानभूमीची निकडीची गरज पूर्ण झाली.

दि. २१/०१/२०१७ रोजी 'डिजीटल बँकींग आणि विविध शासकिय योजना' या विषयावर प्रात्यक्षिक आणि व्याख्यान देण्यासाठी 'अनुलोम' (अनुगामी लोकराज्या महाअभियान) या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने टी.जे.एस.बी.बँकेचे सांगली येथील शाखा मॅनेंजर मा. सचिन कुलकर्णी तसेच मा.श्री.निवास गायकवाड, उपविभागीय अधिकारी, सांगली विभाग, श्री. अतुल यादव जनसंपर्क अधिकारी तासगांव तालुका हे उपस्थित होते. यावेळी डीजीटल बँकींग ही संकल्पना मा. कुलकर्णी साहेबांनी विस्तुतपणे समजावून सांगितली व्याख्यानानंतर सुमारे पंधरा ग्रामस्थांनी आपल्या मोबाईलवर टी.जे.एस.बी. बँकेचे कॅशलेस व्यवहाराचे प्रात्यक्षिक करून पाहिले. यावेळी श्री. गायकवाड साहेबांनी गोपिनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजना तसेच जलयुक्त शिवार योजना अशा अनेक शासकीय योजनांची माहिती व्याख्यानास पाचशेच्यावर ग्रामस्थ उपस्थित होते.

दि. २२/०१/२०१७ रोजी 'शिवचरित्रातील रोमहर्षक प्रसंग' या विषयावर महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील ज्येष्ठ प्राध्यापक व सुप्रसिद्ध वक्ते प्रा.जी.के पाटील सर यांचे व्याख्यान झाले. प्रा.जी.के.पाटील सरांनी व्याख्यानाच्या माध्यमातून शिवचरित्रातील अनेक नाट्यमय प्रसंग ओघवत्या शैलीतून श्रोत्यांसमोर उभे केले. ग्रामस्थांच्या उत्फूर्त उपस्थितीमुळे त्यांच्या व्याख्यानास मोठा प्रतिसाद मिळाला.

दि. २३/०१/२०१७ रोजी महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ.भाऊराव दांगड यांचे 'औषधी वनस्पतींची शेती' या विषयावर व्याख्यान झाले. आपल्या परिसरातील अनेक वनऔषधी वनस्पतींची शेती कशा पध्दतीने करता येते हे मा. दांगट सरांनी शेतकरी श्रोत्यांना समजावून सांगितले. औषधी वनस्पती शेतीसाठी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची माहितीही त्यांनी यावेळी दिली. या व्याख्यानासही लोकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सांस्कृतिक कार्यक्रम :-

मौजे उपळावी येथे गेली पाच वर्षे महाविद्यालयाचे शिबीर होत असल्याने गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम शिबीर कालावधीत दरवर्षी संपन्न होतो. शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांना वाव अशा उपक्रमातून मिळत असतो. यावर्षी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम शिबीर कालावधीत दि. २४/०१/२०१७ रोजी संपन्न झाला. यावेळी आपल्या मुलांचे कौतुक करण्यासाठी मुलांच्या आईवडीलांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली सुमारे दोनहजार श्रोत्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या समारंभात बालचमूच्या प्रत्येक नृत्य अविष्कारासाठी उस्फूर्तपणे ग्रामस्थांकडून रोख स्वरुपात पारितोषिकांची रक्कम शालासमितीकडे प्राथमिक शाळेच्या विकासासाठी देण्यात आली हे या उपक्रमाचे मोठे फलित होय.

वादविवाद/ चर्चासत्र :-

शिबीर कालावधीत दुपारच्या वेळेत (दु. २.३० ते ३.३०) दररोज ज्वलंत सामाजिक विषयांवर वादविवाद व चर्चासत्रे घेण्यात आली. त्यांचे संयोजन कु. अनघा पोपट पाटील, कु. हर्षली विजयसिंह जाधव, कु. ऋतुजा अशोक पाथरवट या स्वयंसेवकांनी केले.

गांव पाणीपुरवठा विहीरीतील गाळ काढणे :-

उपळावी गावास पिण्याच्या पाण्याचा पुरवठ्याचा मुख्यस्रोत असणारी विहीर स्वच्छ करण्याचे कार्य शिबीर कालावधीत स्वयंसेवकांनी यशस्वीपणे पूर्ण केले. पोहायला येवू शकणारे सहा स्वयंसेवक विहीरीत उतरले व त्यांनी पाण्यात तयार झालेले शेवाळ व वरुन पडलेला झाडपाला इत्यादी कचरा पाळणा सोडून काढला व विहीर स्वच्छ केली.

इतर कामे :-

उपळावी गावात येणाऱ्या मुख्यरस्त्याच्या

दूतर्फा असणारी जंगली काटेरी झुडूपे तोडून व कचरा पेटवून स्वच्छता करण्यात आली. तसेच जुन्या स्मशानभूमीच्या परिसरातील काटेरी झुडूपे तोडून व गाजर गवत पेटवून तो परिसर स्वच्छ करण्यात आला. प्राथमिक शाळा परिसराच्या स्वच्छतेबरोबरच छोटा बगीचा स्वच्छ करुन तेथील झाडांना आळी तयार करुन त्यांना पाणी देण्यात आले.

सांस्कृतिक / प्रबोधनपर उपक्रम :-

शिबीर कालावधीत अनेक सांस्कृतिक उपक्रम व व्याख्याने, विविध स्पर्धा, चर्चासत्रे, वादविवाद इ. उपक्रम राबविण्यात आले.

प्रबोधनपर व्याख्याने :-

शुक्रवार दि. २०/०१/२०१७ रोजी 'नोटबंदी, कॅशलेस व्यवहार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था' या सध्याच्या महत्त्वाच्या विषयावर तासगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडियाचे मुख्य प्रबंधक मा. आनंद देशपांडे साहेब यांचे व्याख्यान संपन्न झाले.

सुदृढ बालक स्पर्धा :-

उपळावी गावात एकूण सात अंगणवाड्या आहेत. येथील बालकांसाठी सुदृढ बालक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक अंगणवाडीतून सर्वोत्कृष्ठ दोन विद्यार्थ्यांना सुदृढ बालक प्रथम व द्वितीय क्रमांची अशी एकूण चौदा पारितोषिके ग्रामपंचायत मौजे उपळावी यांच्या सहकार्याने वाटण्यात आली.

चित्रकला स्पर्धा :-

प्राथमिक शाळेतील १ ली ते ४ थी लहान गट व ५ वी ते ७ वी मोठा गट अशा दोन गटात चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्वच्छ भारत अभियान या विषयावरील या स्पर्धेची प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन पारितोषिक अशी एकूण सहा पारितोषिके देण्यात आली.

महारांगोळी स्पर्धा :-

ग्रामस्वच्छता अभियाना अंतर्गत स्वच्छतेचे महत्त्व सर्वांना पटावे याकरिता गावव्यापी महारांगोळी स्पर्धेचे आयोजन दि. २२/०१/२०१७ करण्यात आले. या उपक्रमात सुमारे शंभर गृहीणींनी सहभाग घेतला. दोन गटात झालेल्या या स्पर्धेत एकूण ६ पारितोषिके ग्रामपंचायतीच्या सहकार्याने देण्यात आली.

मोफत नेत्रतपासणी शिबीर :-

सांगली येथील टेके आय क्लिनिक यांच्या सहकार्याने दि. २४/०१/२०१७ रोजी मोफत नेत्रतपासणी शिबीर आयोजित करण्यात आला. याचा लाभ गावातील ७० ग्रामस्थांनी घेतला.

हळदी-कुंकू समारंभ :-

दि. २३ जानेवारी, २०१७ रोजी दुपारी ३ वा. हळदी-कुंकू व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी तासगावच्या महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. भारती पाटील मॅडम यांचे 'जागर जाणिवांचा' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानाचा लाभ गावातील दोनशे महिला व युवतींनी घेतला. महिला विकासाच्या संधी व बदलत्या वास्तवात स्त्रीची भूमिका याविषयी आपली परखड मते तयांनी व्यक्त केली. NSS तालुका समन्वयक या नात्याने त्यांनी शिबीर स्थळास भेट दिली व स्वयंसेवकांचे कौतुक केले.

समारोप समारंभ :-

NSS शिबीराचा समारोप समारंभ दि. २५/०१/२०१७ रोजी संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून मा. प्रा. सदाशिव मोरे जिल्हा समन्वयक, NSS सांगली बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाडी हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी NSS मधील विद्यार्थ्यांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील कॉमर्स विभागाचे प्रमुख प्रा.एम.डी.पाटील उपस्थित होते.

यावेळी उपसरपंच श्री. चंद्रकांत कदम सर यांच्या वतीने उत्कृष्ठ कार्यकरणाऱ्या NSS च्या सर्व कार्यक्रम अधिकारी, सदस्य प्राध्यापक, सेवक या सर्वांचे फेरे बांधून सत्कार करण्यात आले. शिबीर कालावधीत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या चार विद्यार्थ्यांचा गौरव यावेळी सर्वोत्कृष्ठ स्वयंसेवक म्हणून करण्यात आला. तसेच सहा ग्रुप लीडर्स. यावेळी NSS युनिट १ व २ मधुन कु. ऋतुजा अशोक पाथरवट बी.ए.भाग-२ व आकाश संजय पाटील बी.ए.भाग-२, योगेश पाटील बी.ए.भाग-२ या विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ठ स्वयंसेवक म्हणून गौरविण्यात आले. व त्यांना NSS च्या वतीने पारितोषिके देण्यात आली. अशा प्रकारे हे विशेष श्रमसंस्कार शिबीर यशस्वीपणे संपन्न झाले.

प्रा.डॉ.टी.के.बदामे
NSS कार्यक्रम अधिकारी

एन.सी.सी. अहवाल :-

आपल्या महाविद्यालयामध्ये एन. सी. सी. युनिट मध्ये ५४ छात्र आहेत. त्यापैकी ४९ छात्र (Boy) व ०५ छात्र (Girls) आहेत.

१) दि. २६ जानेवारी, २०१७ रोजी संपन्न झालेल्या ६८ व्या प्रजासत्ताक दिनाच्या दिल्ली (राजपथ) येथील संचलनासाठी आपल्या महाविद्यालयातील सार्जंट लक्ष्मण व्यंकाप्पा ढंगोळी याची निवड झाली. महाविद्यालयातील R.D. परेडची परंपरा एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी कायम राखत सलग तिसऱ्या वर्षी हॅट्रिक साधली.

२) औरंगाबाद येथे झालेल्या इंटर ग्रुप कॉम्पिटेशन मध्ये आपल्या महाविद्यालयातील तीन छात्रांचा सहभाग होता.

* सार्जंट लक्ष्मण व्यंकाप्पा ढंगोळी
* सार्जंट सुरज सुधाकर झांबरे
* कार्पोरल स्वप्निल बाळासाहेब ठोंबरे

३) दि. ०७ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत इंदौर येथे झालेल्या नॅशनल इंटिग्रेशन कॅम्पसाठी आपल्या महाविद्यालयातील सिनिअर अंडर ऑफिसर अभिजीत विष्णू भोसले याची निवड झाली होती.

४) तसेच जैसलमेर येथे १५ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत झालेल्या स्पेशल नॅशनल इंटिग्रेशन कॅम्पसाठी सार्जंट विवेक विठ्ठल लावंड याची निवड झाली.

५) दि. ०९ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत अंदमान व निकोबार येथे झालेल्या स्पेशल नॅशनल इंटिग्रेशन कॅम्पसाठी सार्जंट सुरज सुधाकर झांबरे याची निवड झाली होती.

६) आपल्या महाविद्यालयातून दि. ०३ डिसेंबर ते १४ डिसेंबर, २०१६ दरम्यान झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील ॲडव्हान्स लीडरशीप कॅम्पसाठी दोन छात्रांची निवड झाली होती.

* सिनिअर अंडर ऑफिसर अभिजीत विष्णू भोसले
  – बेस्ट कॅडेट पारितोषिक
* ज्युनिअर अंडर ऑफिसर अमोल कृष्णत पाटील

७) दि. १२ ऑक्टोंबर, ते १९ ऑक्टोंबर, २०१६ दरम्यान झालेल्या 'ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प, केरळ' साठी सार्जंट विक्रम संजय पाटील याची निवड झाली होती.

८) आर्मी ॲटॅचमेंट कॅम्प, अहमदनगर साठी आपल्या महाविद्यालयातून ४ छात्रांची निवड झाली. तसेच या कॅम्पचे नेतृत्व आपल्याच महाविद्यालयातील सार्जंट जयदीप कृष्णदेव पाटील याने केले.

९) अमरावती येथे झालेल्या थलसेना कॅम्प इंटर ग्रुप कॉम्पिटेशन साठी आपल्या महाविद्यालयातील तीन छात्रांची निवड झाली होती.

* कार्पोरल विकास प्रताप चव्हाण
* कार्पोरल स्वप्निल बाळासाहेब ठोंबरे
* कॅडेट अनिकेत दिनकर पाटील

१०) ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प, कोल्हापूर साठी १७ छात्रांची निवड झाली होती.

११) तसेच ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प, बुधवाडी साठी ७ छात्रांची निवड झाली होती.

१२) फेब्रुवारी, २०१५ मध्ये झालेल्या 'बी' प्रमाणपत्र परिक्षेमध्ये १० पैकी ७ छात्रांनी 'ए' ग्रेड मिळवली. तसेच १००% निकालाची परंपरा कायम राखली.

१३) रक्तदान शिबीर (०९ डिसेंबर, २०१६), वृक्षारोपण (०१ जून, २०१६), स्वच्छता अभियान व इतर अशा अनेक उपक्रमात आमच्या छात्रांनी सक्रिय सहभाग घेतला.

१४) मतदान जागृती अभियान ( ), निर्भया रॅली, राष्ट्रीय मतदार दिवस (२५/०१/२०१६), वित्त साक्षरता अभियान ( ), यासाठी शहरातून सायकल रॅली व मानवी साखळी याद्वारे एन.सी.सी. छात्रांद्वारे प्रबोधन.

१५) ०२ ऑगस्ट, २०१५ रोजी 'नॅक' कमिटीने महाविद्यालयाला भेट दिली व ----तयार केलेला 'फ्लॅग पाहणी केली. यावेळी, एन.सी.सी. कॅडेटरिआ' पाहिला व त्याचे कौतुक केले. तसेच एन.सी.सी. ऑफिसची पाहणी केली. NCC कमिटीच्या स्वागतासाठी NCC छात्रांनी गार्ड ऑफ ऑनर दिला. १६) शैक्षणिक सर्ष २०१६-२०१७ मध्ये एन.सी.सी. विभागातील आजपर्यंतच्या इतिहासामध्ये एकाच वर्षी ८ नॅशनल कॅम्पसाठी एन.सी.सी. छात्रांची निवड झाली.

१७) IGC, कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या RDC कॅम्पचे नेतृत्व आपला NCC छात्र लक्ष्मण व्यंकाप्पा ढंगोळी याने केले.

LT. Vinodkumar Kumbhar

प्लेसमेंट सेल

कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, पलूस, आयोजित मेगा जॉब फेयर चे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी आमच्या महाविद्यालयातून १३ विद्यार्थी पाठविण्यात आले. भविष्यात या सर्वांना संधी मिळतील अशी अपेक्षा आहे. या विभागामार्फत जागतिक युवा कौशल्यदिन संपन्न करण्यात आला. यावेळी शासकीय ITI कॉलेज, तासगांवचे मरळे एस. आर. व जाधव जे. पी. यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. यात १३९ विद्यार्थी सहभागी झाले. या विभागाचे काम डॉ. घोडके पाहतात.

– डॉ. घोडके जे. एस.
चेअरमन

अग्रणी महाविद्यालय योजना २०१६-२०१७ :-

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये शिवाजी विद्यापीठाने या महाविद्यालयास तिसऱ्यांदा प्रमुख अर्गणी महाविद्यालय क्लस्टरमध्ये एकूण ९ महाविद्यालयाचा समावेश आहे. या क्लस्टरचे प्रमुख म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार व समन्वयक म्हणून प्रा. के.एस.पाटील काम पाहतात. अग्रणी महाविद्यालय उपक्रमांर्तगत महाविद्यालयात खालील कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

१) "Workshop on skill development and success story"

महाविद्यालयातील वाणिज्य विभागामार्फत गुरुवार दि. ६/१०/२०१६ रोजी अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत "Workshop on skill development and success story" या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा. एम. डी. पाटील वाणिज्य विभाग प्रमुख यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत करुन कार्यशाळा घेण्याचा हेतू

स्पष्ट केला. सदर कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील प्रा. डॉ.ए.एम.गुरव यांचे हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

पहिल्या सत्रांतील मार्गदर्शक प्रा. डॉ.ए.एम. गुरव यांनी विद्यार्थी जीवनात कौशल्याचे महत्त्व स्पष्ट केले. आईचे व्यवस्थापन जे शिकले तेच योग्य प्रकारे व्यवस्थापन करु शकतात आणि अशा कौशल्य क्षेत्रातील परीक्षांना व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यानी आपले मनोधैर्य वाढविले पाहिजे. दुसऱ्या सत्रात प्रा. शिवप्रसाद शेटे व प्रा. आर.एस. साळुंखे यांनी विद्यार्थ्यानी आपल्या कौशल्याना मूर्त स्वरुप दिले पाहिजे या कार्यशाळेच्या आभार प्रा. श्रीमती पी.एम.खनुजा यांनी मानले कार्यशाळेत एकूण १५७ विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभागी झाले होते.

नेतृत्व व कौशल्य विकास :-

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगांव व बहाई अकादमी, पांचगणी जि. सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. २८/१२/२०१६ रोजी 'नेतृत्व व कौशल्य विकास' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. ही कार्यशाळा सकाळी १० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पार पडली.

या कार्यशाळेचे उद्घाटन अकादमाची केंद्र संचालक श्री लेसन आझादी याच्या शुभ हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या उपस्थित पार पडली.

कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे मा. लेसन आझादी यांनी वेगवेगळे प्रश्न विचारुन कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींना आपल्यामधील स्व ची ओळख करुन घेण्यासाठी आत्मचिंतनाचे महत्व विशद केले. तसेच नेतृत्व व कौशल्य गुणाच्या विकासासाठी काय करावे लागेल तसेच प्रत्यक्ष कृतीद्वारे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेमधील सहभागी विद्यार्थ्यांचे गट पाडून नेतृत्व विकास या वरती काही प्रश्न उपस्थित करुन उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच आजचा युवक सार्वत्रिक मानवतेचा कणा असल्याची जाणीव त्यांच्या कृतीद्वारे दाखवून दिले.

बहाई अकादमीचे सदस्य श्री. पराग तांदळे व श्री. नवनाथ बोबले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यावेळी ते म्हणाले, कार्याला कृतीची जोड असेल तर कोणतेही कार्य सहज सिध्द होऊ शकते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ आपला विचार न करता त्यामध्ये सार्वभौमिकता आणावी.

या कार्यशाळेत मायणी महाविद्यालय, बी.एड्. कॉलेज, तासगांव, महिला महाविद्यालय, तासगांव, बळवंत कॉलेज, विटा, संपतराव माने महाविद्यालय, खानापूर येथील विद्यार्थी, प्राध्यापक अशी १४५ जणांनी सहभाग घेतला होता. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. डी.ए.भोसले, डॉ. टी.के.बदामे, प्रा. ए.एस.पाचोरे, प्रा. आर.एन.लादे यांनी सहकार्य केले.

नोटाबंदीने काय कमावलं व काय गमावलं ?

महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने बुधवार दि. १८/१/२०१७ रोजी नोटाबंदीने काय कमावलं व काय गमावलं ? या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. व्ही. बी. ककडे यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, ज्या देशाची अर्थव्यवस्था शेतमाल व शेतमाल उत्पादन प्रक्रियेवरती अवलंबून आहे. अशा देशात ९८% व्यवहार रोखीने होत असताना काळा पैसा बाहेर काढण्याच्या महत्वकांक्षेपोटी सरकारने अचानक ५०० व १००० रुपयांच्या नोटा बंद

केल्या. एका लेखणीच्या फटकाऱ्याने या देशाच्या अर्थव्यवस्थेचे चक्र मंदावले. शेतकरी रस्त्यावर आला. शेतमालाचे भाव गडगडले. सरकारच्या राक्षसी निर्णयाने उपाय करताना अपाय घडला.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात श्री. संपतराव माने महाविद्यालय, खानापूर चे प्राचार्य डॉ. ए. एस. पाटील यांनी कॅशलेस व्यवहार या विषयावरती आपले विचार मांडले. ते म्हणाले, भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्था असलेल्या देशात कॅशलेस व्यवहाराबाबत ७० ते ८० टक्के लोक अज्ञानी असल्याचे दिसून येते. त्यामुळे नोटाबंदी निर्णयाच्या अगोदर आर्थिक साक्षरतेवर सरकारने भर देणे गरजेचे होते.

कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात पलूस सहकारी बँक, शाखा तासगांव येथील श्री. उमेश पंडीत यांनी नोटाबंदीच्या काळात सहकारी बँकापुढील आव्हाने या विषयावर आपले विचार मांडले. ते म्हणाले, देशाच्या एकूण पतपुरवठ्यात सहकारी बँकांचा हिस्सा सर्वात जास्त आहे. परंतू सहकारी बँकाकडे सरकार अविश्वासाने पहात आहे. त्यामुळे सहकारी बँकींग व्यवस्था कोलमडण्याची शक्यता आहे. कार्यशाळेच्या अध्यक्ष पदावरुन बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले की, आजच्या वास्तव ज्वलंत प्रश्नावर अर्थशास्त्र विभागाने कार्यशाळेचे आयोजन केले असून ही कार्यशाळा विद्यार्ती, प्राध्यापक व समाज यांना मार्गदर्शक ठरेल. असा मला विश्वास आहे.

तीन सत्रात संपन्न झालेल्या या कार्यशाळेत १७५ विद्यार्थी, २५ प्राध्यापक सहभागी झाले होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. जे.ए.यादव यांनी केले. प्रा. के.एस. पाटील यांनी कार्यशाळेचा हेतू कथन केला. तर आभार प्रा. के. एन. पाटील यांनी मांडले.

स्त्री शक्तीची उत्तुंग भरारी तरी स्त्रीभ्रुण हत्त्या का?

महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी दि. ४/२/२०१७ रोजी अग्रणी महाविद्यालय योजना व महिला सक्षमीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री शक्तीची उत्तुंग भरारी तरी स्त्रीभ्रुण हत्त्या का? या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. जयश्री पाटील यांचे शुभहस्ते झाले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य हॉ. आर. आर. कुंभार होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. एस. डी. जाधव यांनी केले. त्यावेळी त्या म्हणाल्या, महाविद्यालयीन जीवनातच मुलींना हक्क व जबाबदाऱ्या यांची जाणीव होणे गरजेचे आहे. त्या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

कार्यशाळेच्या प्रुमख अतिथी हॉ. सौ. जयश्री पाटील म्हणाल्या, स्त्री ही नवनिर्मितीची प्रेरणा आहे. आजची स्त्री अत्यंत धडाडीची असूनही समाजामध्ये निर्भयपणे वावरु शकते का? ही साशंकता दूर करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थिनींना पुढाकार घ्यावा. लोकगीते व पाळणा गीतातून त्यांनी स्त्री भ्रुणहत्त्येविरोधी जाणीव करुन दिली. स्त्रीभ्रुण हत्त्या थांबवयाची असेल तर मातेने आत्मनिर्भर व निर्भिड होणे गरजेचे आहे. स्त्रियांकडे सामर्थ्यशिलता, सौजन्य व शिस्तबध्दता असेल तर स्त्रीभ्रुण हत्त्या होणारच नाहीत. असे विचार मांडले.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. अलका पाटील, डॉ. माया पाटील, प्रा. सौ. मेघा पाटील यांनी सहकार्य केले. या कार्यशाळेत एकूण २५७ विद्यार्थ्यांनी सहभागी झाल्या होत्या.

अग्रणी महाविद्यालय योजना यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, श्री. सुनिल महाडिक व सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकांचे सहकार्य मिळाले.

प्रा. के. एस. पाटील,
समन्वयक

वाणिज्य विभाग

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या कालावधीत १० ऑगस्ट २०१६ रोजी मा. प्राचार्य संभाजीराव पाटील, पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची यांच्या शुभहस्ते या विभागाचे उद्घाटन करण्यात आले. दि. ४ सप्टेंबर २०१६ ला ई-बँकिंग कार्यशाळा उत्कर्ष कांबळे, विभागीय अधिकारी, कोल्हापूर यांच्याहस्ते व १० ऑक्टोबर २०१६ रोजी SKILL DEVELOPMENT AND SUCCESS STORIES ही कार्यशाळा हॉ. ए.एम.गुरव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या हस्ते संपन्न झाला. या विभागामार्फत १४ नोव्हेंबर २०१६ रोजी शिवार कृषीप्रदर्शन, तासगांव भेट व दि. २४/१२/२०१६ रोजी राष्ट्रीय ग्राहकदिन प्रा. एम. डी. पाटील यांच्या व्याख्यानाने संपन्न झाला. तर १३ जानेवारी २०१७ ला नेटसेट बाबत मार्गदर्शनपर व्याख्यान प्रा. एस. एस. चिले, बळवंत कॉलेज, विटा यांचे झाले. १४ जानेवारी २०१७ रोजी विक्रयकौशल्य मेळावा विद्यार्थी निर्मिती वस्तूंचा २५ STALL च्या माध्यमातून घेण्यात आला. त्यांचे उद्घाटन हॉटेल उद्योजक प्रताप एडके यांच्या हस्ते झाले. या मेळाव्यात खरेदी-विक्री व्यवहार कॅशलेस पध्दतीने कसे करावेत यासंबंधी कृतीद्वारे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. तर पदवीनंतर करिअर संधी या विषयावर दि. २० जानेवारी २०१७ रोजी डॉ. कृष्णाजी पाटील, आर.आय.टी., इस्लामपूर यांची व्याख्यान झाले, तर दि. ६ फेब्रुवारी २०१७ रोजी INCOME TAX या विषयावर डॉ. एन. एल. कदम, जयसिंगपूर महाविद्यालय यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या वरील सर्व उपक्रमांना मा. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन मिळाले. प्रा. पी. एम. खनुजा, प्रा. लोकेश्वरी पाटील यांचे सहकार्य लाभले. प्रा. एम. डी. पाटील आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने चालवितात.

– प्रा. एम. डी. पाटील
वाणिज्य विभाग प्रमुख

प्रसिद्धी विभाग

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामध्ये जे विविध उपक्रम झाले. त्याच्या बातम्या व राष्ट्रीय राज्यस्तरावर जे ज्या थोरपुरुषांच्या पुण्यातिथी, जयंती कार्यक्रम संपन्न होतात त्यांच्या बातम्या दै. तरुण भारत, दै. पुण्यनगरी, दै. केसरी, दै. लोकमत, दै. पुढारी, दै. जनप्रवास, दै. लोकसत्ता, दै. सकाळ यात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आल्या. एकूण ४० बातम्या प्रसिध्द झाल्या. तसेच महाविद्यालय वर्षातून दोनदा स्वत:चा My College Bulletin अंक प्रसिध्द करते. त्याचे संपादन मी स्वत: करतो. सदरचे अंक अत्यंत दर्जेदार प्रसिध्द केले जातात.

– प्रा. जी. के. पाटील
प्रसिद्धी विभाग

वार्षिक कार्यक्रम –

महाविद्यालयाच्या वतीने वर्षभर जे कार्यक्रम घ्यावयाचे असतात. त्याचे नियोजन जुनमध्ये केले जाते. त्यानुसार विविध राष्ट्रपुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी कार्यक्रम,विद्यार्थ्यात वक्तृत्वाची आवड निर्माण व्हावी. म्हणून स्टुंडट फोरम स्थापन करण्यात येऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व्याख्यानमाला ३ जानेवारी २०१७ या कालावधीत चालविण्यात आणि याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या औचित्याने महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने जे कार्यक्रम आयोजित केले जातात. ते महाविद्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न केले जातात.

– प्रा. जी. के. पाटील
चेअरमन

निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद स्पर्धा

या विभागाच्यावतीने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून वक्तृत्व, निबंध, चित्रकला स्पर्धासाठी जी निमंत्रणे येतात त्यासाठी आम्ही आमचे

संघ पाठवित असतो. विशेष म्हणजे आमच्या संस्थेच्या वतीने १२ जानेवारी ते १९ जानेवारी २०१७ या कालावधीत ज्या निबंध, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या त्यात पुढील स्पर्धक यशस्वी झाले.

निबंध

कु. अन्सारी फरहीन खलीकुज्जम, बी.एस्सी.१ – प्रथम

कु. नलवडे शितल सोपान, बी.ए.३ – द्वितीय

कु. मुजावर आसमा शब्बीर, बी.ए.३ – तृतीय

वक्तृत्व

कु. पाटील आरती भागवत, बी.एस्सी.२ – प्रथम

कु. पाटील लीमी सुभाष, बी.कॉम.२ – द्वितीय

कु. पाटील अनघा पोपट, बी.ए.३ – तृतीय

चित्रकला

कु. श्वेता सुरेश सुतार, बी.कॉम.२ – प्रथम

श्री. स्वप्निल अशोक कुंभार, बी.ए.३ – द्वितीय

कु. मेहतर रविना बाळासाहेब, बी.कॉम.३ – तृतीय

–डॉ. डी. बी. थोरबोले
चेअरमन

प्रशासन विभाग :

आमच्या महाविद्यालयातून विविध ज्ञानशाखेतून पदवी आणि पदव्युत्तर विभागात कामकाज चालते. त्यामध्ये विशेषत: कला, वाणिज्य तर पदव्युत्तर मध्ये रसायनशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र व शैक्षणिक वर्ष २०१६–२०१७ मध्ये नवीन मान्यता मिळवलेले भूगोल व कॉस्टिंग विभागाचे कामकाज चालते. पदव्युत्तर शिक्षणाची नव्याने सोय विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून इतिहास, संख्याशास्त्र विषय व बी.एस्सी.भाग–१–२–३, बी.कॉम.भाग–१–२, जादा तुकड्यांचा प्रस्ताव शासन व विद्यापीठीय स्तरावर पाठवले आहे, त्यात आम्हांस निश्चितच यश मिळेल. ऑगस्ट २०१७ मध्ये बेंगलोर NAAC पियर टीम तपासणीस आली होती. व तपासणी करून महाविद्यालयास ही ग्रेड दिली आहे. U.G.C. DIST FIST या योजनेअंतर्गत रु. ५०००००/– मंजूर झाले. व त्यातील रु. ३९५०००/– अनुदानास प्राप्त झाले आहे. महाविद्यालयात शिक्षण व शिक्षणोत्तर १७६ कर्मचारी कार्यरत आहेत.

– एम. बी. कदम
प्रशासन विभाग

२) बांधकाम :

जुन्या सायन्स इमारतीच्या जागी ज्युनिअर विभागासाठी नविन अद्ययावत बांधकाम पूर्ण होणाच्या स्थितीत आहे. त्याचा अंदाजे खर्च १ कोटी २५ लाख अपेक्षित आहे. या विभागाचे चेअरमन डॉ. सी. जी. पाटील आहेत.

– डॉ. सी. जी. पाटील
चेअरमन

वसंताविष्कार

२०१६–१७ हे वर्ष महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय वसंतरावदादा पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून महाराष्ट्र भर साजरे केले जात आहे. याचे औचित्य साधून आपल्या महाविद्यालयाने महाविद्यालयीन पातळीवर वसंताविष्कार या संशोधनावर आधारित स्पर्धेचे आयोजन करण्याचे ठरविले.

महाविद्यालयाच्या संशोधन समितीने आपल्या विद्यार्थ्यांच्यामध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागावी म्हणून दि. २१/१०/२०१६ रोजी या स्पर्धेची पहिली फेरी आयोजित केली. शिवाजी विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन केलेल्या

फेरीतील स्पर्धेत कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील १०८ विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

दि. २३/१२/२०१६ रोजी या स्पर्धेची दुसरी फेरी संशोधन कार्यशाळा म्हणून आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत डॉ. व्ही. डी. सुर्यवंशी, डॉ. पी. बी. काळे यांनी सधनव्यक्ती म्हणून संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धेच्या परिक्षणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सदर कार्यशाळेत एकूण १०८ संशोधकांमधून शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हा-पातळीवरील आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी सहा गटातून प्रत्येकी दोन संशोधकांची पोस्टर्स निवडण्यात आली.

वरील स्पर्धेत कला व वाणिज्य तसेच विज्ञान अशा दोन गटांमधून प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने पारितोषिक देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत यश संपादन केलेल्या आपल्या महाविद्यालयाच्या मनिषा किशोर गज्जर, बी.एस्सी.३ (स्टॅट) व कोमल मारुती चव्हाण बी.एस्सी.३ (केमिस्ट्री) या दोन विद्यार्थिनींना संशोधकांची विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली. हे या स्पर्धेचं फलितच होय. सदर स्पर्धेचे संयोजन महाविद्यालयीन संशोधन समितीचे प्रमुख प्रा. डॉ. सी. जी. पाटील तसेच सदस्य प्रा. डॉ. व्ही. वाय. पवार, प्रा. डॉ. बी. टी. कणसे, प्रा. डॉ. एस. एस. पाटील, प्रा. डॉ. टी. के. बदामे यांनी यशस्वीपणे केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे या सर्व उपक्रमाला सुरुवातीपासून मार्गदर्शन होते.

-डॉ. सी. जी. पाटील

प्रमुख महाविद्यालयीन संशोधन समिती

मतदार जागृती

महाविद्यालय व तहसील कार्यालय, तासगांव यांच्या संयुक्त विद्यमाने जुलै २०१७ ला मतदार नोंदणी मोहिम महाविद्यलयात राबविण्यात आली. त्यामुळे नव्याने २०० विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. तसेच १६ जानेवारी २०१७ ला राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने वाद-विवाद स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच १३ जानेवारी २०१७ ला मानवी साखळीचे आयोजन तासगांव शहरात करण्यात आले. त्यात महाविद्यालयाचे १०० विद्यार्थी सहभागी झाले. तर १४ जानेवारीच्या सायकल रॅलीत सहभाग घेतला. २५ जानेवारी २०१७ ला मौजे-उपळावी येथे श्रमसंस्कार शिबीरात मतदारांसाठी प्रतिज्ञा देण्यात आली. वर्षभर राबविन्यात आलेल्या या उपक्रमात २००० विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सहभाग घेतला. या विभागाचे काम प्रा. घोगरे एस. आर. पाहतात.

- प्रा. घोगरे एस. आर.
चेअरमन

विशेष स्थायी समिती

ही समिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनानुसार पदवी व पदव्युत्तर सर्व विभागातील विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया पार पाडताना, मागासवर्गीय आरक्षणानुसार प्रवेश दिला जातो. तसेच मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारक सर्व विद्यार्थ्यांकडून आलेले सर्व प्रकारचे अर्ज संबंधित विभागाकडे वेळेत पाठविले जातात. याकामी डॉ. सी. जी. पाटील, डॉ. व्ही. वाय. पवार, प्रशासन विभागातील कदम एम.बी., प्रा. ए. आर. पाटील उत्कृष्टरित्या महाविद्यालयास सहकार्य करतात.

- प्रा. आर. आर. कुंभार
चेअरमन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (अभ्यासकेंद्र-तासगांव) -

आमच्या महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यासकेंद्र जुलै १९९४ पासून गेली २१ वर्षे सातत्याने ज्ञानदानाचे व मार्गदर्शनाचे बहुमोल कार्य करीत आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' या ब्रीदवाक्यातून सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये या शिक्षणक्षेत्राने मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. आपल्या आयुष्यामध्ये जे उच्चशिक्षणापासून वंचित राहिले आहेत किंवा ज्यांनी घरगुती अडचणींमुळे व नोकरीमुळे शिक्षण अर्धवट सोडून दिले जाते. अशा गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना या शैक्षणिक उपक्रमाचा लाभ झालेला आहे.

या अभ्यासकेंद्रात पूर्वतयारी शिक्षणक्रम, बी.ए., बी. कॉम. या वर्गाचे ज्ञानदान व मार्गदर्शनाचे कार्य केले जाते. या शैक्षणिक वर्षात ३५ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करतात. या शैक्षणिक वर्षात अभ्यासकेंद्राने विद्यार्थी संख्या व इतर उपक्रम याबाबतीत यशस्वी वाटचाल केलेली आहे. शै. वर्ष २०१६-१७ ची विद्यार्थी संख्या ८५२ च्या वर गेली आहे. शिवाय आमच्या केंद्राला य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० विद्यार्थ्यांचे एक युनिट मंजूर झाले आहे. त्याचप्रमाणे दि. १९ जानेवारी २०१७ ते २५ जानेवारी २०१७ या कालवधित मौजे उपळावी, ता. तासगांव येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर संपन्न झाले.

श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहामध्ये दि. १५/१/२०१७ रोजी अभ्यासकेंद्रामध्ये प्रा. जी. के. पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यासकेंद्रास केंद्रसहाय्यक श्री. एस. बी. कुंभार, श्री. जे. ए. सावंत (सेवक) व केंद्रप्रमुख मा. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले

- प्रा. एन. डी. शेंडगे, केंद्रसंयोजक

मुक्त विद्यापीठ (एम. बी. ए.) -

ज्या व्यक्तींचे नोकरी, व्यवसाय किंवा आर्थिक मर्यादेमुळे पदव्युत्तर व्यवस्थापनाचे शिक्षण घेणे अशक्य होते. अशा व्यक्तिंसाठी ''ज्ञानगंगा घरोघरी'' या ब्रीद वाक्यातून महाविद्यालयाने एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून चालू केला.

सदर अभ्यासक्रम Finance, Markrting, व Human Research Management मध्ये पूर्ण करण्यास पर्याय उपलब्ध आहेत.

चालू शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम वर्ष एम.बी.ए. साठी ३३ विद्यार्थी व द्वितीय वर्ष एम.बी.ए. साठी ३ विद्यार्थी प्रवेशित आहेत. या अभ्यासकेंद्रास केंद्र सहाय्यक म्हणून मा. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

-प्रा. के. एन. पाटील, केंद्रसंयोजक, अभ्यासकेंद्र

■■■

विविध विभागाचे वार्षिक अहवाल २०१६- २०१७

ज्युनिअर विभाग अहवाल

जिमखाना अहवाल

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'' प. पूज्य शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन करून ज्युनिअर विभागाचा जिमखाना अहवाल सादर करते.

सन २०१६-२०१७ साली झालेल्या शालेय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय विभागीय आणि जिल्हास्तरीय स्पर्धेत तसेच ओपन स्पर्धेत ज्यु. कॉलेजच्या खेळाडूंनी सुवर्ण भरारी मारली आहे. त्यामध्ये थांगता मार्शल आर्ट वुडबॉल, कराटे, रोलबॉल, स्केटींग, तलवारबाजी, बॉक्सींग, शिकई तायक्वादों, चॉकबॉल, खो-खो, कबड्डी मैदानी स्पर्धा इ. खेळामध्ये उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. चालू वर्षी १३ खेळाडूंची राज्यस्तरीय आणि ४ खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली होती. तसेच राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे.

सांगली कुपवाड येथे झालेल्या जिल्हास्तरीय वुडबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने तसेच मुलांच्या संघाने विजेतेपद पटकाविले आणि मिणचे (कोल्हापूर) येथे झालेल्या विभागीय वुडबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले आणि मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले. औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता मुलींच्या संघाची निवड झाली. विजयी संघामध्ये प्रतिक्षा माळी, प्रतिक्षा कांबळे, प्रतिक्षा पाटील, ऋतुजा गुरव, निशा देसाई, छाया जाधव, कशिष साळुंखे इ. खेळांडू होते. तसेच ओंकार कवलापूरे, योगेश माळी, कुणाल पवार यांची सिंगल, डब्बल, मिक्स वुडबॉल मध्ये निवड झाली होती. राज्यस्तरीय वुडबॉल स्पर्धेत मुलीच्या संघाने उत्कृष्ठ कामगिरी केली. प्रतिक्षा प्रकाश कांबळे- XI Arts हिची महाराष्ट्र राज्य वुडबॉल संघात निवड झाली होती. छत्तीसगड येथे झालेल्या राष्ट्रीय वुडबॉल स्पर्धेत प्रतिक्षा कांबळे हिने सुवर्णपदक पटकाविले.

थांगता मार्शल आर्ट- सांगली येथे झालेल्या जिल्हास्तरीय थांगता मार्शल आर्ट स्पर्धेत प्रतिक्षा माळी, कशिष साळुंखे, ऐश्वर्या भातमारे, संध्या पवार, मयूरी चौगुले, राजू पाटील इत्यादी खेळाडूंने गोल्ड मेडल पटकविले. तसेच निशा देसाई, प्रतिक्षा कांबळे, रोहिणी मोकाशी, छाया जाधव, मोहीत वावरे इत्यादी खेळाडूंनी सिल्व्हर मेडल पटकाविले. सांगली येथे झालेल्या विभागीय थांगता स्पर्धेत प्रतिक्षा माळी, कशिष साळुंखे आणि ऐश्वर्या भातमारे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. संध्या पवार, मयूरी चौगुले ने द्वितीय क्रमांक पटकविला. अक्कलकोट येथे झालेल्या राज्यस्तरीय थांगता स्पर्धेत प्रतिक्षा माळी, कशिष

साळुंखे ह्या खेळाडूंनी गोल्ड मेडल आणि ऐश्वर्या भातमारे ने सिल्व्हर मेडल पटकविले. महाराष्ट्र राज्य थांगता मार्शल आर्ट संघात प्रतिक्षा माळी, कशिष साळुंखे ची निवड झाली होती. सदर स्पर्धेचा सराव शिबीर पूणे येथे होता. राष्ट्रीय थांगता स्पर्धा दिल्ली येथे झाल्या.

सांगली येथे झालेल्या जिल्हास्तरीय रोलबॉल स्पर्धेत संकेत आवळे– XII Arts ह्याने प्रथम क्रमांक पटकविला तसेच सातारा येथे झालेल्या विभागीय रोलबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकविला. मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय रोलबॉल स्पर्धेकरीता संकेत आवळे ची निवड झाली होती.

सांगली येथे झालेल्या रोलर स्केटींग स्पर्धेत संकेत आवळे न प्रथम क्रमांक पटकविला. कोल्हापूर येथे झालेल्या विभागीय स्केटिंग स्पर्धेत विजय संपादन केले. आणि कल्याण (सिक्रेड हायस्कूल) येथे झालेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेकरिता संकेत आवळे ची निवड झाली होती.

चॉकबॉल– सांगली येथे झालेल्या जिल्हास्तरीय चॉकबॉल स्पर्धेत मुलांच्या संघाने विजेतेपद पटकविले. विजयी संघामध्ये मंगेश एडके,....., अक्षय हसबे, ओंकार काटकर, आर्य परदेशी, विनायक भारतीबुवा, अथर्व, कल्याणी, धैर्यशील पाटील, अमित पाटील, सागर माने, अमोल चौधरी, शुभम सावंत इत्यादी खेळाडूचा सहभाग होता. तसेच जयसिंगपूर येथे झालेल्या विभागीय चॉकबॉल स्पर्धेत मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. जयसिंगपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय चॉकबॉल स्पर्धेकरिता प्रतिक्षा कांबळे, रोहिणी मोकाशी यांची सांगली जिल्हा संघात निवड झाली होती. सदर स्पर्धेमध्ये सांगली जिल्हा संघाने उपविजेतेपद पटकाविले.

बॉक्सींग– सांगली येथे झालेल्या जिल्हा स्तरीय बॉक्सींग स्पर्धेत १० खेळाडूंनी भाग घेतला होता. त्यामधील कशीष साळुंखे, गौरी वादवणे ह्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सागर घोडके ह्याने द्वितीय क्रमांक पटकाविला. सातारा येथे झालेल्या विभागीय बॉक्सींग स्पर्धेत कशिष साळुंखे, ऋतुजा साळुंखे ह्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. इस्लामपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय रूलर गेम (पंचायत युवा क्रिडा स्पर्धा) मधील बॉक्सींग स्पर्धेत कशिष साळुंखे ने सुवर्णपदक पटकाविले.

तलवारबाजी– कुपवाड येथे झालेल्या जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत १२ खेळाडूंनी भाग घेतला होता. त्यामध्ये प्रतिक्षा माळी– फाईल, निशा देसाई–फाईल, ऋतुजा गुरव– इप्पी, प्रियांका जाधव– सेबर, प्रदीप निकम– सेबर, ओंकार कवलापूरे– इप्पी, फाईल, इत्यादी खेळाडूंनी विजय संपादन केले. आणि कसबा–बावडा (कोल्हापूर) येथे झालेल्या विभागीय तलवारबाजी स्पर्धेकरिता विजयी खेळाडूंची निवड झाली होती. लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेकरिता ऋतुजा गुरव, प्रतिक्षा माळी ह्यांची निवड झाली होती.

बुध्दीबळ– तासगांव तालुका स्तरीय आणि जिल्हा स्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत दिव्या जमदाडे, निकीता जमदाडे ह्यांनी विजय संपादन केले. तसेच रत्नागिरी येथे झालेल्या विभागीय बुध्दीबळ स्पर्धेत दिव्या जमदाडे ने उत्कृष्ठ कामगिरी केली.

तायक्वादों– तालुकास्तरीय तायक्वादों स्पर्धेत सम्राज्ञी पाटील, प्रतिक्षा माळी, प्रतिक्षा कांबळे, कशिष साळुंखे, आदित्य पानसे इत्यादी खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकाविला. आदर्श जगदाळे, गोमटेश अकंलखोपे ह्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. सांगली येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत समाज्ञी पाटील ने प्रथम क्रमांक पटकाविला. आदित्या पानसे, प्रतिक्षा माळी ने द्वितीय क्रमांक मिळवला. सम्राज्ञी पाटील ची सिंधूदुर्ग येथे झालेल्या विभागीय तायक्वादों स्पर्धेकरिता निवड झाली होती. राजनंदनगाव (छत्तीसगड) येथे झालेल्या राष्ट्रीय तायक्वादों स्पर्धेत प्रतिक्षा माळी, सम्राज्ञी पाटील ने गोल्ड मेडेल गोमटेश अकंलखोपे, सम्राज्ञी पाटील ने गोल्ड मेडेल पटकाविले.

कराटे– जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत आदित्य पानसे– XII Arts ह्याने प्रथम क्रमांक मिळवला. विभागीय कराटे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत आदित्य पानसे ने गोल्ड मेडेल पटकाविले, तसेच भूतान येथे झालेल्या कराटे स्पर्धेत देखील आदित्य पानसे ने गोल्ड मेडेल पटकाविले होते.

